म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# श्री रामचंद्र शंकर टाकी महाराज

REFBK-0005454

परमपूज्य गुरुवर्य

# श्री रामचंद्र शंकर टाकी महाराज ऊर्फ श्री भाई यांचें चरित्र.

ज्याची बुद्धि विशाल, सूक्ष्म; मनही पुष्पापरी कोमळ
श्रद्धा सात्त्विक, भक्तिशुद्ध, वचनीं माधुर्यता प्रेमळ ।
जेणें संतकथा, सदैव ममता, विश्वैकता बोधिली
त्या श्रीवामनभक्त शंकरसुता अर्पी प्रणामावली ॥


लेखक.

आनंदराव सदाशिव दळवी.



RFFBK-0005454

५४५४



रामचंद्र हरि जोशी.

आश्वि. व. ३ श. १८५८ ] [ १ नोव्हेंबर १९३६

किंमत १२ आणे

मुद्रकः—केशव तातोबा शेट्ये, तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई.
प्रकाशकः—रामचंद्र हरि जोशी, वैद्याची वाडी, ठाकूरद्वार, मुंबई.

All Rights Reserved

परमपूज्य गुरुवर्य श्री रामचंद्र शंकर टाकी महाराज ऊर्फ श्री भाई



जन्म श्रावण शु. ११ शके १७७९ ता. १—८—१८५७

वैकुंठगमन आश्विन व. ३ शके १८५७ ता. १४–१०–१९३५

४५५४

# श्री टाकीमहाराजांचें स्तवन.

ज्याचा जन्म सुरम्य भाग्यनगरीं मुंबापुरीं जाहला
मास श्रेष्ठ घनांबु श्रावण दिनीं एकादशी निर्मला ।
विद्याभ्यास करोनि भक्ति प्रभुची सेवेंतही साधिली
त्या श्रीवामनभक्त शंकरसुता अर्पीं प्रणामावली ॥ १ ॥

जेणें आत्मचरित्रिं सत्य, समता, औदार्य, अद्वैतता
प्रीती, भक्ति, अविकृत सदयता, निष्ठूर निःस्पृहता ।
सत्संगीं स्पृहता, सुशील विनता, सात्त्वीकता दाविली
त्या श्रीवामनभक्त शंकरसुता अर्पीं प्रणामावली ॥ २ ॥


जेणें वैष्णवधर्म पाळुनि स्वयें अन्यांसही दाविला
भक्तीनें निजश्रेष्ठ भक्तिमहिमा भक्तांसही बोधिला ।
जेणें ‘ निर्गुणज्ञान भक्ति सगुणा ’ स्वारस्य वर्णीयली
त्या श्रीवामनभक्त शंकरसुता अर्पीं प्रणामावली ॥ ३ ॥

ज्या नामें तरले असंख्य दुबळे, वेडे खुळे, आंधळे
श्रीबुद्धीहिन उच्च नीच सगळे, भोळे, लुळे, पांगळे ।
त्याची सोज्वलता, उदात्त महता, भक्तीरसें बोधिली
त्या श्रीवामनभक्त शंकरसुता अर्पीं प्रणामावली ॥ ४ ॥

टाकी टाकि अशुद्ध सर्व मनुजा टाकी सदा सांगती
टाकी हें उपनाम गोड बरवें टाकी तसे वागती ।
टाकी लाविति आपणांसहि तसें वागावया ह्या जनीं
टाकी धन्य तुम्ही खरोखर अहा हा राम मानी मनीं ॥ ५ ॥

टाकी द्वैत उदारचित्तसुमनें चिंतीच सर्वोत्तमा
टाकी पाठ सदैव हाचि पढवी नेई अविद्यातमा ।
टाकी टाकि असा [illegible] मंत्र वदती त्या वृक्षवेली किती
टाकीला गुरु त्याच वाटति फळें त्या आपुलीं अर्पिती ॥ ६ ॥

टाकी कर्मफला अहंकृतिसि त्या कृष्णार्पणीं सार्थक
टाकी तूं करुनी सदैव मनुजा तें तें खरें तें सुख ।
टाकी हे ठसले हृदींच बसले आबालवृद्धांचिया
टाकी ! ही अवघी सभाच गमते अद्वैत पावे जया ॥ ७ ॥



भारतवर्षांतील अग्रेसर कवि-तत्त्वज्ञ

# विद्वच्छ्रेष्ठ धुंडिराजशास्त्री विनोद, एम्. ए., न्यायरत्न,

यांच्या लेखणींतून उतर...

# तात्त्विक पुरस्कार

यथार्थ व भावार्थ हे स्वरूपतः एकच. वामनपंडितांची यथार्थदीपिका व ज्ञानेश्वरांची भावार्थदीपिका किंवा ज्ञानेश्वरी हीं दोन्हीहि तेजोवलयें स्वस्वरूपानुभूतीच्या एकाच केंद्रस्थानांत उदित होतात, व दोन्हीहि दीपिकांचे प्रकाश समपरिघ व समत्रिज्य आहेत. अर्थाचें यथावत्त्व म्हणजेच त्याचा मूलभाव यथार्थता व भावार्थता अशी एकरूप असल्यामुळें या दोन्हीं ग्रंथांत झालेलें आंतर व आध्यात्मिक अनुभवविशेषांचें प्रकाशन, पृथक्करण आणि पुनःसंयोजन फलतः अभिन्नच असणार. "इंद्रियाणि ऋच्छंति यत्र"—जेथें इंद्रियें जातात तो अर्थ; सर्व इंद्रियांना अधिष्ठानभूत असणारी बुद्धि, विविध व अविभक्त वस्तुजातामध्यें अंतर्हित असलेल्या अव्यय भावाला व अविभक्त अर्थाला भिडून त्याचें यथावत् प्रकटन करते. बुद्धिनिष्ठा हाच भारतीय तत्त्वज्ञानाचा स्वभावविशेष आहे. सूक्ष्मदर्शी तत्त्वज्ञांची "अग्र्य" बुद्धि हें अंतिम सत्याच्या आकलनास उपयुक्त व उपलब्ध असलेलें एकमेव उपकरण होय, असें काठकश्रुति सांगते. स्थित "प्रज्ञा" ही मानवी जीवनाची परा श्रेणी होय. विवेक हें कार्यप्रवण प्रज्ञेचें फलित आहे. सत्य व असत्य यांतील वेगळीक, भ्रम व प्रमा यांतील वैलक्षण्य, प्रातिभासिक व वास्तविक यांतला भेदग्रह निश्चित करणें हें विवेकशक्तीचें स्वभावसिद्ध कार्य. विवेकजन्य "अखंडार्थ" वृत्तीचा निदिध्यास किंवा अभ्यास म्हणजे भक्ति. म्हणून ज्ञानाला मोक्षाचें साधन लेखणारे श्रीशंकराचार्य, आपल्या

विवेकचूडामणींत भक्तीची व्याख्या "स्वरूपानुसंधान" म्हणजे आत्मानात्मविवेकवृत्तीचा निदिध्यास अशी करतात. ज्ञान व भक्ति हे एकाच मनोऽवस्थेचे विभक्त दृष्टिकोनानें झालेले निर्देश आहेत; दोहोंचें निर्देश्य एकरूप; अविभक्त आहे. "भगवद्भाव सर्वांभूतीं। हेंचि ज्ञान हीचि भक्ति" ही एकनाथांची भूमिका ज्ञान व भक्ति यांतील शब्दभेद व अर्थैक्य निःसंदेहतेनें स्पष्ट करीत आहे. प्लेटोची Idea of Good किंवा ॲरिस्टॉटलची Theoria अशीच समन्वयजन्य आहे. श्री टाकीमहाराज यांचें वाङ्मय व त्यांनीं केलेले तात्त्विक निर्णय एकांगी नसून सर्वसंग्राहक असेच आहेत. त्यांनीं आचरिलेला व प्रचारिलेला "पंथा" वैशिष्ट्यपूर्ण आहे पण विरोध-प्रापक नाहीं. त्यांचा विचारप्रवाह यथार्थ व भावार्थ, ज्ञान व भक्ति, वामन व ज्ञानेश्वर, यांच्या दुरंगी सौंदर्यानें सुशोभित झाला आहे; गंगौघावर यमुनेचा विभिन्न वर्ण जसा स्पष्ट दृग्गोचर होतो त्याप्रमाणें श्री टाकीमहाराज यांचा ज्ञानधवल "पंथा" भक्तिप्रेमाच्या संध्या-रंगाचाहि साक्षात्कार ठळकपणें देतो. वामनपंडितांच्या ज्ञानभक्तियोगाचे नवयुगांतील पाईक म्हणून श्रीभाई ऊर्फ टाकी महाराज महाराष्ट्राच्या संतसांप्रदायांत वैशिष्ट्यानें चमकतील. यथार्थदीपिकेच्या सोज्ज्वळ तत्त्वतेजावर झेंप घेऊन स्वतःची प्रभातरल आत्मज्योति त्या तेजांत विलीन करणाऱ्या या "प्रेमप्रेमी" भागवताचें चरित्र सर्वांसच आल्हा-दक व उपकारक होईल. सद्भक्तिप्रसारक मंडळाच्या सभासदांनीं प्रस्तुत सुंदर चरित्र प्रसिद्ध करून श्री भाईंच्या चाहत्यांस कायमचें ऋणी केलें आहे. अस्तु. ॐ तत्सत्।

जपयज्ञभुवन, गोवर्धनसंस्था
खेतवाडी मेन रोड, मुंबई.
आश्विन शु. ४ शके १८५८

धुंडिराज गोविंद विनोद

# पुष्पांजलिसमर्पण

बाल्य, विद्यार्थिदशा, सेवाधर्मपालन, गृहस्थाश्रम आणि वार्धक्य या मानवी जीविताच्या ज्या पुरुषार्थसाधनाच्या अवस्था आहेत त्यांतून संक्रमण करीत असतांना ज्यांनीं कर्तव्यनिष्ठेच्या योगानें जीवनाचें साध्य जाणलें व अनुभविलें त्या पूज्य श्री भाईंच्या चारित्र्याची ही केवल रूपरेषा आहे. सर्व कालीं व सर्व अवस्थांमध्यें ज्यांनीं परमेश्वराच्या इच्छेबद्दल व त्याच्या अतुल प्रेमाबद्दल अखंड व अढळ विश्वास कायावाचामनेंकरून अनुभविला त्यांचें हें अल्प चरित्र लहानथोरांस स्फूर्तिदायक व सन्मार्गदर्शक होईल अशी मला उमेद आहे. 'आनंदयज्ञासी आलें निमंत्रण । मानवजीवन धन्य झालें ॥' हे गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे काव्योद्गार अंतःकरणास पटण्यास श्री भाईंचें चरित्र कारणीभूत होईल. या पवित्र यज्ञकार्यामध्यें भगवद्गान गाण्याचें महत्कार्य श्री भाईंनीं आपल्या जीविताच्या सर्व अवस्थांमध्यें केलें. वाचनलेखन, ज्ञानार्जन व ज्ञानसंवर्धन, श्रवण-मनन किंवा प्रपंचधर्मपालन इत्यादि व्यवसाय ज्या भगवत्प्रेमामुळें प्रेरित झाले तें प्रेम श्री भाईंच्या अंतःकरणांत तुडुंब भरलें होतें. सुख-दुःखाच्या कोणत्याहि अवस्थेंत सुद्धां त्यांच्या मनाचा समतोलपणा ढळला नाहीं हें मी ४०-४५ वर्षांच्या परिचयामुळें जाणतों. त्यांच्या जीवनाचें रहस्य जाणून आत्मपरीक्षण व आत्मज्ञान यांच्या साहाय्यानें प्रत्येक जीवानें उच्चतम परमार्थाची पायरी गांठावी याहून अधिक आनंद कशांत आहे? हा आनंद प्राप्त करून घेणें व अनुभवणें शक्य व सुसाध्य आहे हें श्री भाईंच्या चारित्र्यावरून सिद्ध होतें. त्यांच्या सानिध्यांत दीर्घ काल त्यांच्या चरणांपाशीं बसून ज्यांनीं पारमार्थिक साहित्याच्या व इतर बाबींत निष्काम सेवा केली त्यांच्या आस्थेमुळें श्रींच्या जीवनाचा हा अल्प परिचय वाचकास होत आहे हें मी जाणतों. श्री भाईंच्या चरणीं ही पुष्पांजलि अर्पण करण्याची संधि मला प्राप्त करून दिल्याबद्दल लेखकांचा मी आभारी आहें.

विलेपार्ले
आश्विन शु. १ शके १८५८

ऋग्वेदी.

# प्रकाशकाचें आत्मनिवेदन.

चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥--भ. गी.

वरील श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें कोणत्याहि प्रकारानें देवाची भक्ति केली असतां ती ईश्वरचरणीं रुजू होते. याप्रमाणें परमपूज्य गुरुवर्य श्री रामचंद्र शंकर टाकी महाराज ऊर्फ श्री भाई यांच्या समागमाचा लाभ मला गेलीं ५।६ वर्षें झाला. या अवधींत त्यांच्यामध्यें वसत असलेले सर्वमान्य अलौकिक गुण—निरपेक्षता, सर्व ठिकाणीं समता, ममता वगैरे सहज दिसून आले. जसजसा समागम वाढत चालला तसतसें त्यांच्या प्रेमळ प्रवचनांच्या श्रवणानें विचारांना एकदम निराळें वळण लागून श्री भाईंनीं लिहिलेल्या वाङ्मयाची आवड जास्त वाटूं लागली, व 'आपणासारखे करिती तात्काळ । नाहीं काळवेळ तया लागीं ॥' याचा अनुभव येऊं लागला. परंतु पुढें श्री भाई दुखण्यांत पडून त्यांनीं वैकुंठास गमन केलें त्यामुळें त्यांच्या समागमांत होणाऱ्या श्रवणाची आठवण फारच तीव्रतेनें भासूं लागली.

श्री भाईंच्या सांप्रदायिक शिष्यमंडळींना ते अत्यंत पूज्य सद्गुणमूर्ति वाटत असतील यांत नवल नाहीं. पण प्रस्तुत चरित्रावरून एकाद्या सामान्य वाचकासहि यांत बोध घेण्यासारख्या व अनुकरण करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत असें आढळून येईल. लहानपणापासून श्री भाईंची ईश्वरविषयक श्रद्धा, वडील माणसांविषयींची आदरबुद्धि, अभ्यास करण्याची उत्सुकता, शरीरकष्टाची संवय, नम्रता, आर्जवशक्ति हे लहान वयांत दिसून येणारे गुण अमोलिक आहेत यांत संशय नाहीं. तरुणपणीं व्यवसायधंद्यांत अत्यंत सचोटीनें वागणें, अंगच्या गुणांनीं वरिष्ठांची

मर्जी संपादन करणें, संसार करीत असतां परमार्थाकडे लक्ष असूं देणें, विषयसेवनाकडे ओढा नसणें वगैरे गोष्टी गृहस्थांनीं अनुकरण करण्याजोग्या आहेत. पेन्शन घेतल्यानंतरचा काळ त्यांच्या गुणोत्कर्षाचा काळ असल्यामुळें त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. तथापि सरळ स्वभाव, मनोवेधक मधुर भाषण, परिणामकारक प्रवचनपद्धति, सर्वांभूतीं समभाव व शांतवृत्ति ह्या गुणांनीं शिष्यमंडळीसच काय, परंतु त्यांच्याशीं अल्पकाळ का होईना ज्यांचा संबंध होता त्यांच्या मनांतहि भाईंविषयीं आदरभाव प्रकट झाल्याखेरीज राहिला नाहीं. त्यांची आठवण सदैव डोळ्यांपुढें राहण्याकरितां त्यांचें दिव्य चरित्र लवकरच, निदान त्यांच्या पहिल्या पुण्यतिथिदिनीं तरी, छापून प्रसिद्ध व्हावें व आपल्याबरोबर सर्व जनतेचा फायदा करून द्यावा असें वाटून ही कल्पना त्यांच्या कांहीं भक्तमंडळीपुढें मांडली. त्यांना ती पसंत होऊन चरित्र तयार करण्याच्या कामास सुरवात झाली.

श्रीभाईंच्या मनांतच आपल्या भक्तांना चरित्ररूपी प्रसाद देण्याचें आलें कीं काय नकळे, लौकरच चरित्र लिहिण्यास लागणारी सामग्री जमविण्यांत आली व फक्त दोन महिन्यांत हस्तलिखित प्रत तयार झाली.

'सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः । पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥' याप्रमाणें श्रीभाईंचें गुणवर्णन करण्यास लागणारी सामग्री याच कोणी गाई, त्याचें चरित्रामृतरूपी दुग्ध, दोहन करणारे त्यांच्या सांनिध्यांतले लेखक व पान्हा भरपूर आणून जिज्ञासूंना तृप्त करणारे भगवान् श्रीभाई असा योग जमल्यावर अमृत लोकांपुढें ठेवण्यास कितीसा वेळ लागणार ?

चरित्र तयार झालें परंतु त्यांत जीं छायाचित्रें द्यावयाचीं होतीं त्यांसंबंधानें बऱ्याच अडचणी आल्या; परंतु सद्गुरुकृपेनें त्याही दूर होऊन चरित्र योग्य वेळीं छापून तयार झालें.

हल्लींच्या कठीण काळांत सुद्धां 'प्रपंच करूनहि परमार्थांतलें उच्चपद प्राप्त करून घेतां येतें' या दासबोधांतील वचनाप्रमाणें श्रीभाईंनीं 'आधीं केलें मग सांगितलें' असें आपल्या वागण्यानें सर्वांना सिद्ध करून दाखविलें व 'वासुदेवः सर्वमिति' हें तत्त्व पदोपदीं लोकांच्या मनांत बिंबविलें. एवढेंच नव्हे, तर एकनाथमहाराज व स्वामी विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणें

'ऐसे प्राप्त पुरुष येथ । संसारीं नाहीं गा बहुत ।
हिंडतां अवघ्या जगांत । एकादा कदाचित देखिजे ॥'—ए. भा.

'सगळ्या शतकांत थोड्याच पुरुषांस अशा तऱ्हेची सर्व जगास पवित्र करणारी भक्ति प्राप्त होते.'—भक्तियोग.

हें आपल्या आचरणानें सिद्ध करून दिलें.

शेवटीं संतशिरोमणि तुकोबारायांच्या गोड अभंगांत म्हटल्याप्रमाणें (काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ।) श्रीभाईंच्या गुणवर्णनाची गोडी घ्यावी तेवढी थोडीच होय.

श्रीभाईंच्या चरित्रांत विशेष हें आहे कीं त्यांत नव्या व जुन्याची सांगड दिसून येते. राजमान्य व जनतामान्य असे जे थोडे संत पुरुष होऊन गेले त्यांत श्रीभाईंचा नंबर बराच वरचा लागेल यांत शंका नाहीं. तेव्हां हें चरित्र सर्वांना आदरणीय होईल अशी आम्हांला उमेद आहे.

या ग्रंथास अखिल भारतीय ख्यातीचे सुप्रसिद्ध विद्वान् न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांनीं "तात्त्विक पुरस्कार" लिहून दिल्यामुळें विशेष महत्त्व आलें आहे. गेल्या वर्षीं न्यायरत्न विनोद यांच्या विद्वत्तेच्या गौरवार्थ निरनिराळ्या संस्थांतर्फे सुमारें पंचवीस परिग्रहपूर्वक थाटाचे सत्कार झाले होते व लाहोर-हरिद्वारपासून मद्रास-कुंभकोनमूपर्यंत त्यांचीं तौलनिक तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र या विषयांवर व्याख्यानें झालीं असून नुकतीच बडोदें

येथील जनतेवर त्यांनीं पाडलेली आपल्या विद्वत्तेची, वक्तृत्वाची व व्यक्तित्वाची संस्मरणीय छाप लोकविश्रुत आहेच. माझा व न्यायरत्न विनोद यांचा बऱ्याच वर्षांचा परिचय असून "तात्त्विक पुरस्कारा" मुळें श्री टाकीमहाराज यांच्या सर्व चाहत्या मंडळींशीं आतां ते स्नेहसंबद्ध झालेले पाहून मला फार आनंद होत आहे.

माझी योग्यता म्हणजे 'फोडिलें भांडार धन्याचा हा माल। मी एक हमाल भारवाही ॥' एवढीच आहे हें सुज्ञ वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

ॐ नमः शिवाय।

वैद्यवाडी, ठकुरद्वाररोड
मुंबई, १६–१०–३६

**रा. ह. जोशी**

# प्रस्तावना.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

भगवद्गीतेच्या चवथ्या अध्यायांतील या दोन श्लोकांत भगवान् म्हणतात कीं जेव्हां जेव्हां धर्माच्या उज्ज्वल स्वरूपाला उतरती कळा येते आणि अधर्माचें प्राबल्य वाढत जातें, तेव्हां तेव्हां धर्माचें पुनरुज्जीवन करण्याकरितां मी अवतीर्ण होतों. तसेंच साधूंचें संरक्षण करण्याकरितां व दुर्जनांचा संहार करण्याकरितां मी युगायुगाचे ठायीं अवतार धारण करतों. परंतु अवतारकार्य संपल्यावर अवतारी पुरुष निजधामास गेले म्हणजे त्यांनीं आरंभिलेलें कार्य साधुसंत पुढें चालवितात. ‘जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती’ असे साधुसंत वेळोवेळीं अवतरले नसते तर लोक अज्ञानांधकारांत गढून जाऊन अधोगतीला गेले असते. साधुसंत त्यांना वेळींच जागृत करून सन्मार्गास लावितात. हे संतांचे जगतावर जे उपकार आहेत त्याबद्दल त्यांचें उतराई होतां येणारच नाहीं. म्हणून तुकाराममहाराज म्हणतात, ‘काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ॥’.

आमचे चरित्रनायक श्रीरामचंद्र शंकर टाकी महाराज ऊर्फ श्रीभाई हे ह्या संत कोटींतले होते. श्रीभाई कोणत्या योग्यतेस चढणार ह्याचीं चिन्हें ‘मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात’ ह्या म्हणीप्रमाणें लहानपणींच दिसण्यांत येत होतीं. हे अवघे आठ वर्षांचे होते तेव्हां नवनीताचें पुस्तक त्यांचे हातीं पडलें. तें उघडताच मोरोपंतांच्या करुणरसानें ओथंबलेल्या पुढील आर्या त्यांच्या दृष्टीस पडल्या:—

आतां प्रभो दयाळा मज दीनावरि करूनियां करुणा ।
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो उगवुं दे कृपाअरुणा ॥
दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी ।
बा जीवदान दे गा प्रभो ! उपेक्षा करूं नको माझी ॥

ह्या आर्या व दुसरीं अनेक भक्तिपर पदें त्यांनीं भराभर पाठ केलीं. यावरून इतक्या लहान वयांत देखील त्यांना भक्तीची किती आवड होती हें दिसतें. परंतु पुढें मुंबईच्या विश्वविद्यालयांतील प्रवेशपरीक्षा पास झाल्यावर कॉलेजांत असतांना तेथील वातावरणाचा त्यांच्या मनावर थोडाबहुत परिणाम झाला असावा असें वाटतें. कारण कॉलेजांतील अभ्यास संपवून तें कारवारास गेल्यावर त्यांचे वडील श्री शंकरराव बाबा रात्रौ कोणत्यातरी आध्यात्मिक ग्रंथावर निरूपण करीत असत, त्यावेळीं श्रवणास कांहीं मंडळी जमत असत. परंतु श्रीभाई त्या मंडळींत मिसळत नसत किंवा श्रवणासहि बसत नसत. ह्या बाबतींत श्रीबाबांचें संतास उचित असेंच वर्तन असे. ते पूर्णपणें जाणत होते कीं परमार्थांत जुलमाचा रामराम चालत नाहीं व परमार्थाची आवड असल्याशिवाय त्यांत प्रगति होत नाहीं. श्रीभाईंना ‘ तूं श्रवणास बस किंवा आध्यात्मिक ग्रंथ वाच ’ अशा प्रकारें ते कधींहि आग्रह करीत नसत. याच सुमारास मातोश्रींचा वियोग झाल्यामुळें श्रीभाईंना अत्यंत वैराग्य प्राप्त झालें व त्यांना बी. ए. च्या परीक्षेंत अपयश आल्यामुळें त्यांत जास्तच भर पडली. परंतु कांहीं तरी उद्योग असावा म्हणून त्यांनीं विद्याखात्यांत कारवार हायस्कुलांत शिक्षकाची नोकरी धरली. त्यांच्या मनांत पुन्हां परीक्षेस बसावयाचें नव्हतें पण श्रीबाबांच्या आग्रहास्तव ते दुसऱ्या वर्षी परीक्षेस बसले व तींत त्यांना यशहि आलें.

वैराग्यामुळें त्यांची चित्तशुद्धि होत चालली होती व पूर्वसंस्कार जागृत होऊं लागले. तेव्हां त्यांनीं कै. न्यायमूर्ति तेलंग यांची गीतेवरील

इंग्रजी टीका श्रीबाबांच्या परवानगीनें वाचण्यास आरंभ केला. कांहीं दिवसांनीं श्रीबाबांनीं त्यांना विचारिलें कीं, 'कै. तेलंगांच्या गीतेचें वाचन कोठपर्यंत आलें आहे?' त्यांनीं म्हटलें, 'त्यांचे कांहीं विचार माझ्या बुद्धीला पटत नाहींत म्हणून मीं ती वाचण्याचें बंद केलें.' त्यावर श्रीबाबा नुसते हंसले, कांहींएक बोलले नाहींत. पुढें कांहीं दिवसांनीं रा. कैसकर या गृहस्थाबरोबर त्यांचा ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल वाद झाला. त्यांत त्यांनीं रा. कैसकरांना निरुत्तर केलें. यामुळें श्रीबाबांना फार आनंद झाला, व 'तूं आतां श्रवणास अधिकारी झालास' असें त्यांनीं त्यांना आश्वासन दिलें व तेव्हांपासून ते श्रवणास बसूं लागले. कांहीं दिवसांनीं त्यांची पूर्ण चित्तशुद्धि झाल्यावर श्रीबाबांनीं त्यांना आत्मज्ञानाचा बोध केला. ज्ञान झाल्यावर तें बिंबण्याकरितां त्यांनीं नवविधा भक्ति व विशेषेंकरून श्रवणभक्ति व गुरुदेवभक्ति यांशिवाय दुसरें कांहीं साधन केलें नाहीं.

सन १८८९ सालीं श्रीभाईंची मुंबईस मराठी शाळेचे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर या जागीं नेमणूक झाली. नवीन नियमान्वयें (अॅक्टाप्रमाणें) म्युनिसिपालिटीला अधिक अधिकार व स्वातंत्र्य मिळालें होतें. त्यामुळें डेप्युटीच्या जागेवर असणाऱ्या अधिकाऱ्याच्या अंगीं खरी कर्तबगारी व मुत्सद्देगिरी असल्याशिवाय त्याच्या हातून हें काम झेंपलें नसतें. डेप्युटीला सरकारास, म्युनिसिपालिटीला, हाताखालच्या शिक्षकांना व लोकांना खुष करावें लागत असे.

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ।
इति महति विरोधे विद्यमाने समाने
नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥

भावार्थः—राजाचें हित करणाऱ्याचा लोक द्वेष करतात; आणि लोकांचें हित करणाऱ्यावर राजाची अप्रीति होते. याप्रमाणें परस्पर मोठा विरोध असतां राजा व प्रजा या दोघांचें काम करून दोघांनाहि प्रिय होणारा मनुष्य दुर्लभ आहे.

कवीनें ह्या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें असा मनुष्य विरळाच आढळण्यांत येतो, तरी श्रीभाईंनीं ही कामगिरी उत्तम रीतीनें बजावली. त्यांनीं सरकारची इतकी मर्जी संपादन केली कीं प्राथमिक शाळांचे बाबतींतच नव्हे तर शिक्षणाच्या सर्व बाबतींत वरिष्ठ अधिकारी त्यांचा सल्ला घेत असत व त्यांच्या मतांना मान देत. शिक्षकांना तर ते इतके प्रिय झाले होते कीं सेवानिवृत्त होण्याच्या वेळीं त्यांनीं आपसांत वर्गणी काढून त्यांना एक थैली अर्पण करण्याचें योजना केली. परंतु ती घेण्याची त्यांनीं नाकारल्यामुळें त्या फंडाचा विनियोग श्रीभाईंच्या नांवानें एक शिष्यवृत्ति ठेवण्याकडे करण्यांत आला अशा रीतीनें सरकारची मर्जी संपादन करून व लोकांत मान-मान्यता मिळवून त्यांनीं दोन वर्षांची फर्लो रजा घेतली व रजा संपतांच ते सेवानिवृत्त झाले. त्यांनीं इतक्या लौकर सेवानिवृत्त व्हावें हें त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस पसंत पडलें नाहीं. आतां नवीन पगाराचें मान लौकरच वाढविण्यांत येणार आहे, तेव्हां तुम्ही जर नोकरींत राहिलांत तर तुमचा बराच फायदा होईल व पेन्शनचें प्रमाण वाढेल असें आमिष त्यांनीं त्यांच्या-पुढें ठेविलें. परंतु या मोहास बळी न पडतां त्यांनीं वरिष्ठ अधिकाऱ्यांस असें कळविलें कीं, ' मी एकनिष्ठपणें सरकारची २८ वर्षें नोकरी केली व आतां राहिलेलें आयुष्य ईश्वरसेवेंत घालवावें हा माझा बहुत दिवसांचा संकल्प आहे तो मला मोडतां येत नाहीं. तेव्हां आपले इच्छेप्रमाणें मला राहतां येत नाहीं, याबद्दल राग न धरितां मला मोकळें करावें.' पुढें सेवा-निवृत्त झाल्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांच्यापुढें दुसरें एक आमिष ठेविलें:

'तुम्हांला रावबहादुर किंवा अशी दुसरी एकादी मोठी पदवी देण्याचा आमचा मानस आहे व तुमची नुकसानी भरून काढण्याकरितां 'फॉरेन एज्युकेशन ब्यूरो' च्या सेक्रेटरीची दरमहा शंभर रुपये पगाराची जागा देण्याचें आम्हीं ठरविलें आहे.' परंतु श्रीभाईंचें वैराग्य जाज्वल्य असल्यामुळें त्यांनीं पदवी घेण्याबद्दल व जागा पत्करण्याबद्दल नाखुशी प्रदर्शित केली.

नोकरींतून मोकळे झाल्याबरोबर श्रीभाईंनीं ज्ञानाचा परिपाक होण्याकरितां संतवाङ्मयाचा जारीनें अभ्यास सुरू केला व मधून मधून श्रीभाईंनीं तीर्थयात्राहि केल्या. इतकें झाल्यावर त्यांनीं आपण संपादन केलेल्या ज्ञानाचा लाभ लोकांस प्रवचनाच्या द्वारें देण्यास सुरवात केली. मग ओघानें पुरुषार्थदीपिका, लघुबोध, गीतेवरील इंग्रजी टीका वगैरे ग्रंथ लिहिण्यांत आले. त्यांच्या हस्ताक्षराचा नमुना दहाव्या प्रकरणाच्या आरंभीं दिला आहे.

श्रीभाई भागवत धर्मसंप्रदायाचे अनुयायी होते. हा संप्रदाय श्रीनारायणमहाराज जालवणकर यांनीं स्थापन केला. त्यांच्या पुष्कळ शिष्यशाखा होत्या. त्यांपैकीं त्यांचे शिष्य श्रीनारायणबुवा रत्नागिरीवासी यांनीं एका शाखेचा विस्तार ह्या भागांत केला. श्रीनारायणबुवांनीं श्रीराधाकृष्ण तोरणे यांना बोध केला. त्यांनीं श्रीशंकररावबाबांवर अनुग्रह केला. त्यांच्यापासून श्रीभाईंस बोध झाला. श्रीभाईंनीं त्या संप्रदायाचा बराच विस्तार करून आपल्या सद्गुरूची कीर्ति अजरामर केली. भागवत धर्माचे दोन प्रकार आहेत: (१) ज्ञानापूर्वीचा किंवा कर्माश्रित भागवत धर्म व (२) ज्ञानोत्तर भागवत धर्म. पहिल्या प्रकाराचें विशेष लक्षण असें आहे:—

(१) दास्याचें माझ्या हेंचि वर्म । कीं मज अर्पी सर्व कर्म ।<br>
मुख्य प्रथम भागवतधर्म । सर्व कर्म समर्पण मजलागीं ॥—य. दी.

(२) मी एकु कर्मकर्ता । ऐशी उठों नेदी अहंता ।<br>
तें कर्मचि स्वभावतां । अर्पी श्रीअनंता ईश्वरातें ॥—ए. भा.

दुसऱ्या प्रकाराचें विशेष लक्षण हें आहे कीं:—

(१) जें जें भेटे भूत । तें तें मानी भगवंत ।
हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥— ज्ञानेश्वरी.

(२) सर्वभूतीं भगवद्भावो । या नांव मुख्यभक्ति पहा वो ।
ते सांगाती झालिया स्वयमेवो । कामक्रोधमोहो न शकती बाधूं ॥
भगवद्भाव सर्वांभूतीं । या नांव गा अभेदभक्ती ।
हे आकळल्या भजनस्थिती । अहंकृति उरेना ॥—ए. भा.

श्रीभाई कट्टे भागवत नव्हते, तर 'जाणीव शाहणीव ज्ञातेपण । सांडूनि जातीचा अभिमान । जो मज होय अनन्यशरण । वैष्णव जाण तो माझा ॥' ह्या ओवींत श्री एकनाथमहाराजांनीं वर्णिलेल्या वर्गांतील वैष्णव होते, म्हणजे आपलाच पंथ खरा, दुसरे खोटे, आपल्याच पंथानें उद्धार होईल, दुसऱ्यानें होणार नाहीं असें दुरभिमानामुळें मानणाऱ्यांपैकीं ते नव्हते. त्यांची सर्व धर्मांशीं व सर्व पंथांशीं सहानुभूति होती. त्यांनीं अनेक धर्मग्रंथांचें परिशीलन केलें होतें इतकेंच नव्हे तर ते आपल्या प्रवचनांत आधारादाखल त्यांतील भरपूर उतारे देत असत.

या संप्रदायाचे मुख्य सिद्धांत असे आहेत:—

प्रथम सगुण षड्गुणैश्वर्यसंपन्न सर्वेश्वरास तो सम, सदय, निर्दोष असें जाणून शरण गेल्यानें संतसमागम प्राप्त होतो. तेथें काम्यकर्मांचा त्याग केल्यानें वैराग्य उत्पन्न होतें, व निष्काम कर्म ईश्वरार्पण ( कर्मयोग ) केल्यानें भक्ति उत्पन्न होते. मग नवविधा भक्तीच्या योगानें अंत:करण शुद्ध होतें व चित्तशुद्धिद्वारा निर्गुणस्वरूपाचा व सर्वात्मतेचा बोध होतो. सर्वदा सर्वात्मतेच्या स्मरणासच सगुणभक्ति म्हणतात. जडांत चैतन्य ( भक्तियोग ) स्फुरत नसल्यास स्वरूपाचा अभ्यास ( ज्ञानयोग ) करावा. अशुद्ध चित्तामुळें स्वरूपांत बुद्धि जात नसल्यास पुन्हां कर्मयोग करावा;

म्हणजे श्रवणकीर्तनादि भक्ति करावी. किंवा भगवंताच्या योगाचें आश्रित व्हावें, आचार्योपासना करावी व भक्तिनिरूपण करावें. येणेंकरून साधक जीवन्मुक्त किंवा सिद्ध होतो. नंतर पराभक्तीच्या योगानें देह पडल्यावर ह्या सिद्धास साधर्म्य म्हणजे सगुणमोक्ष किंवा वैकुंठवास प्राप्त होतो.

श्रीभाई आपल्या प्रवचनांत ( १ ) नामसंकीर्तन व ( २ ) गुरुदेव-भक्ति यांवर विशेष जोर देत असत. नामासारखें परमार्थांत दुसरें साधनच नाहीं असें ते नेहमीं प्रतिपादन करीत असत. या सिद्धांतांच्या पुष्ट्यर्थ ते संतवचनें देत असत, त्यांपैकीं कांहीं येथें दिलीं आहेत:—

( १ ) नाम जपयज्ञ तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म ।
नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ॥—ज्ञानेश्वरी.

नामें होइजे विरक्त । नामें निर्मळ होय चित्त ।
नामें साधे गुणातीत । नामें निर्मुक्त भवपाश ॥—ए. भा.

नामें अज्ञान नासे । नामें आत्मा प्रकाशे ।
पावले जीवन्मुक्तदशे । नामेंचि करूनी ॥—य. दी.

बहू चांगलें नाम या राघवाचें । अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें । जिवा मानवा हेंचि कैवल्य साचें ॥

—श्री समर्थ.

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें ॥
नलगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥
ठायींच बैसोनी करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥
रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥
याविण असतां आणीक साधन । वाहातसें आण विठोबाची ॥
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि । शहाणा तो धणी घेतो येथें ॥

या देहीं नामचि सार । त्याविणें सर्व असार ॥ ध्रु० ॥
नामें तरले शुकसनकादिक । संत ते बहुत अपार ॥ १ ॥
तरला वाल्हा महत्पापि जो । चोखामेळ महार ॥ २ ॥
गर्जुनि शास्त्रें वेद पुराणें । सांगति मुक्तिविचार ॥ ३ ॥
शंकर म्हणे तुम्हि निजहित चिंतुनि । त्यागा दृश्य-विकार ॥ ४ ॥

( २ ) गुरूपासूनि घ्यावें ज्ञान । मग तो ईश्वर म्हणोनी त्याचें भजन । त्या भजनें बाणतसे समाधान । जें उपदेशिलें तें ज्ञानचि बिंबतें

श्रुति म्हणे ॥

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥—श्रीवामनपंडित.

गुरु भगवंत दोन्ही एक । येणें भावें निजनिष्टंक ।
भजे तोचि गुरुसेवक । येरू तो देख अनुमानी ॥
सद्गुरूचें निजनाम एक । निवारी बाधा महादोख ।
वैराग्य उपजवी अलौलिक । तेणें होय निजसुख साधकां ॥

—श्रीएकनाथमहाराज.

जे सद्गुरूचें नाम जपती । नाम त्यां देतें मुक्ती ।
मोक्ष रोकडा त्यांचे हातीं । नाम देतें हें सत्य ॥—श्रीनारायणमहाराज

याप्रमाणें श्रीभाईंनीं या संप्रदायाचा विस्तार करून शेंकडों लोकांस भक्तिमार्गास लाविलें व बऱ्याच लोकांचा बोध करून उद्धार केला. परंतु त्यांचा एक विशेष गुण असा होता कीं जी जी गोष्ट ते लोकांस शिकवीत तिचें ते स्वतः आचरण करून दाखवीत असत. म्हणून त्यांच्या शिक्षणाचा लोकांच्या मनावर विशेष परिणाम होई. सारांश 'आधीं केलें मग सांगितलें' या म्हणीप्रमाणें ते वागत असत. 'बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ॥' हें म्हणणें अशा रीतीनें वागणाऱ्या सत्पुरुषासच

लागू पडतें. अशा रीतीनें शेवटचें दुखणें येईपर्यंत त्यांनीं लोकांस ज्ञानामृत पाजून त्यांच्यावर अगणित उपकार केले.

हें चरित्र इतक्या घाईनें कां प्रसिद्ध केलें असा कोणी आक्षेप घेईल याकरितां त्याचीं कारणें काय आहेत तीं पुढें दिलीं आहेत:—

(१) श्रीभाई नेहमीं सांगत असत कीं कोणतीहि चांगली गोष्ट करावयाची असल्यास ‘ शुभस्य शीघ्रं ’ या उक्त्यनुरूप म्हणजे होईल तितक्या लौकर करावी. लांबणीवर टाकूं नये. ह्या शिकवणीला अनुसरून हें चरित्र निदान त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या दिवशीं प्रसिद्ध व्हावें अशी योजना केली आहे.

(२) श्रीभाईंच्या संमतीनें सद्भक्तिप्रसारक मंडळीचे जे नियम मंजूर झाले आहेत त्यांपैकीं ३ ऱ्या नियमाच्या ध्येयाला धरून हें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें आहे. तो नियम असा:—

‘ ज्या साधुसंतांनीं व सत्पुरुषांनीं भागवत धर्माचें आचरण करून त्याचा प्रसार केला, आणि चित्तशुद्धि करण्याच्या इतर मार्गापेक्षां भक्तिमार्ग किती श्रेष्ठ आहे हें जगांत जाहीर केलें, त्यांचीं चरित्रें व त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध करणें, आणि त्यांच्या सन्मानार्थ योग्य स्मारकें स्थापणें.’

(३) ही भगवत्सेवाच आहे कारण श्रीएकनाथमहाराज पुढील ओंव्यांत म्हणतात कीं भक्ताचे गुणानुवाद करणें इतकेंच नव्हे, तर नुसतें स्मरण करणें देखील भगवंताला अति प्रिय आहे.

ऐसीया भक्तांचें दर्शन । झाल्या तरती हें नवल कोण ।
त्यांचें करितां नामस्मरण । उद्धरण जडजीवां ॥
यालागीं उद्धवाचें नांव घेतां । श्रीकृष्ण निवारी भवव्यथा ।
ऐशी भक्तप्रीती भगवंता । भक्तांतें स्मरतां हरि तारी ॥—ए. भा.

(४) देव व भक्त एकच असल्यामुळें ( ' देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥ ' ) त्यांचें गुणवर्णन केल्यानें कविवर्यांनीं पुढील गीतांत म्हटल्याप्रमाणें अंतःकरणाला शांति मिळते हा फायदा आहे:—

तुझि कथासुधा तापल्या जना । निववि अंतरीं, विश्वजीवना ! ॥
अमृत निंदिती स्वर्गींचें हरी । तव कथामृता वंदिती जनीं ॥—वा. पं.

स्तुति करुनि तुझी तुजला आम्ही अज्ञान काय बा ! रिझवूं ? ।
गावुनि अमृतगुणांतें हृदयींचे ताप आपुले विझवूं ॥

(५) ' प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला । तो नर भला भला ॥ ' या पदांत शिवदिनकेसरी यांनीं म्हटल्याप्रमाणें श्रीभाईंनीं उत्तम रीतीनें प्रपंच करून परमार्थाचें अंतिम ध्येय जो वैकुंठवास तो प्राप्त करून घेतला हें आपण त्यांच्या चरित्राच्या परिशीलनानें शिकावें, व त्यांनीं जो कित्ता आपणापुढें ठेविला आहे तो गिरवून त्याप्रमाणें आचरण करून त्यांच्या कृपाप्रसादानें आपणहि ती उत्तम गति प्राप्त करून घ्यावी. ' स्वजनधन-स्त्रीपुत्रांसा । नांदोनि तो नातळे त्यांसी । स्वप्नघरवात जागृता जैशी । तैसा साधूसी संसारू ॥' ह्या ओवींत श्रीनाथांनीं सांगितल्याप्रमाणें श्रीभाई प्रपंचांत वागत असत, म्हणून त्यांना इतकें श्रेष्ठ पद प्राप्त करून घेतां आलें हें हें वर्म सर्वांनीं लक्षांत ठेवावें.

शेवटीं हें चरित्र तयार करण्याच्या कामीं श्रीयुत श्रीनिवास नारायण कर्नाटकी व श्रीयुत माधव गोविंद ऊर्फ बाबुराव भिडे यांनीं ज्या उपयुक्त सूचना केल्या व बहुमूल्य मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद, एम्. ए., यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन आपल्या ' तात्त्विक पुरस्कारांत ' श्रीभाईंचें चरित्र व मुख्य ग्रंथ वाचून त्यांच्या शिकवणीचें वैशिष्ट्य व त्यांच्या ग्रंथांचें संग्राहकत्व

यांचें अत्यंत मार्मिकपणें विवेचन करून भक्तिज्ञानाची विद्वत्ताप्रचुर व सूत्ररूपानें मीमांसा केली आहे, याबद्दल सद्भक्तिप्रसारकमंडळ त्यांचें सदैव ऋणी राहील. तसेंच आमचे मित्र विद्वान् लेखक व कवि श्री. ऋग्वेदी यांनीं चरित्रास जोडण्यास प्रेमानें पुष्पांजलि पाठविली आहे याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

तसेंच तत्त्वविवेचक छापखान्यांतील मंडळींचे, व विशेषतः श्री. शं. भि. दामले यांचे, पुस्तक उत्तम रीतीनें, व्यवस्थितपणें व वेळेवर छापून दिल्याबद्दल आभार मानतों.

॥ सद्गुरुचरणार्पणमस्तु ॥

# अर्पणपत्रिका

संतांनीं आंखून दिलेल्या भक्तिप्रेमाच्या मार्गासाठीं
त्यांच्या अंतःकरणांत वसत असलेली कळकळ व निष्ठा
आणि त्याच्या प्रसारार्थ केलेले दीर्घोद्योग मनांत आणून
भक्तजनोद्धारैकानिष्ठ जोगेश्वरीनिवासी

**श्री सद्गुरु रामचंद्र शंकर टाकी महाराज**

**ऊर्फ श्री भाई**

यांच्या परमपूज्य चरणकमलीं
त्यांच्याच कृपेची कृति अशी ही अल्पसेवा
अत्यंत भक्तिविनयादरपूर्वक

अर्पण असो.

संतदासानुदास
**आनंदराव सदाशिव दळवी.**

# अनुक्रमणिका.

## प्रकरणें.


| क्रमांक | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | उपोद्घात ... ... ... ... | १ |
| २ | मातापितरांसंबंधीं माहिती ... ... ... | २ |
| ३ | जन्म, बालपण व शिक्षण ... ... ... | ५ |
| ४ | सरकारी नोकरी ... ... ... ... | १० |
| ५ | पेन्शन घेतल्यावर ... ... ... ... | १७ |
| ६ | ज्ञानरवि-उदय ... ... ... ... | २४ |
| ७ | विषयविरक्ति–सहिष्णुता ... ... ... | २८ |
| ८ | श्रीभाईचें बुद्धिस्वातंत्र्य ... ... ... | ३३ |
| ९ | श्रीभाईंनीं काय शिकविलें ? ... ... ... | ४० |
| १० | ग्रंथरचना ... ... ... ... | ५९ |
| ११ | लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी ... ... ... | ६३ |
| १२ | उपसंहार ... ... ... ... | ७५ |


## परिशिष्टें.


| क्रमांक | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | जीवनक्रमांतील कांहीं संस्मरणीय गोष्टी ... ... | ८१ |
| २ | तीर्थयात्रेंत भगवंतांनीं वेळोवेळीं कसें साहाय्य केलें ... | ८३ |
| ३ | श्रीभाईचीं निवडक कवनें ... ... ... | ९० |
| ४ | प्रवचनांचे नमुने | |
| | (१) ज्ञानदाता सद्गुरु व तत्त्वज्ञानी ... ... | १०३ |
| | (२) सद्भक्तिपंथ ... ... ... ... | १२० |


## छायाचित्रें.


| | पृष्ठ |
|---|---|
| परमपूज्य गुरुवर्य श्री रामचंद्र शंकर टाकी महाराज उर्फ श्री भाई ( मुखचित्र ) | |
| श्री शंकर व्यंकटेश टाकी ऊर्फ श्री बाबा ... ... ... | २ |
| श्री दत्तपंचायतन ... ... ... ... | १७ |
| श्री वामनपंडितांची समाधि ... ... ... | २१ |
| श्री भाईच्या हस्ताक्षराचा नमुना ... ... ... | ५९ |
| परमपूज्य गुरुवर्य श्री रामचंद्र शंकर टाकी महाराज ऊर्फ श्रीभाई ... | ६९ |

# प्रकरण पहिलें.

## उपोद्घात.

श्री रामचंद्र शंकर टाकी ऊर्फ टाकी महाराज हे एक फार विद्वान्, कर्तव्यतत्पर, धर्मशील व साधुवृत्तीचे पुरुष होऊन गेले. ते मुंबई यूनिव्हर्सिटीचे पदवीधर असून सरकारी शिक्षण खात्यांत नोकरीवर होते. ते त्या खात्यांत डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या हुद्द्यापर्यंत वाढून त्यांनीं वीस वर्षें त्या हुद्द्यावर काम केलें. त्यांच्या नोकरींतला विशेष हा कीं, त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पूर्ण विश्वास संपादन केल्यामुळें ते अधिकारी शिक्षणाच्या बाबतींत वरचेवर त्यांचा सल्ला घेत असत. भाईंच्या नोकरींतला दुसरा विशेष हा होता कीं ते वरिष्ठांशीं जसे निःस्पृहपणानें वागत असत तसेच ते हाताखालील लोकांशीं प्रेमळपणानें वागत असत. म्हणून ते वरिष्ठ व हाताखालचे लोक या दोन्ही वर्गांना सारखेच प्रिय असत. याप्रमाणें अठ्ठावीस वर्षें नोकरी केल्यानंतर भाईंनीं दोन वर्षांची फर्लो घेतली व कांहीं तीर्थयात्रा केल्या, आणि मग सन १९११ सालीं त्यांनीं पेन्शन घेतलें.

पण भाईंनीं आपली खरी कामगिरी पेन्शन घेतल्यानंतरच यथाशक्ति केली. म्हणजे त्यांनीं आपलें उरलेलें आयुष्य ईश्वरसेवेंत घालविलें व ती सेवा करीत असतांना धार्मिक विषयांवर त्यांनीं कांहीं ग्रंथ रचले व प्रवचनांच्याद्वारें जमणाऱ्या भाविक लोकांस बोधामृत पाजिलें. याप्रमाणें त्यांनीं शेवटचीं पंचवीस वर्षें परमेश्वराच्या सेवेंत घालवून आपलें आयुष्य सार्थकीं लावलें व मग त्यांनीं देह ठेविला. अशा निःसीम भगवद्भक्ताला अंतीं वैकुंठवास मिळाल्याशिवाय कसा राहील ? असो.

सदरील कारणांमुळें श्री भाईंचें चरित्र पुष्कळांस अत्यंत अनुकरणीय वाटेल याबद्दल शंका नाहीं. सबब त्यांचें चरित्र आतां प्रकरणशः देऊं.

# प्रकरण दुसरें.

## मातापितरांसंबंधीं माहिती.

श्री टाकीमहाराज ऊर्फ श्री भाई यांचे आईबाप हीं फार सच्छील माणसें होतीं. अशा आईबापांच्या पोटीं जन्मास येणें हें मोठ्या भाग्याचें लक्षण आहे असें गीतेच्या पुढील श्लोकांत म्हटलें आहे:—

" प्राप्य पुण्यकृताँल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥
अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥"

सबब त्यांच्याविषयीं इकडे चार शब्द लिहितों.

भाईचे वडील श्री शंकरराव व्यंकटेश टाकी. त्यांना बाबा म्हणत असत. गोमांतकांतील "कुसमण" ह्या गांवीं त्यांचा सन १८३० सालीं जन्म झाला. त्याच गांवांत त्यांचें प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर ते पुढील शिक्षणाकरितां मुंबईस आपल्या बहिणीकडे राहावयास गेले. तिकडे एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें शेठ दादाभाई नवरोजी व डॉ. भाऊ दाजी अशा विद्वान् शिक्षकांच्या हाताखालीं त्यांचें शिक्षण पुरें झाल्यावर त्यांनीं अकौंटंट जनरलच्या ऑफिसांत नोकरी धरली. तेथून त्यांची पुढें बाहेरगांवीं बदली झाल्यामुळें खानदेश, कारवार वगैरे जिल्ह्यांतील मुख्य कलेक्टरांच्या कचेरींत हेड अकौंटंटच्या जागीं त्यांनीं कांहीं वर्षे काम केल्यानंतर सन १८८३ मध्यें पेन्शन घेतलें.

बाबा मुंबईंत पहिल्यानें पोपटवाडींत राहात असत. ते राहात होते त्याच घराच्या तळमजल्यावर श्रीराधाकृष्ण राघोबा तोरणे या नांवाचे एक गृहस्थ राहात असत. ते फार सात्त्विक वृत्तीचे गृहस्थ

श्री शंकर व्यंकटेश टाकी
ऊर्फ श्री बाबा



असून त्यांचें आध्यात्मिक विषयांचें वाचन, चिंतन वगैरे नेहमीं चालू असे. श्रीराधाकृष्ण व श्रीबाबा यांचा पहिल्यानें बेताचाच परिचय होता. परंतु एके दिवशीं सद्गुरु राधाकृष्ण तोरणे यांच्या आग्रहावरून बाबा त्यांच्या-जवळ बसले. त्यांचें बरेंच भाषण झाल्यावर बाबांचा पूर्वसंस्कार उदयास येण्याची वेळ ( तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।—भ. गी. ) आल्या-मुळें त्या बैठकींतच त्यांना अनायासें आत्मज्ञानाचा लाभ झाला. पुढें अशी एकदां सुरवात होतांच बाबांचा एतद्विषयक व्यासंग वाढत चालला व त्यांत ते चांगले तरबेज झाले. ते इतके कीं, केव्हां केव्हां असें घडे कीं, बाबा ईश्वराच्या चिंतनांत गुंतले म्हणजे त्यांचें व्यवहाराकडे लक्षच नसे. एकदां असें झाल्याचें सांगतात कीं, ते ऑफिसांत काम करीत असतां त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. पांडुरंग गणोबा ( Examiner of Claims ) हे कांहीं कामाकरितां त्यांच्या टेबलाजवळ आले आणि पाहतात तों शंकरराव बाबा हे देहभानावर नसून त्यांचें हातानें काम बिनचूक चालू होतें ! अर्थात् तो प्रकार पाहून ते वरिष्ठ अधिकारी आश्चर्यचकित झाले, परंतु वरील प्रकारामुळें श्री. पांडुरंग गणोबा यांची शंकररावबाबांच्या—आध्यात्मिक दृष्टीनें—योग्यतेविषयीं खात्री झाली व ते मग अखेरपर्यंत बाबांशीं अत्यंत प्रेमानें व आदरानें वागूं लागले.

बाबांनीं सन १८८३ मध्यें पेन्शन घेतलें हें मागें सांगितलेंच आहे. ते मग कारवार येथें राहूं लागले. त्यावेळीं म्युनिसिपालिट्यांची रचना नवीन कायद्याप्रमाणें झाल्यामुळें, बाबांची इच्छा नसतांहि, सरकारनें त्यांना कारवार म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष नेमलें. त्यांनीं तें काम सन १८८९ पर्यंत केलें. बाबा ह्या अधिकारावर होते त्या मुदतींत त्यांनीं शक्य तितकें लोकहित साधण्याचा प्रयत्न केला आणि ते सरकारास व लोकांसहि सारखेच प्रिय झाले. मग ते मुंबईस आले व तेथें कांहीं दिवस राहिल्यावर त्यांनीं

मुंबईच्या जवळच शिव ( Sion ) येथें जागा घेऊन तेथें घर बांधलें. ते मग अखेरपर्यंत तेथेंच राहात होते, व तेथेंच ते ५ जून सन १९०२ सालीं वैकुंठवासी झाले.

भाईंच्या मातोश्री सौ. पार्वतीबाई या देखील फार सत्त्वशील वृत्तीच्या बाई होत्या, व त्यांनाहि श्रीसद्गुरु तोरणे यांचा अनुग्रह झाला होता. भाईंचें सुमारें एकोणीस वर्षांचें वय झालें होतें तेव्हां त्या बाईच्या प्रकृतींत क्षीणता वाटूं लागल्यामुळें त्यांना गोव्यास श्रीमंगेशीं हवा पालटण्याकरितां नेण्यांत आलें होतें. पुढें मग उन्हाळ्याच्या सुट्टींत भाई आपल्या मातोश्रीच्या भेटीस गेले व त्यांना पाहतांच अर्थात्‌च त्या बाईंना फार समाधान वाटलें. तदनंतर बाईंना कारवारास परत नेण्यांत आलें. परंतु अखेर त्यांना आराम वाटावा याकरितां केलेल्या सर्व खटपटींचा कांहींएक उपयोग न होतां त्या बाईंचें कारवारास देहावसान झालें. त्या बाई फार प्रेमळ होत्या व देवावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. त्यामुळें अंतकाळीं त्यांनीं श्रीमंगेशाची हात जोडून प्रार्थना केली व भाईंना उद्देशून ‘ तूंच ह्या बाळाचें संरक्षण करणारा आहेस,’ असें सद्गदित होऊन म्हटलें आणि देह ठेवला! स्वतः भाई हे त्यावेळीं जवळ नव्हते. परंतु तो सर्व प्रकार मग त्यांना विदित झाला. अर्थात्‌ तो ऐकून भाईंना गहिंवर आला हें ठीकच होतें. त्यांचें मन ईश्वरभक्तीकडे पूर्वींच वळूं लागलें होतें. त्यांत मातोश्रीच्या अंतकाळच्या भक्तियुक्त वर्तनानें भर पडून त्यांचें मन ईश्वरभजनांत मग जास्त स्थिर होऊं लागलें.

शंकररावबाबांनीं द्वितीय संबंध केला होता. तरी भाई हे सख्या मातोश्रींशीं वागत तसेच सावत्र आईशीं देखील प्रेमानें व आदरानें वागत असत. त्या बाईंचें सन १८९२ मध्यें श्रीमंगेशीस प्राणोत्क्रमण झालें.

तात्पर्य, अशा सात्त्विक वृत्तीच्या मातापितरांच्या पोटीं जन्म घेणें—जरी हें कोणाच्या स्वाधीनचें नसलें तरी—हें भाग्याचें लक्षण समजलें पाहिजे. तें भाईंना लाभलें होतें यांत संशय नाहीं.

# प्रकरण तिसरें.

## जन्म, बालपण व शिक्षण.

श्री भाईंचा जन्म मुंबईस ता. १ ऑगस्ट सन १८५७ रोजीं झाला. त्या वर्षी मुंबईस पाऊस न पडल्यामुळें पाण्याचें दुर्भिक्ष बरेंच भासत होतें. पण भाई जन्मले त्यावेळीं बराच पाऊस पडला व हवेंत गारवा आला. तेणें-करून अर्थात् पाण्याचें दुर्भिक्ष कमी झालें. त्याचप्रमाणें भाईंचे वडील शंकररावबाबा यांस त्याच सुमारास नोकरींत बढती मिळाली.

भाईंचें पाळण्यांतलें नांव 'भिकू' होतें. पुढें त्यांना घरची मंडळी 'वामन' या नांवानें हांक मारूं लागली. कांहीं दिवसांनीं भाई आजारी पडले व त्यांना फार त्रास होऊं लागला. तेव्हां त्यांच्या वडिलांनीं ठरविलें कीं, हा बरा झाल्यावर त्याला चुलत्याचें नांव 'रामचंद्र' हें ठेवून तेंच पुढें चालवूं. त्याप्रमाणें नंतर कागदोपत्रीं 'रामचंद्र' हेंच नांव चालूं लागलें. भाईंचें संध्येंतलें नांव 'योगेश्वर' होतें. भाईंचें कै. रा. ज्ञानेश्वर शाळिग्राम वागळे यांच्या मुलीशीं लग्न झालें व तिचें 'लक्ष्मी' असें नांव ठेवण्यांत आलें. लक्ष्मी ही विष्णूचीच अर्धांगी असल्यामुळें विष्णुरूपी 'योगेश्वराची' पत्नी 'लक्ष्मी' व्हावी हें योग्यच होतें.

भाईंच्या घराण्याचें 'टाकी' हें नांव कसें पडलें याविषयीं त्यांनीं एकदा खुलासा केला होता. त्यावेळीं त्यांनीं आपल्या घराण्याच्या मूळ पुरुषास प्रथम आर्यारूपानें खालीं लिहिल्याप्रमाणें नमन करून आरंभ केला:—

"जय पुरुषा! श्रीपुरुषा! 'टाकि' कुळाचा धरूनि अभिमान ॥
रक्षिशि आम्हां सकळां यास्तव करितों सदा तुतें नमन ॥ १ ॥
'टाकी' म्हणजे 'त्यागी' स्वानंदीं तृप्त टाकुनी विषयां ॥
अमवास्येशीं पुजितां देवविसी बोध वारुनी माया ॥ २ ॥"

त्या पुरुषाचा फार मोठा अधिकार असे. त्याचें आपल्या मुलीवर फार

प्रेम असे. म्हणून तो बरींच वर्षें मुलीकडे गोव्यांत मंडुरकरांच्या घराण्यांत राहात असे. तेथें त्याची पूजाअर्चा यथासांग होत असे, व तो मंडुरकरांच्या घराण्याचें संकटापासून रक्षण करीत असे. पुढें परिस्थिति बदलल्यामुळें त्या पुरुषाविषयीं हयगय होऊं लागली. नंतर कांहीं वर्षांनीं भाई श्रीमंगेशीस गेले होते तेव्हां त्या पुरुषानें भाईंबरोबर मुंबईस येण्याची इच्छा दर्शविली. त्याप्रमाणें भाईंनीं श्री मंगेशाची आज्ञा घेऊन ते त्या पुरुषास आणूं लागले तेव्हां मंडुरकरांस—ज्यांच्या घरीं तो पुरुष राहात होता त्यांस—फार वाईट वाटलें व त्यांनीं त्यास म्हटलें कीं, "देवा, तूं आतां चाललास तर आमचें पुढें कसें होईल?" तेव्हां त्यानें त्यांना आश्वासन देऊन सांगितलें कीं, "तुम्हांस संकट पडेल तेव्हां माझें स्मरण करून माझ्या नांवानें एक नारळ ठेवा, म्हणजे तुमच्या संकटाचें निवारण होईल." पुढें मंडूरकरांना याचा अनेक वेळीं प्रत्यय आला व ते सुखासमाधानानें राहूं लागले.

भाईंच्या बालपणांत घडलेली एक गोष्ट इकडे सांगण्यासारखी आहे. शंकररावबाबा व मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर भाऊ दाजी यांचें गुरुशिष्यांचें नातें होतें. पण पुढें उभयतांचा बराच परिचय होऊन त्यांचा चांगला स्नेह जमला. सन १८५८ सालीं महाराणी व्हिक्टोरिया यांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यावर मुंबईस राणीचा बाग व सर्वपदार्थसंग्रहालय या संस्थांची भायखळ्यास स्थापना करण्यांत आली, हें सर्वश्रुत आहे. त्या सर्व कामांत डॉ. भाऊ दाजी यांचें प्रमुखत्वानें अंग होतें. याला कांहीं दिवस लोटल्यावर कलकत्त्याचे नामदार व्हाइसरॉय साहेब, लॉर्ड कॅनिंग, यांनीं एकदां मुंबईस भेट दिली. त्यावेळीं डॉ. भाऊ दाजी यांनीं त्या साहेबांना व मुंबईतील इतर पुढारी लोकांस मोठी थाटाची मेजवानी दिली. त्या प्रसंगीं डॉ. भाऊ दाजी हे स्वतः पुराणवस्तुसंशोधक असल्यामुळें त्यांनीं आपल्या घराजवळच्या बागेंत व विस्तीर्ण आवारांत मोठी रोशनाई केली होती व एक

प्रेक्षणीय असें पुराणवस्तूंचें प्रदर्शन भरविलें होतें. त्या समारंभाच्या गडबडींत अगदीं अल्पवयाचें बालक आमचे भाई (टाकीमहाराज) हे डॉ. भाऊंचा हात धरून गंमत पाहात हळू हळू हिंडत होते. व्हाइसरॉयसाहेबांनीं प्रदर्शन पाहिलें. पण एकदोन प्रेक्षणीय स्थळें त्यांच्या नजरेंतून चुकून राहिलीं व ते पुढें जाऊं लागले. तेव्हां डॉ. भाऊंचा हात धरून जाणाऱ्या बालकानें—भाईंनीं—तीं स्थळें बोटानें व्हाइसरॉय साहेबांस सहज खुणेनें दाखविलीं. तें पाहिल्याबरोबर त्या साहेबांस मुलाच्या हुशारीचें कौतुक वाटलें. मग मुलास एका टेबलावर बसवून डॉ. भाऊ दाजींनीं निमंत्रित पाहुणे मंडळीस फुलांचे हार घातले. त्यावेळीं व्हाइसरॉय साहेबांनीं आपल्या गळ्यांतील हार काढून त्या मुलाच्या ( भाईंच्या ) गळ्यांत घातला व ‘ मुलगा हुशार आहे ’ असे मुखावाटे उद्गार काढले. ही गोष्ट शंकररावबाबा केव्हां केव्हां सांगत असत.

भाईंचें सर्व शिक्षण मुंबईसच झालें. वडिलांच्या वर्तनाचा त्यांच्या बालमनावर परिणाम झालेला असल्यामुळें भाईंचें लहानपणापासूनच धर्माकडे लक्ष असे. ते आठ वर्षांचे असतांना त्यांच्या हातांत ‘नवनीत’ पडलें. त्यांतील मोरोपंतांच्या पुढील आर्या वाचतांच त्यांच्या मनावर विलक्षण प्रकारचा परिणाम झाला:

> “आतां प्रभो दयाळा मज दीनावरि करूनियां करुणा ॥
> स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो उगवुं दे कृपा अरुणा ॥ १ ॥
> सीतापते ! रघुपते ! विश्वपते ! भूपते वदान्यपते ॥
> इंद्रादिकीर्ति तुझिया कीर्तिपुढें तुच्छ सर्वदा लपते ॥ २ ॥
> दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी ॥
> बा जीवदान दे गा प्रभो ! उपेक्षा करूं नको माझी ॥ ३ ॥ ”

वरील प्रसंगाचें स्मरण झाल्यामुळें त्याला अनुसरून भाईंचीं ता. ६ व ७ ऑगस्ट सन १९२७ रोजीं जोगेश्वरीस दोन प्रवचनें झालीं. त्यावेळीं

मोरोपंतांचें गुणवर्णन करतांना त्यांनीं मयूरपंतांचें पुढीलप्रमाणें स्तवन केलें :—

“ मयूरपंत हो ! तुम्हीं हरिगुणवर्णनिं दिली मना गोडी ॥
तेणें आर्याछंदीं होउनि स्फूर्ती कधीं न ते सोडी ॥ १ ॥
संत परीक्षक झालां संपादुनि दास्यभक्ति चातुर्या ॥
आभारास्तव नमितों कर जोडूनी तुम्हां कवीवर्या ॥ २ ॥”

शाळेंत शिक्षण चालू होतें त्या मुदतींत घडलेली दुसरी एक गोष्ट इकडे सांगण्यासारखी आहे. त्यावरून भाईंचें अंतःकरण बालवयांत देखील किती दयार्द्र होतें हें दिसून येतें. भाई शाळेंत असतां त्यांचा एक सोबती वाटेनें जात असतां पडला व त्याच्या पायाला दुखापत होऊन बरेंच रक्त वाहूं लागलें. त्याबरोबर भाईंनीं त्याला उठवून, आपलें नवें धोतर फाडून त्याच्या पायाला पट्टी बांधली, आणि त्याला त्याच्या घरीं पोंचविलें ! घरची मंडळी नवें धोतर फाडल्याबद्दल रागावतील ही भीति होतीच. पण सर्व हकिकत ऐकल्यावर ती मंडळी रागावली तर नाहींच, पण त्यांना समाधान वाटलें यांत काय आश्चर्य ?

भाईंचें प्राथमिक शिक्षण पुरें झाल्यावर ते इंग्रजी शिकण्याकरितां सेंट झेवियर हायस्कूलमध्यें जाऊं लागले. त्या शाळेंत शिकलेल्या विद्यार्थ्यांचें इंग्लिश चांगलें असतें अशी प्रसिद्धि आहे. त्या शाळेंतूनच भाईंची मॅट्रिक परीक्षा पास झाल्यावर ते पुढच्या शिक्षणाकरितां एल्फिन्स्टन कॉलेजांत जाऊं लागले. तिकडे प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ यांच्या शिकविण्याचा भाईंना लाभ मिळाल्यामुळें त्यांचा फार फायदा झाला. कॉलेजांत असतांना भाईंना पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचे ग्रंथ वाचण्याची संधि मिळाली होती. पण पुढें आपले कांहीं प्राचीन ग्रंथ वाचावे अशी त्यांना इच्छा झाली व त्याप्रमाणें त्यांनीं ‘ भगवद्गीता,’ वामनपंडितांची ‘ यथार्थदीपिका ’ व इतर संतवाङ्मय यांचें

परिशीलन चालविलें. ह्या काळांत त्यांना एकदा ‘ आपण आय्. सी. एस्. ( I. C. S. ) चा अभ्यास करावा ’ अशीहि इच्छा झाली होती पण पुढें त्यांची बी. ए. ची परीक्षा नापास झाल्यामुळें तो विचार तसाच राहिला. इतकेंच काय, पण मग बी. ए. ला देखील पुन्हां बसूं नये असें त्यांना वाटूं लागलें. परंतु बाबांनींच जेव्हां ‘ तूं बी. ए. होणारच; तर परीक्षेला बस ’ असें निक्षून सांगितलें, तेव्हां ते त्या परीक्षेला बसले व सन १८८२ मध्यें पास झाले. नंतर ते एम्. ए. च्या परीक्षेला बसले होते, पण त्या परीक्षेंत ते पास झाले नाहींत.

यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, सबंध शिक्षणक्रमांत त्यांची दुसरी भाषा लॅटिन होती. संस्कृतचा त्यांनीं पुढें थोडासा अभ्यास केला, व गीता, उपनिषदें वगैरे ग्रंथांतील कित्येक भाग पाठ करून टाकले.

# प्रकरण चवथें.

## सरकारी नोकरी.

श्री भाईंनीं सन १८८१ सालींच—म्हणजे त्यांची बी. ए. ची परीक्षा होण्यापूर्वींच—कारवार येथील सरकारी हायस्कुलांत नोकरी धरली. तेथें असतांनाच त्यांची सन १८८२ मध्यें बी. ए. ची परीक्षा पास झाली व पुढच्या वर्षीं त्यांनीं ती पदवी घेतली.

आपलें काम लक्षपूर्वक करण्याचा भाईंचा स्वभाव असल्यामुळें व प्रो. वर्डस्वर्थ साहेबांच्या शिकविण्याचा लाभ मिळून स्वतः भाईंना शिकविण्याची हातोटी चांगली साधल्यामुळें त्यांच्या शिकविण्यापासून विद्यार्थ्यांचा फायदा होऊं लागला व साहजिकच त्यांचें त्यांचेवर प्रेम बसूं लागलें. प्रो. वर्डस्वर्थ हे प्रसिद्ध आंग्ल कवि वर्डस्वर्थ यांचे नातू असल्यामुळें ते त्या कवीची कविता उत्तम रीतीनें शिकवीत असत असें म्हणतात. त्या शिकविण्याचा फायदा मिळाल्यामुळें भाईंना इंग्लिश—व त्यांतून इंग्लिश कविता—फार मार्मिकपणानें शिकवितां येत असे.

भाईंच्या वेळीं कारवार हायस्कुलांत रा. रा. बाबा गर्दे या नांवाचे एक शिक्षक काम करीत असत. त्यांनीं विद्यार्थ्यांकडून भाईंच्या शिकविण्याच्या हातोटीविषयींची स्तुति ऐकून ते स्वतः भाई शिकवीत असतांनाच त्यांच्या वर्गांत एकदोन वेळां जाऊन बसले व भाईंची विषयाशीं तादात्म्य होऊन शिकविण्याची पद्धत पाहून ते फार थक्क झाले.

कालिदासानें शिक्षक कसा असावा हें उत्तम रीतीनें एका ठिकाणीं दाखविलें आहे:—

" शिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था
संक्रांतिरन्यस्य विशेषयुक्ता ।
यस्योभयं साधु स शिक्षकाणाम्
धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ॥ "

एकाद्याच्या अंगीं चांगली विद्वत्ता असली तरी त्याला चांगलें शिकवितां येत नसतें. दुसऱ्या एकाद्या गृहस्थाची विद्वत्ता बेताबाताची असली तरी त्याला उत्तम रीतीनें शिकवितां येत असतें. कालिदास म्हणतो कीं, ज्याला या दोन्ही गोष्टी--विद्वत्ता व शिकविण्याची कला--साध्य झाल्या आहेत तोच उत्तम शिक्षक होऊं शकतो. हे दोन्ही गुण भाईंचे अंगीं वसत होते. विषयाची चांगली माहिती व तो विद्यार्थ्यांच्या बुद्धीला पटेल अशी शिकविण्याची हातोटी या दोन्ही गोष्टी भाईंना साधलेल्या असल्यामुळें त्यांचें शिकविणें उत्तम व्हावें यांत आश्चर्य नाहीं.

भाई हे केवळ वर्गांत शिकवूनच थांबत नसत. जरूर पडल्यास विद्यार्थ्यांना कांहीं मोबदला न घेतां ते फुरसतीच्या वेळीं खासगी रीतीनेंहि शिकवीत असत.

याप्रमाणें आठ वर्षें कारवार हायस्कुलांत भाईंनीं काम केल्यावर सन १८८९ मध्यें त्यांची मुंबईस डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या हुद्दयावर बदली झाली. ते त्या जागेवर पुढें वीस वर्षें होते. भाईंनीं कारवार सोडतेवेळीं तिकडील सर्व मास्तरांना फार वाईट वाटलें, तें बरोबरच होतें. हेडमास्तर मि. कॉस्टा यांना तर भाई गेल्यानें आपला एक हातच मोडला असें वाटलें, व तसें त्यांनीं बोलूनहि दाखविलें.

मुंबईत डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते त्या मुदतींत भाईंच्या अंगचे कांहीं अमोलिक गुण त्यांच्या वरिष्ठांच्या नजरेस आल्यामुळें त्यांचा त्यांजवर ( भाईंवर ) जो एकदा विश्वास बसला तो अखेरपर्यंत कायम होता, त्यामुळें भाईंच्या हातून शिक्षणखात्यांत कांहीं कांहीं चिरसंस्मरणीय अशीं कामें झालीं आहेत.

मुंबईच्या शाळांतील मुलांच्या शिक्षणाची पद्धत त्या वेळपर्यंत नियमबद्ध अशी नव्हती, व मुलांस लवकर लवकर इंग्रजी शिकवावें

असें बऱ्याच लोकांस वाटत असे. पण ती इंग्रजी भाषा चांगली स्वाधीनची होण्यास मातृभाषेचें पायाशुद्ध शिक्षण प्रथम झालें पाहिजे या गोष्टीकडे पालकांचें तेवढें लक्ष नसे. परंतु ह्याचा एकंदरींत परिणाम मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीनें फार घातुक होत असे. त्यामुळें भाई डे. ए. इन्स्पेक्टर असतांना, त्यांनीं त्यावेळच्या सर्व परिस्थितीचें नीट अवलोकन करून वरिष्ठांमार्फत सरकारास असा रिपोर्ट केला कीं, मातृभाषेचें निदान चार इयत्तांचें शिक्षण झाल्याशिवाय मुलांस इंग्रजी शाळेंत घेऊं नये. आश्चर्याची किंवा दु:खाची गोष्ट ही कीं, मुंबईंतील पुष्कळ लोक व सेक्रेटरी-एटमधील त्यावेळचे कांहीं अधिकारी देखील या सूचनेच्या विरुद्ध होते !! तरी सरकारानें भाईंची सूचना मान्य केली व तेव्हांपासून मराठी चार इयत्ता पूर्ण झाल्याचा दाखला हजर करण्याबाबतचा जो शाळाखात्याचा नियम झाला तो अद्याप कायम आहे. मातृभाषांना उत्तेजन द्यावें व त्यांचें महत्त्व वाढवावें याबद्दल गेलीं कांहीं वर्षें बरीच चळवळ चालू आहे. पण त्या चळवळींत सामील झालेल्या लोकांपैकीं किती जणांना भाईंची वर सांगितलेली अगदीं आरंभींची कामगिरी माहीत आहे ? असो.

पुढें कांहीं दिवसांनीं मुंबईस संयुक्त शाळा मंडळ ( Joint School Board ) स्थापन करण्यांत आलें. ह्या बोर्डाच्या ताब्यांतील प्राथमिक शाळांकरितां भाईंनीं जो अभ्यासक्रम आंखून दिला आहे तो अद्याप चालू आहे.

मिस्टर एस्. एम्. एडवर्ड्स् यांनीं मुंबई शहराविषयीं सर्व प्रकारची ज्यांत माहिती आहे असा ‘ Gazetteer ’ ( गॅझेटीयर ) हा फार उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध केला आहे हें सर्वांस माहीत आहेच. त्यांतील मुंबई शहरांतील ‘ शिक्षणाचा इतिहास ’ हा जो भाग आहे तो भाईंनींच लिहिला आहे. तो भाग भाईंनीं जरी आपलीं इतर कामें संभाळून लिहिला होता तरी तो सदरील साहेबांस इतका पसंत पडला कीं, त्यांनीं त्याबद्दल भाईंची योग्य

शब्दांत स्तुति केली होती व त्यांना योग्य पारितोषिकहि दिलें होतें.

भाई मुंबईंत नोकरीवर होते त्या मुदतींत त्यांचा ज्या ज्या लोकांशीं—मग ते हाताखालचे असोत किंवा इतर असोत—संबंध येत असे त्यांच्या बाबतींत त्यांची ( भाईंची ) किती क्षमाशील, निःपक्षपाती व दयाळू-पणाची वृत्ति असे हें पुढील उदाहरणांवरून स्पष्ट दिसून येईल.

भाईंच्या हाताखालीं एक मुसलमान गृहस्थ उर्दू शाळांचे असिस्टंट डेप्युटी असत. ते वेळेवर कधीं काम करीत नसत. त्यांचेकडून त्यांच्याच कामासंबंधीं कांहीं माहिती मागविली, रिपोर्ट करावयास सांगितलें, किंवा पत्रक तयार करावयास सांगितलें तर तीं कामें वेळेवर केव्हांहि होत नसत. भाईंनीं त्यांना परोपरीनें पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. ह्या गृहस्थाला तुम्ही रिपोर्ट करून बदलून टाका असें भाईंना कांहीं लोकांनीं पुष्कळ वेळां सुचविलें आणि सांगितलें कीं, त्याच्यामुळें तुम्ही पेंचांत याल. पण त्यांकडे भाईंनीं लक्ष दिलें नाहीं. पुढें जेव्हां भाईंच्या वरिष्ठांचीच प्रत्यक्ष एकदां गांठ पडली तेव्हां त्यांनीं आपण होऊनच त्याच्या बदलीची गोष्ट काढली असतां भाईंनीं त्यांना 'त्या इसमापासून मला त्रास होतो अशी मीं स्वतः आपल्याजवळ कधीं तक्रार केली आहे काय ?' असें उलट विचारलें. तें ऐकून तर वरिष्ठांस अर्थात्च आश्चर्य वाटलें. पण ते पुढें कांहीं बोलले नाहींत. तात्पर्य, भाईंच्या या क्षमाशील वृत्तीमुळें त्या इसमाचें नुकसान होण्याचें टळलें. इतकेंच नव्हे, तर भाईंनीं स्वतः पेन्शनवर जातेवेळीं त्याच्याबद्दल शिफारस करून त्याला सरकारकडून 'खानबहादुर' पदवी देवविली ! चुकार माणसांबद्दलहि इतकी उदार भावना किती वरिष्ठ अधिकारी लोकांमध्यें दिसून येईल ?

एकदां मुंबईंतील एका युरोपियन शाळेला दीड लाख रुपयांची देणगी

( ग्रँट ) मिळावी म्हणून त्या शाळेच्या अधिकाऱ्यांनीं गव्हर्नर साहेबांची शिफारस मिळवून डायरेक्टरकडे अर्ज केला. मग तें प्रकरण डे. ए. इन्स्पेक्टर या नात्यानें विचार करण्याकरितां भाईंकडे आलें व डायरेक्टर साहेबांनीं त्या युरोपियन गृहस्थांस सांगितलें कीं, मिस्टर टाकी ( भाई ) हे शिफारस करतील तेवढी रक्कम तुम्हांस देऊं. भाईंनीं प्रकरण वाचून आपला रिपोर्ट लिहिला व फक्त ग्रँटचा आंकडा घालण्याचा ठेवला होता; ते गृहस्थ मग भाईंना भेटण्यास आले. त्यावेळीं भाईंनीं त्यांना नियमांचें कोड दिलें व ग्रँटसंबंधाचा नियम दाखविला व म्हटलें कीं, " या नियमाचा तुम्ही अर्थ करा आणि तुम्ही माझ्या ठिकाणीं आहां असें समजून किती रकमेची शिफारस कराल तें सांगा." त्या गृहस्थानें विचार करून सांगितलें कीं, " मी पन्नास ते साठ हजारांची शिफारस करीन." त्याबरोबर भाईंनीं " मी तुमच्या शाळेकरितां पाऊण लाखाची शिफारस करण्याचें ठरविलें आहे." असें त्या गृहस्थास सांगितलें व तसा त्यांनीं रिपोर्ट केला. त्या युरोपियन गृहस्थांनीं लागलेच त्याबद्दल भाईंचे आभार मानले. त्यांना रक्कम शिफारशीप्रमाणें मिळाली हें उघडच आहे. इतका कांटेतोल निःपक्षपातीपणा विरळा !

भाई मुंबईंत नोकरीवर होते त्या मुदतींतच तेथें प्लेग सुरू झाला, तेव्हां प्लेगच्या निमित्तानें शाळा बंद ठेवाव्या लागल्या. मिस्टर मादन हे त्यावेळीं गुजराथी शाळांचे डे. ए. इन्स्पेक्टर होते. ते वास्तविक भाईंचे मित्र होते. पण त्यांना न कळवितांच मादन साहेबांनीं, शाळा बंद आहेत तोंपर्यंत मास्तरांना पगार देऊं नये असा आपल्या अधिकारांतच हुकूम काढला व तो स्कूल्स कमिटीकडे पाठविला. कमिटीला समाधान वाटलें व तिनें भाईंना देखील मराठी शाळांसंबंधानेंहि असाच हुकूम काढा, असा आग्रह चालविला. भाईंनीं तसा हुकूम काढला नाहीं. इतकेंच नव्हे तर

त्यांनीं कमिटींतील लोकांना आपलें म्हणणें समजावून सांगून, तसल्या अडचणीच्या वेळीं तसा हुकूम काढणें किती क्षुद्रपणाचें आहे हें स्पष्ट रीतीनें दाखवून दिलें. याचा परिणाम असा झाला कीं, मादन साहेबांना आपला हुकूम दुरुस्त करावा लागला व शाळामास्तरांना त्यांचा पगार मिळाला. अशी दयाशील वृत्ति किती जणांमध्यें दिसून येईल ?

असो. याप्रमाणें भाईंनीं अठ्ठावीस वर्षें नोकरी केल्यावर दोन वर्षांची फर्लो घेतली व त्या मुदतींत त्यांनीं कांहीं तीर्थयात्रा केल्या. पुढें 'आतां उरलेलें आयुष्य ईश्वरसेवेंत घालवावें' असा मनाचा निश्चय करून त्यांनीं सन १९११ सालीं पेन्शन घेतलें. त्यांनीं आणखी कांहीं काळपर्यंत खात्यांत राहावें अशी त्यांच्या वरिष्ठांची फार इच्छा होती. व ते तसे राहिले असते तर—त्याच सुमारास पगाराचें स्केल वाढल्यामुळें—त्यांचा फायदाहि झाला असता. पण भाईंनीं त्या वरिष्ठांना विनयपूर्वक आपला खरा हेतु कळविला व पेन्शनवर जाण्याचाच आपला निश्चय ठरल्याचें सांगितलें. भाईंना राजेसाहेबांकडून रौप्यपदक पूर्वींच मिळालें होतें. तथापि पेन्शनवर जातेवेळीं "तुम्हांला 'रावबहादुर' किंवा असलीच दुसरी एकादी पदवी देण्याविषयीं शिफारस करण्याची व 'फॉरेन एज्युकेशन ब्यूरो' च्या सेक्रेटरीची दरमहा शंभर रुपये पगाराची जागा देण्याची आमची इच्छा आहे" असें भाईंच्या वरिष्ठांनीं स्वसंतोषानें त्यांना कळविलें असतां त्यांनीं "यापैकीं कांहींच स्वीकारण्याची माझी इच्छा नाहीं" असें आदरपूर्वक त्यांना सांगितलें. भाईंच्या वरिष्ठांनीं त्यांची योग्यता अठ्ठावीस वर्षांच्या अनुभवानें पूर्णपणें ओळखलीच होती व ह्याचें निदर्शक म्हणून कांहीं तरी कृति करण्याची त्यांची फार इच्छा होती. पण तशा प्रकारच्या आमिषाला—तें सद्धेतुमूलक आमिषच म्हणावयाचें !—बळी न पडतां भाईंनीं जें वरिष्ठांस आभारपूर्वक 'नकारार्थी' उत्तर दिलें त्यांतच त्यांची खरी वैराग्यशील वृत्ति व्यक्त होते.

नोकरी संपून पेन्शन घेण्याची वेळ आली तरी मुदत मिळावी म्हणून, तसेंच ‘ रावसाहेबी ’ किंवा ‘ रावबहादुरी ’ मिळावी म्हणून कितीतरी लोक खटपट करीत असतात हें सर्वविश्रुत आहे. अशा स्थितींत वरिष्ठ अधिकारी आग्रह करीत असतांना मला हे मान किंवा मुदत नको असें म्हणणारे लोक किती निघतील? शेंकडा पांच तरी मिळतील काय?

आतांपर्यंत दिलेल्या वरील हकीकतीवरून भाईंनीं आपली नोकरी किती चोख, पण निःस्पृह रीतीनें केली हें स्पष्ट झालेंच आहे. पण त्यांच्यासंबंधानें समंजस लोकांना काय वाटत असे हें एकदोन उदाहरणें देऊन दाखविणें इष्ट वाटतें.

रावबहादुर दामोदर गणेश पाध्ये हे मुंबई येथील स्कूल्स कमिटीचे कित्येक वर्षें सेक्रेटरी होते. त्यांनीं एका प्रसंगीं भाईंविषयीं असे उद्गार काढले होते कीं, “ मिस्टर टाकी यांची काम करण्याची हातोटी मोठी अलौकिक होती. ते आपल्या वरिष्ठांना जसे प्रिय झाले होते तसेच ते हाताखालच्या मास्तरांनाहि प्रिय असत.”

मिस्टर मसानी, स्कूल बोर्डाचे सेक्रेटरी, यांचेंहि भाईंच्या कामाविषयीं असेंच मत होतें.

भाईंनीं सन १९०९ मध्यें जेव्हां फर्लो घेतली, तेव्हांच ती रजा संपल्यावर ते पेन्शनांत जाणार हें ठरल्यासारखेंच होतें. त्यामुळें त्यांनीं चार्ज सोडण्यापूर्वीं मुंबईंतील त्यावेळच्या शाळामास्तरांनीं वर्गणी काढून भाईंना एक थैली अर्पण करण्याची योजना केली होती. ह्याची बातमी भाईंना समजतांच त्यांनीं त्या थैलीचा स्वीकार करण्याची आपली इच्छा नाहीं असें त्या मास्तर मंडळीस आभारपूर्वक कळविलें. त्यांनीं मग त्या रकमेचा उपयोग भाईंच्या नांवें स्कॉलरशिप ठेवण्यांत केला, व त्या मार्गानें त्यांनीं भाईंविषयीं आदर व्यक्त करण्याची आपली इच्छा पूर्ण करून घेतली.

श्री दत्तपंचायतन


ॐ नमो भगवते वासुदेवाय.
ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इति स्मृतिः ॥
आर्या
ब्रह्मा विष्णु महेशा तुमचीं आहांत दत्तजी बाळें।
जनन का सर्वस्वें देउनि सद्भाव मृत्युसी आलें॥
'यशवंत' नाम तुम्हां यश गुण तुमचाच गावया लावीं।
यश गातां यश लाभे दासां जें भक्तिपंथही दावी॥

# प्रकरण पांचवें.

## पेन्शन घेतल्यावर.

**तो जेउति वास पाहे । तें दिग्मंडळ सुखाचें होये ।**
**तो जेथ कां उभा राहे । तेथ मुसावलें राहे महासुख ॥ ( ए. भा. )**

श्री भाई ऊर्फ टाकी महाराज यांनीं सन १९११ सालीं नोकरीचा चार्ज सोडून पेन्शन घेतलें हें मागें सांगितलेंच आहे. त्यांनीं मग पुढचें आपलें पंचवीस वर्षांचें उरलेलें सर्व आयुष्य ईश्वराच्या सेवेंत घालविलें. मध्यम स्थितींतले दुसरे पेन्शनर लोक साधारणपणें काय करीत असतात ह्या गोष्टीचा विचार केला म्हणजे खरोखरीच भाईंनीं आपलें आयुष्य सार्थकीं लावलें असेंच म्हणावें लागतें.

पण भाईंच्या अंगीं ही इतकी धर्मशील वृत्ति कशी बाणली याचा प्रथम विचार केला पाहिजे. खरें पाहिल्यास ही वृत्ति त्यांच्या ठिकाणीं वडिलांच्या संगतीनेंच उत्पन्न झाली कारण शंकरराव बाबा हेच त्यांचे धर्मगुरु होते. स्वतः भाईंनींच पुढीलप्रमाणें एकदां आपली गुरुपरंपरा सांगून त्यांचें स्तवन केलें आहे:—

श्री दत्तात्रेय
|
श्री नारायणमहाराज ( जालवणकर )
|
श्री नारायणमहाराज ( रत्नागिरीवासी )
|
श्री राधाकृष्ण तोरणे
|
श्री शंकरराव ऊर्फ बाबा

ब्रह्यानें दिधलें पूर्ण ब्रह्मज्ञान । विष्णूचें तें दान शुद्ध भक्ती ॥ १ ॥
अपूर्व वैराग्य दिलें शिवदेवें । तेणेंचि सर्वस्वें परिपूर्ण ॥ २ ॥
मागुती शास्त्रोक्त अत्रीनें जो केला । तेणें बोधें झाला गुणातीत ॥ ३ ॥

अनसूयें मातें असूया हरीली । षड्गुणा उरली काय ऊरी ॥ ४ ॥
"**दत्तात्रेय**" नाम बहू मनोहरू । तारी आद्यगुरु **नारायणा** ॥ ५ ॥
**नारायण** दूजे रत्नागिरीवासी । शरण आद्यांसी आले जेव्हां ॥ ६ ॥
दत्तदेवें दीला बोध स्वरूपाचा । अनुभव त्याचा देते झाले ॥ ७ ॥
परमेष्ठी गुरु **राधाकृष्णांवरी** । कृपेची लहरी सोडती ते ॥ ८ ॥
सद्गुरु **शंकरा** लाभली ते खण । घालूं लोटांगण पांचा पायीं ॥ ९ ॥

याप्रमाणें शंकररावबाबांच्या आचरणाचाच भाईंच्या मनावर परिणाम झाला होता ही गोष्ट जरी खरी असली तरी इतर मार्गांनीं देखील त्यांच्या ज्ञानांत भर पडत होती. भाई लहानपणीं ४–५ वर्षांचे असतांना मुंबईंत गायवाडींत राहात होते. ते राहात असलेल्या घराच्या तळमजल्यावर एक लहान खोली होती, तेथें श्री राधाकृष्ण व श्री बाबा बसत व पारमार्थिक विचारांत काळ घालवीत. या खोलीस 'ज्ञानालय' म्हणून नांव दिलें होतें. भाईहि बाबांबरोबर जाऊन तेथें मधून मधून बसत असत. 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' ह्या भगवद्गीताश्लोकावर निरूपण होत असतां भाई तेथें हजर होते व त्यांचा तो श्लोकहि पाठ झाला. भाई तेथें गेले म्हणजे श्री राधाकृष्ण त्यांना तो श्लोक म्हणावयास सांगत. एका प्रसंगीं प्रस्तुत श्लोकाचा अर्थ सांगण्यास भाईंनीं श्री राधाकृष्णांस विनंति केली, आणि त्यांनीं त्या वेळच्या त्यांच्या बालबुद्धीस पटेल अशाच प्रकारें मोठ्या प्रेमानें तो त्यांस सांगितला. श्री राधाकृष्ण महाराज म्हणाले, "बाळा! ज्याप्रमाणें तूं जुने कपडे टाकून नवे घालतोस, त्याचप्रमाणें हे जीव जुनीं शरीरें टाकून नवीन शरीरें घेत असतात. आपण ज्याप्रमाणें घरांत राहतों त्याप्रमाणें जीव आपल्या शरीरांत राहतात. त्यांचा व शरीराचा मुळींच संबंध नाहीं. जीव हा आकाशासारखा निराकार आहे." भाई सांगत कीं, अशा प्रकारें अगदीं सोप्या शब्दांत आपली समजूत करून श्री राधाकृष्णांनीं

आपल्याला विचारिलें, “बाळा! तुला श्लोकाचा अर्थ समजला ना?” त्यावर आपण ‘समजला’ म्हणून उत्तर दिलें, तें ऐकून त्यांना आनंद झाला. भाई पुढें म्हणत कीं, हेंच आपल्या निर्गुण साक्षात्काराचें बीजारोपण होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.


पुढें भाईंनीं पेन्शन घेतल्यावर एकाद्या विद्यार्थ्याप्रमाणें वेळापत्रक करून भगवद्गीता, वामनपंडितकृत यथार्थदीपिका, तुकाराममहाराजांच्या अभंगांची गाथा, रंगनाथस्वामीकृत योगवासिष्ठ वगैरे संतवाङ्मयाचा झटून अभ्यास केला. त्याचप्रमाणें भाईंनीं कांहीं यात्रा करून प्रसिद्ध देवतांचीं व संतांच्या समाधींचीं दर्शनें घेतलीं. त्यांनीं सन १९१० सालीं काशीची यात्रा केली; सन १९११ सालीं रामेश्वरची यात्रा केली व सन १९१७ सालीं जगन्नाथ-पुरीची यात्रा केली; व सन १९१७ चे प्रारंभीं श्री वामनपंडितांच्या समाधीचें भोगांवास जाऊन दर्शन घेतलें.

प्रथम प्रथम शंकररावबाबा हयात होते तोंपर्यंत शिवास त्यांचींच प्रवचनें होत असत. पुढें सन १९०२ सालीं श्री बाबा वैकुंठवासी झाले. मग कांहीं दिवसांनीं भाईंना दृष्टांत झाला कीं, भक्तिमार्गाचें आचरण—म्हणजे भजन, निरूपण वगैरे—पूर्वीप्रमाणेंच पुढेंहि चालू राहावें. त्या-प्रमाणें क्रम पूर्ववत् चालू ठेवण्याचा भाईंचा निश्चय झाला आहे हें वर्तमान बाबांच्या वेळीं श्रवणास येणाऱ्या मंडळीस, विशेषेंकरून रा. नारायण रामचंद्र बर्वे व रा. विष्णुपंत जोगळेकर या दोघांस समजतांच त्यांस फार आनंद झाला व ते मग दर रविवारीं व सुटीच्या दिवशीं नेमानें भजनास येऊं लागले. भजनापूर्वीं थोडा वेळ श्रवण व्हावें म्हणून रा. बर्वे यांनीं वामनपंडितांची यथार्थदीपिका वाचावयास सुरवात केली. हें वाचन चालू असतां भाईंनीं तें नुसतें ऐकावें अशी त्यांची प्रथम इच्छा होती. पण वाचनास एकदां सुरवात होतांच कांहीं वेळानें भाईंना निरूपणाची स्फूर्ति

झाली व मग त्यांच्या बोलण्याचा जो अस्खलितपणें ओघ सुरू झाला तो कांहीं केल्या त्यांना आवरेना. हें पाहतांच रा. बर्वे व रा. जोगळेकर या दोघांनाहि बावांच्या वेळच्या प्रवचनांची आठवण झाली व त्यांना फार आनंद झाला. पुढें दिवसेंदिवस श्रवणास व भजनास येणाऱ्या मंडळींची संख्या वाढूं लागली व मग कांहीं दिवसांनीं सद्भक्तीचा प्रसार व्हावा या हेतूनें भजनसंमेलन, भक्तियुक्त निरूपण व ग्रंथप्रकाशन इत्यादि कार्याला एक साधन व्हावें म्हणून 'सद्भक्ति प्रसारक मंडळी' नांवाची एक संस्थाच स्थापन करण्याचा वेत मुक्रर होऊन सन १९२२ मध्यें विजयादशमीच्या सुमुहूर्तावर ती स्थापनहि करण्यांत आली.

भाईंच्या प्रवचनास अनेक जातीचे स्त्रीपुरुष जमत असत. त्यांत त्यांचे स्नेही मिस्टर मादन हेहि असत. ते सद्भावानें श्रवणास येत असत. त्यांना 'यथार्थदीपिका' वाचलेली समजण्यास अडचण वाटूं लागली, तेव्हां त्यांनीं भगवद्गीतेवर टीका (Commentary) इंग्रजींत लिहिण्या-विषयीं भाईंना विनंति केली. भाईंनीं तिकडे प्रथम कांहीं दिवस लक्ष दिलें नाहीं. पण भाईंच्या हातून गीतेवरील टीकेच्या रूपानें कांहीं सेवा घ्यावी अशी भगवंताचीच इच्छा दिसली. कारण त्यांना कांहीं दिवसांनीं मग तशी स्फूर्ति झाली आणि त्यांनीं गीतेवर विवरणात्मक टीका लिहिण्यास सन १९१५ मध्यें सुरवात केली. पण पुढें पुढें त्या कामामुळें भाईंच्या डोळ्यांवर ताण पडून ते दुखूं लागले. त्याचा मग परिणाम असा झाला कीं भाईंना सन १९१६ सालीं मिरजेस डॉक्टर वॉनलेसकडे औषधोपचारा-करितां जावें लागलें. मिरजेस असतांनाच वांईजवळ 'भोगांव' नांवाच्या लहानशा गांवांत वामनपंडितांची समाधि आहे अशी भाईंना बातमी सम-जली. 'यथार्थदीपिके'च्या दृढ अभ्यासामुळें भाईंची पंडितांवर विशेष प्रकारची भक्ति बसली होती. त्यांच्या समाधीसंबंधाची मिरजेस बातमी

श्री वामनपंडितांची समाधि



समजतांच भाईंनीं मुंबईस परत येतांना भोगांवास जाऊन त्या समाधीचें दर्शन घेतलें. समाधि अगदीं मोडकळीस आलेली पाहून भाईंना फार वाईट वाटलें, व त्या समाधीचा जीर्णोद्धार गांवचे लोक करीत असतील तर आपण आनंदानें द्रव्यद्वारा मदत करूं अशा अर्थाची भाईंनीं पुष्कळ वर्षें खटपट करून पाहिली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें चार वर्षांनीं सन १९२१ मध्यें परत भोगांवास जाऊन भाईंनीं पंडितांच्या समाधीची जरूर ती दुरुस्ती स्वतःच्या खर्चानें करून तिकडे वामनपंडितांची दरवर्षीं पुण्यतिथि साजरी करण्याचीहि व्यवस्था केली. वामनपंडितांची समाधि त्या कालपर्यंत कोठें आहे हें देखील कोणास माहीत नव्हतें. तिच्यासंबंधाची बातमी भाईंना केवळ वर सांगितल्याप्रमाणें यदृच्छेनें मिरजेस असतांना समजतांच त्यांनीं केवळ पंडितांवरील भक्तीमुळें प्रथम समाधीचें दर्शन घेतलें व मग तिचा स्वखर्चानें जीर्णोद्धार करून पंडितांची दरसाल पुण्यतिथि साजरी करण्याचा क्रम सुरू केला. याप्रमाणें सुरवात करून भाईंनीं सन १९२९ सालपर्यंत कांहीं मंडळी बरोबर घेऊन दरवर्षीं भोगांवास जाऊन पंडितांची पुण्यतिथि साजरी करण्याचा क्रम चालविला. पुढें प्रकृतीच्या क्षीणतेमुळें भाईंना भोगांवास जाणें शक्य नव्हतें, म्हणून वामनपंडितांची पुण्यतिथि खुद्द जोगेश्वरीलाच पाळून तिकडे उत्सव करण्यास सुरवात केली. भोगांवचे लोक द्रव्याच्या अभावीं पंडितांचा पुण्यतिथि-उत्सव साजरा करण्यास असमर्थ आहेत असें आढळून येतांच भाईंनीं पुढें ( १९२९ नंतर ) जोगेश्वरीहून दरवर्षीं कांहीं मंडळी व खर्चाचे रु. ३० पाठवून भोगांवास पुण्यतिथि साजरी करण्याचें व्रत चालविलें. यावरून भाईंचा संतांविषयींचा आदर किती निस्सीम होता व त्यापायीं खर्च करण्याचीहि त्यांची कशी तयारी असे, हें सिद्ध होतें.

सन १९०२ सालीं शंकररावबाबा हे वैकुंठवासी झाल्यामुळें त्यांचें

# प्रकरण सहावें.

## ज्ञानरवि-उदय.

माय वनीं धाल्या धांवे । गर्भ आंवतणें न पाहे ।
तैसें पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ॥
पुत्राच्या विजयें । पिता सुखावत जाये ।
तुका म्हणे अमृतसिद्धि । हरे क्षुधा आणि व्याधी ॥

श्री बाबा कारवार येथें कलेक्टरच्या कचेरींत हेड अकौंटंटच्या हुद्दयावर असतांना श्री भाईंवर मातृवियोगाच्या दु:खाचा डोंगर कोसळला. त्यामुळें त्यांना इतकें वैराग्य झालें कीं त्यांचें संसारावरून मन उडालें व त्या वर्षी त्यांची बी. ए. ची परीक्षा उतरली नाहीं. तेणेंकरून त्यांच्या वैराग्यांत अधिकच भर पडली आणि परीक्षेस न बसण्याचा त्यांनीं आपल्या मनांत निश्चय केला. कांहीं तरी उद्योग असावा म्हणून त्यांनीं श्री बाबांच्या परवानगीनें कारवार हायस्कुलांत शिक्षकाची जागा पत्करली आणि त्यांच्या आग्रहावरून ते पुढल्या वर्षी परीक्षेस वसले आणि सुदैवानें त्यांत उत्तीर्ण झाले. ह्याच सुमारास त्यांना जरी संस्कृत येत नव्हतें, तरी त्यांनीं कै. तेलंगांच्या गीतेच्या इंग्रजी भाषांतराचा मार्मिक अभ्यास सुरू केला.

फुरसतीच्या वेळीं श्री बाबांची कांहीं मित्रमंडळी त्यांना भेटावयास आली म्हणजे त्यांच्यामध्यें पारमार्थिक विषयांवर बरीच चर्चा होत असे. भाई वडील मंडळींत न मिसळतां किंवा त्यांच्या चर्चेत प्रत्यक्ष भाग न घेतां चाललेल्या वादविवादाचें आपल्या खोलींत बसूनच श्रवण व मनन करीत असत. हाच त्यांच्या परमार्थाच्या अभ्यासाचा ओनामा होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकदां रा. कैसकर नांवाच्या एका गृहस्थाबरोबर श्री बाबांचा ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल वादविवाद चालला होता, परंतु

वादाचा निश्चित निर्णय लागण्यापूर्वीच श्री बाबा घरांत उठून गेले. ते गेल्यावर भाई बाहेर आले व रा. कैसकरांबरोबर त्यांनीं त्या विषयावर बरीच चर्चा केली व अखेर ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्यांचें योग्य रीतीनें समाधान करून त्यांची बोळवण केली. श्री बाबा हा वाद आंतून एकाग्रतेनें ऐकत होते आणि रा. कैसकर निघून गेल्यावर त्यांनीं भाईंचें अभिनंदन केलें, व तूं आतां परमार्थश्रवणास अधिकारी झालास असे सद्गदित कंठानें आश्वासनपर उद्गार काढले. अवतरणांतील ' पुत्राच्या विजयें । पिता सुखावत जाये ॥ ' याचा भाईंना अशा रीतीनें सन १८८१–८२ च्या सुमारास अनुभव आला.

यानंतर भाई श्री बाबांजवळ ज्ञानसागर वाचूं लागले. रात्रौ भोजनानंतर भाईंनीं ज्ञानसागर वाचावा व श्री बाबांनीं त्यावर निरूपण करावें असा त्यांचा परिपाठ असे. आधींच मातृवियोगानें भाईंना वैराग्य प्राप्त झालें होतें व तेणेंकरून त्यांची चित्तशुद्धि होत चालली होती. त्याला आणखी श्रवणाची जोड मिळाली, त्यामुळें त्यांची चित्तशुद्धि झपाट्यानें होऊं लागली व अष्ट सात्त्विक भाव येऊं लागले. शिष्याचा अधिकार गुरूच्या लक्षांत येतांच ' मला उपदेश करा ' असें शिष्याला प्रत्यक्ष सांगावें लागत नाहीं. रा. कैसकर ह्यांच्याबरोबर वाद झाला त्यावेळीं भाईंचें ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल काय मत आहे हें दैवयोगानें श्री बाबांच्या लक्षांत आलें होतेंच. ह्या लक्षणांवरून ज्ञानबीज पेरण्यास भाईंची भूमिका पूर्णपणें तयार झाली आहे अशी खात्री होतांच श्री बाबांनीं त्यांना व्यतिरेक-अन्वयज्ञानाचा बोध केला. तेव्हांपासून त्यांचा पूर्वीचा पिता-पुत्रसंबंध कायम राहून शिवाय गुरु-शिष्य हा नवीन संबंध सुरू झाला. पुढें थोड्याच दिवसांनीं श्री बाबा सेवानिवृत्त झाले व त्यांना आध्यात्मिक ग्रंथांचें वाचन-मनन करण्यास विपुल अवकाश मिळूं लागला. साधुसंतांच्या अनुभवानंदसमृद्ध अशा वचनामृताचें श्री बाबांनीं दिवसभर यथेच्छ सेवन

करावें आणि त्या सर्वांचा सारांशरूपी लाभ रात्रौ ज्ञानसागर, यथार्थदीपिका वगैरे ग्रंथांवर विवेचन होत असतांना भाईंना सहज मिळत असे. ह्यामुळें भाईंचा लौकिकदृष्ट्या अध्यापनांत गेलेला काळ जणूं काय संतवचनसेवनांत गेल्यासारखा होई. श्रद्धासंपन्न शिष्याची स्थिति गोवत्सासारखी असतेः—'माय वनीं धाल्या धाये । गर्भ आंवतणें न पाहे' ॥. अनुभवी पुरुष ग्रंथ वाचतांना त्यांचें रहस्य पचनीं पाडतात. मग त्यांच्या कांसेस लागलेल्या श्रोत्यांस त्याचा लभ्यांश सहज प्राप्त होतो. श्री बाबांच्या ठिकाणीं आतां भाईंची पितृभावापेक्षां गुरुभावाचीच वृद्धि होत चालली आणि लौकिकदृष्ट्या पितृसेवा करीत असतां त्यांना संतसेवेचें फळ मिळूं लागून त्यांना भगवंताची कृपा सहज साधतां आली:—'जैसें पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ॥' ह्यावरून भाग्यवान् पुरुषास परमार्थसाधनांत संधि व सुखसोय यांची जोड अनायासें कशी मिळते हें सहज लक्षांत येईल.

भाईंचा शाळेंतला व कॉलेजांतला अध्ययनकाल मुंबईस मावशीकडे गेल्यावर, प्रौढ दशेंत कारवार येथें त्यांना पितृसंगतीचा लाभ मिळाला. तेथें रात्रौ ज्ञानसागरादि ग्रंथांवर जें निरूपण होत असे त्याच्या श्रवणानें श्री बाबांची पारमार्थिक योग्यता किती होती हें त्यांना समजलें. त्या श्रवणाचा त्यांच्या मनावर इतका परिणाम झाला कीं श्री बाबांना निरुपायास्तव द्वितीय संबंध करावा लागला तरी तेणेंकरून पितापुत्रामध्यें वितुष्ट किंवा कलह न माजतां भाईंचें वडिलांवरचें प्रेम यत्किंचित्‌हि कमी झालें नाहीं. ईश्वराची कृपा असली म्हणजे तो वाईटांत देखील चांगलें निर्माण करतो. ह्या ईश्वराच्या कृपेमुळें भाईंच्या आचरणांत मुळींच बदल झाला नाहीं, इतकेंच नाहीं, तर ते आपल्या सापत्न मातेशीं फार सौजन्यानें, ममतेनें आणि निष्ठेनें वागत असत, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कारवार येथें विद्याखात्यांत नोकरी मिळाल्यामुळें भाईंच्या पोटापाण्याची व्यवस्था

झाली आणि श्री बाबांचा अनुग्रह झाल्यामुळें त्यांच्या भवव्याधीच्या चिकित्सेस व ती दूर करण्याच्या उपायास तेथेंच आरंभ झाला. शिरोभागीं दिलेल्या अभंगाच्या शेवटल्या चरणांत तुकाराममहाराज म्हणतात त्याप्रमाणें श्री बाबा सेवानिवृत्त झाल्यामुळें सामान्य जनांस भक्तिमार्गास लावून त्यांचा उद्धार करण्याकडे विशेष लक्ष देण्यास त्यांना वेळ मिळूं लागला. आणि जननी-गर्भन्यायानें पोटाची व भवरोगाची काळजी ह्या दोहींतून मुक्त होण्याचा श्रीभाईंना अमृतासिद्धियोग जुळून आला.

# प्रकरण सातवें.

## विषयविरक्ति--सहिष्णुता.

हरिभक्त माझे जिवलग सोइरे । हृदयीं पाउलें धरीन त्यांचीं ॥ १ ॥
अंतकाळीं येती माझ्या सोडवणें । मस्तक बैसणें देईन त्यांसी ॥ २ ॥
आणिक सोइरे सज्जन जे कोणी । वैष्णवांवांचोनि नाहीं मज ॥ ३ ॥
देऊनि आलिंगन धरीन चरण । संवसारसीण नासे तेणें ॥ ४ ॥
कंठीं तुळशीमाळा नामाचे धारक । ते माझे तारक भवनदी ॥ ५ ॥
तयांचे चरणीं घालीन मी मिठी । चाड हे वैकुंठीं नाहीं मज ॥ ६ ॥
आळसें दंभें भावें हरिचें नाम गाती । ते माझे सांगाती परलोकींचे ॥ ७ ॥
कायावाचामनें देईन क्षेम त्यांसी । चाड जीवित्वासी नाहीं मज ॥ ८ ॥
हरिचें नाम मज म्हणविती कोणी । तया सुखा धणी धणीवरी ॥ ९ ॥
तुका म्हणे तया उपकारें बांधलों । म्हणऊनि आलों शरण संतां ॥ १० ॥

श्री भाईंच्या एकंदर चरित्राचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां त्यांनीं आपल्या सबंध हयातींत बुद्धिपुरस्सर ऐहिकसुखाभिलाषी व विषयानुरागी लोकांशीं सुदृढ संबंध ठेविल्याचें दिसत नाहीं. समाजांत फारसे मिसळत नसल्यामुळें आणि आप्तसंबंधी यांच्याशीं जितक्यापुरतें तितकेंच वागण्याचा त्यांचा परिपाठ असल्यामुळें भाईंना विषयासक्तीचा तीव्र मोह जाणवला नाहीं. परंतु ह्यावरून ते लोकांशीं ताठ्यानें किंवा तुसडेपणानें वागत असत असें समजूं नये. ज्यांच्या ज्यांच्याशीं त्यांचा संबंध येई त्यांच्या त्यांच्याशीं ते प्रेमळपणानें व मोकळेपणानें वागत असत. शैशवामध्यें श्री राधाकृष्ण तोरणे, श्री बाबा व त्यांच्या मावशीचे यजमान रा. सगुणराव संझगिरी, ह्यांच्याशीं त्यांचा निकट संबंध असे. तदनंतर मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. च्या पदवीपर्यंत उच्च शिक्षण होई तों त्यांचा जवळ जवळ कोणाशींहि शुभाशुभसंबंध जडला नाहीं. पदवी प्राप्त झाल्यापासून बाबांच्या निर्याणा-

पर्यंत बाबांशींच एकान्तिक शुभ संबंध. बाबांच्या पश्चात् बर्वे, मादन वगैरे ज्यांना परमार्थाची आवड आहे अशा लोकांशींच परिमित पारमार्थिक संबंध. ह्याप्रमाणें सेवानिवृत्त होईपर्यंत नोकरीच्या व्यवसायामुळें पारमार्थिक हितचिंतनाचे यत्न करण्यास त्यांना फारसा वेळ मिळाला नाहीं, तरी कुसंस्कारांपासून भाईंचें अंतःकरण अलिप्त राहिल्यामुळें सेवानिवृत्त झाल्यावर कांहींहि प्रयास न पडतां त्यांचें अंतःकरण वैष्णव संतांच्या वाङ्मयाचा कसून अभ्यास करण्यास सुसमर्थ झालें होतें.

संतांच्या वाङ्मयाचा अभ्यास करितांना संशोधनीं कुतर्कदूषित चिकित्सा-पद्धतीचा अवलंब न करितां शुद्ध श्रद्धापूर्वक अंतःकरणानें ‘हरिभक्त माझे जिवलग सोइरे । हृदयीं पाउलें धरीन त्यांचीं ॥’ हें ध्येय आपल्यापुढें ठेवून आकलन, ग्रहण, मनन, धारण, निदिध्यास, व तद्रूपता या पद्धतीनें भाईंनीं ह्या वाङ्मयाचा अभ्यास केला. संतांच्या परमपवित्र वाङ्मयाशीं निकट समागम झाल्यामुळें त्याचा योग्य तोच परिणाम झाला. ‘ ज्ञानाऽर्जुन उद्धव वामन रंगामृत नाम नाथ तुकाराम ॥’ ह्यांच्या ग्रंथांशीं भाई इतके एकरूप झाले होते कीं, त्यांच्या केवळ पवित्र नांवांच्या उच्चाराबरोबर त्यांना सत्त्वाचें भरतें येई. सेवा-निवृत्त झाल्यावर तर त्यांच्या पारमार्थिक ग्रंथाच्या अभ्यासाला दिवसेंदिवस अधिकाधिक रंग चढूं लागला. ह्याप्रमाणें चार पांच वर्षें एकाग्रतेनें अभ्यास व मनन केल्यानंतर त्याचा परिपाक होऊन कीर्तनास अर्थात् ग्रंथरचनेस आरंभ झाला. श्रीमद्भगवद्गीतेवर इंग्रजी टीका लिहिण्याच्या मिषानें संतांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाचा स्वतःच्या मनावर किती व कसा परिणाम झाला होता हें त्यांचें त्यांनाच पडताळून पाहतां आलें.

श्रीमद्भगवद्गीतेवरील टीकारचनेच्या काळांत वाचनलेखनास आवश्यक लागणारें जें नेत्रेंद्रिय त्यावर गंडांतराचा दुर्धर प्रसंग येऊन ठेपला. अशा वेळीं मिरजेचे सुविख्यात डॉक्टर परलोकवासी वान्लेससाहेब यांची

भाईंनीं मुंबईस गांठ घेतली. निपुण वैद्य या नात्यानें डॉ. वान्लेससाहेबांनीं लेखनवाचन एकदम बंद करावें असा भाईंना सल्ला दिला. केवळ भगवदिच्छेनें भगवद्गीतेवरील टीकेस आरंभ झाला आहे, तेव्हां दर्शनशक्तीच्या शेवटच्या अंशापर्यंत तरी लेखनाचें काम मला बंद करतां येणार नाहीं असा आपला ठाम निश्चय भाईंनीं डॉक्टरसाहेबांस कळविला. डॉक्टरहि स्वतः भक्तिमान् असल्यामुळें त्यांना भाईंची ही भीष्मप्रतिज्ञा ऐकून गहिंवर आला आणि 'All right, you will not lose your sight'—'बरें आहे, कांहीं काळजी करूं नका, तुमची दृष्टि जाणार नाहीं'—असे भक्तिमान् पुरुषालाच शोभणारे उद्गार त्यांच्या मुखांतून निघाले. भाईंचा हा ग्रंथ पुढें पुरा होऊन छापूनहि प्रसिद्ध झाला हें सर्वांना श्रुत आहेच.

गीतेवरील टीकेचे बारा अध्याय पुरे झाल्यावर जगन्नाथादि यात्रा करण्याची भाईंना प्रेरणा झाली. महाभागवतांनीं पुनीत केलेल्या तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाला योग्य अशा मनःस्थितींत हा योग जुळून आल्यामुळें पुढील उरलेले सहा अध्याय समाप्त केल्यावर भाईंनीं आपल्या नेत्रेंद्रियास आनंदानें सेवानिवृत्त केलें. नेत्रविकार होण्यापूर्वी ज्या संतांच्या ग्रंथांचा भाईंनीं दीर्घव्यासंग केला होता, त्यांचा आतां अंतर्मुख संग त्यांना अनायासें प्राप्त झाला, आणि 'देउनि आलिंगण धरीन चरण । संवसारसीण नासे तेणें ॥' या संतवचनाप्रमाणें ते आचरण करूं लागले.

गीतेवरची टीका संपल्यावर आपण लेखनवाचन करणार नाहीं असें भाईंनीं डॉ. वान्लेससाहेबांस जें अभिवचन दिलें होतें, त्याप्रमाणें ते अखेरपर्यंत वागले. परंतु त्यांचें ग्रंथरचनेचें काम बंद झालें असें समजूं नये. भगवंताची ज्याच्यावर कृपेची पाखर असते त्यास तो कोणत्याच प्रकारची उणीव भासूं देत नाहीं. साधु म्हणून आपली कीर्ति वाढावी अशी मुळींच महत्त्वाकांक्षा नसतांहि भाईंच्या भोंवतीं भक्तमंडळीचा जमाव दिवसेंदिवस

वाढूं लागला होता. ह्यापैकीं कोणाच्या तरी साहाय्यानें त्यांनीं ग्रंथरचनेचा क्रम पुढें चालू ठेविला. मात्र पूर्वीप्रमाणें स्वतः न लिहितां ते तोंडानें सांगत आणि कोणी तरी भक्त तें लिहून घेत असे. अशा तऱ्हेनें प्रेमामृत, ज्ञानेश्वर महाराज अथवा सद्भक्तिविजय वगैरे ग्रंथ तयार झाले. लेखनवाचनाची ज्याला अत्यंत गोडी आहे त्याच्यावर दृष्टिक्षीणतेचा किती उद्वेगजनक परिणाम होतो हें ज्यास माहीत आहे, त्यालाच ह्या वेळीं भाईंच्या मनाची कशी स्थिति झाली असेल ह्याची कल्पना करितां येईल. परंतु ही स्थिति प्राप्त झाल्यामुळें ते निराश झाले नाहींत, किंवा त्यांच्या मुखांतून कधीं दुःखाचा उद्गार निघाला नाहीं. आतां त्यांचें मन भगवच्चिंतनाकडे आणि भजनाकडे विशेष वळलें, आणि त्यांचा भजनप्रमोद दिवसेंदिवस शुक्ल पक्षांतील चंद्राप्रमाणें अधिकाधिक वाढूं लागला, आणि ते भजनाचे इतके भुकेले होऊन गेले कीं आपला एकान्तप्रिय दिनक्रम सोडून भक्तमंडळी-बरोबर, ‘ हरिचें नाम मज म्हणविती कोणी। तया सुखा धणी धणीवरी ॥ ’ ह्या संतवचनानुसार ते भजनांत आनंदानें मग्न होत असत, आणि संतांच्या वाङ्मयाचा अभ्यास करितांना त्यांनीं जें ज्ञान संपादन केलें होतें, त्याचा लाभ भक्तमंडळीस प्रवचनाच्या द्वारें करून देण्यांत त्यांना अत्यानंद होत असे.

दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, हरिचरणीं रत झाल्यामुळें, ‘ आळसें दंभें भावें हरिचें नाम गाती। ते माझे सांगाती परलोकींचे ॥ ’ ह्या भावनेमुळें त्यांच्या अंगीं अपूर्व सहिष्णुता आली होती, आणि ‘ वासुदेवः सर्वमिति ’ हें ध्येय हृदयांत वसत असल्यामुळें ते सर्व मंडळीशीं प्रेमानें व उदार अंतःकरणानें वागत असत. जो हरीचें नाम घेतो, तो नातेवाईक असो परका असो, विद्वान् असो अविद्वान् असो, सधन असो निर्धन असो, व्यसनी असो निर्व्यसनी असो, त्याच्याशीं

' परलोकींचा सांगाती ' ह्या भावनेनेंच त्यांनीं आपला वर्तनक्रम ठेविला होता. तिऱ्हाईत ह्या नात्यानें भाईंच्या भोंवतालीं असलेल्या मंडळीचें कोणी सूक्ष्म निरीक्षण केलें असतें, तर भाईंना ह्या मंडळीचा ताप कसा सहन करवतो ह्याचें आश्चर्य वाटलें असतें. अखेर अखेर ही परदोषसहिष्णुता कोणत्या थरास पोहोंचली होती हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांनाच वैष्णवधर्मसंपन्न भागवतोत्तम कसा वागतो ह्याची कल्पना करितां येईल. दुखण्यांत पडल्यापासून शेवटले तेरा महिने शरपंजरीं पडलेल्या भीष्माचार्यांप्रमाणें हूं कीं चूं न करितां भाईंना कसे काढतां आले याचें स्पष्टीकरण ह्या प्रकरणाच्या आरंभीं दिलेल्या अभंगांत सांपडेल:—' तुका म्हणे तया उपकारें बांधलों। म्हणऊनि आलों शरण संतां ॥ ', ह्या चरणांत प्रत्येक हरिनाम घेणारास तुकाराममहाराजांनीं संत म्हणून संबोधिलें आहे. भाईंच्या दुखण्यांत त्यांची शुश्रूषा जी मंडळी करीत असत, त्यांच्याकडे श्री भाई ह्याच भावनेनें पाहात असत, व ते जे जे उपाय करीत ते निमूटपणें करून घेत.

# प्रकरण आठवें.

## श्री भाईंचें बुद्धिस्वातंत्र्य.

नका दंतकथा येथें सांगो कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥
अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आम्हांपुढें ॥
वरी कोणी मानी रसाळ बोलणें । नाहीं झाली मनें वोळखीते ॥
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळाली ॥
तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचें । येरा गबाळाचें काय काम ॥

गेल्या पांचदहा वर्षांतील श्री भाईंच्या विस्तृत प्रवचनसंग्रहाचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां प्रत्येक प्रवचन भाईंच्या अंतःस्वरूपाचें खरें प्रतिबिंब आहे काय असा प्रश्न जर एकादा चिकित्सक वाचक आपल्या मनास करील, तर त्याचें समाधानकारक उत्तर देण्यास जड जाईल. ज्यांचें सर्व आयुष्य पंजरस्थ शुकाप्रमाणें पारतंत्र्यांत गेलें—लहानपणीं आईबापांच्या ताब्यांत, शाळेंत व कॉलेजांत असतांना मावशीच्या व तिच्या यजमानांच्या ताब्यांत, नोकरी लागल्यावर सरकारच्या ताब्यांत, ज्ञानाचा बोध झाल्यावर सद्गुरूच्या हुकुमांत, संतांच्या वाङ्मयाचें अध्ययन झाल्यावर संतवचनांच्या ताब्यांत आणि शेवटीं शिष्यांच्या व आप्तस्वजनांच्या ताब्यांत—असें ज्यांचें सर्व आयुष्य गेलें त्यांना बुद्धिस्वातंत्र्य कोठून असणार असें त्या वाचकास वाटण्याचा संभव आहे. परंतु ‘ वेष असावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ॥’ ह्या समर्थांनीं महंतांना दिलेल्या कानमंत्राचा भाईंनीं अक्षरशः प्रयोग करून दाखविला असें भाईंच्या विचारी भक्तास आढळून येईल. शिवाय ‘ कोण्याही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥’, ‘ जें जें भेटे भूत । तें तें मानी भगवंत ॥’, हें उच्च ध्येय भाई सतत पाळीत असल्यामुळें ते कोणाचेंहि मन कधीं दुखवीत नसत. ह्याच ध्येयामुळें त्यांनीं शेवटच्या

दुखण्यांत त्यांची शुश्रूषा करणाऱ्या मंडळींनीं जे जे उपाय केले ते निमूटपणें सहन केले, आणि ते माझ्यानें सोसवत नाहींत, ते मला नकोत असें म्हणून त्यांनीं त्यांचें मन कधींहि दुखविलें नाहीं. भाईंच्या आचरणाचें हें वर्म त्या वाचकास माहीत नसल्यामुळें त्यांना बुद्धिस्वातंत्र्य बेताचेंच होतें असा त्याचा विपरीत ग्रह झाला तर त्यांत नवल नाहीं. भाईंचे ग्रंथ व विपुल प्रवचनसाहित्य ह्यांच्या अध्ययनानें व मननानें साधकास आपली आध्यात्मिक उन्नति करून घेतां येईल आणि अपरिहार्य कारणामुळें तीं प्रवचनें बंद पडलीं म्हणून तो हताश होऊन बसणार नाहीं.

लहानपणीं भाईंचें श्री मारुतीवर फार प्रेम होतें व पुढें ते त्यांचा कुलस्वामी श्री मंगेश ह्याची भक्ति करूं लागले. इतर दैवतांविषयींहि त्यांना आदर वाटत असे, हें त्यांनीं त्यांचीं स्तवनपर कवनें व आरत्या केल्या आहेत ह्यावरून उघड दिसतें. ज्ञान झाल्यावर चित्त स्वरूपांत लावून समाधिसुख घेण्याचा त्यांनीं अभ्यास चालविला व गायत्रीमंत्राचा जप करितांना हें त्यांना सहज साधत असे. परंतु हें बाबांच्या दृष्टोत्पत्तीस येतांच ते त्यांना वेळींच जागृत करीत, आणि म्हणत असत कीं, ‘ तुला पुष्कळ महत्त्वाचें काम करावयाचें आहे, तेव्हां तूं नुसता व्यतिरेकयोग साध्य करून संतुष्ट होऊं नकोस. तूं अन्वययोग कर म्हणजे जें चैतन्य तूं आंत पाहतोस तेंच जगतांतील चराचरांत पाहण्याचा अभ्यास कर.’ ज्ञान झाल्यावर बाबांच्या संगतींत त्यांचा पारमार्थिक विषयांचा अभ्यास यथास्थित चालू असतां ते कांहीं ज्ञान्यांप्रमाणें नुसत्या निर्गुण उपासनेस चिकटून राहिले नाहींत. त्यांनीं आपली सगुणोपासना चालू ठेवलीच. इतकेंच नाहीं तर देह क्षीण होऊन नित्यनैमित्तिक कर्में करण्याची शक्ति नाहींशी होईपर्यंत त्यांनीं कोणतेहि आचारधर्म शिथिल सुद्धां केले नाहींत, मग त्यागाची गोष्ट कशाला ?

समूळ मिथ्या जाणे वेदोक्ती । समूळ मिथ्या जाणे बंधमुक्ती ।
हें जाणोनि आचरे जो वेदविहितीं । तेंचि निजभक्ती मुक्तीवरील ॥
—ए. भा.

असें करण्यांत लोकसंग्रह हा हेतु होता. त्यांनीं जर ह्या आचारधर्माला फांटा दिला असता, तर त्यांच्या शिष्यवर्गानेंहि त्यांचेंच अनुकरण केलें असतें.

श्री वामनपंडितांविषयीं भाईंचा पराकाष्ठेचा आदर व पूज्यभाव होता हें त्यांनीं त्यांच्या समाधीचा शोध लावून तिची आपल्या खर्चानें दुरुस्ती करून त्यांचा पुण्यतिथ्युत्सव सुरू केला ह्यावरून स्पष्ट दिसतें. गीतेवरील इंग्रजी टीका लिहीत असतांना एके ठिकाणीं भाईंना पंडितांनीं केलेल्या अर्थाहून भिन्न अर्थ करावासा वाटला. परंतु पंडितांच्या अर्थाहून वेगळा अर्थ करण्यास आपली योग्यताच नाहीं असें मनाशीं ठरवून भाईंनीं गीतेवर टीका लिहिण्याचें कामच बंद केलें. इतक्यांत पंडितांनीं प्रेरणा करून तुम्हांला स्फुरलेला भिन्न अर्थ संकोच न धरितां खुशाल लिहावा अशी परवानगी दिली तेव्हांच भाईंनीं टीका लिहिण्याचें काम पुन्हा हातीं घेतलें. बुद्धिस्वातंत्र्य आणि श्रेष्ठांविषयीं आदर एकाच वेळेला एके ठिकाणीं कसे नांदूं शकतात हें भाईंच्या ह्या प्रसंगावरून विवेकरसिकांनीं लक्षांत ठेवावें. भाईंना मनाविरुद्ध गोष्ट करण्याचा प्रसंगच आला तर त्यांतून मुक्त होण्याचा सोपा उपाय म्हणजे ती गोष्टच करण्याचें ते सोडून देत. गीतेसाठीं डोळे घालवावयास तयार झालेले भाई आपल्या विवेकबुद्धीला न पटणारा अर्थ लिहिण्यापेक्षां टीका लिहिण्याचें आरंभिलेलें कार्य अपुरें टाकण्यास सिद्ध झाले !

मनुष्याला देवानें जी विवेकबुद्धि दिली आहे तिचा यथायोग्य उपयोग करून त्यानें वागावें असें भाईंचें मत होतें. बुद्धीला जें निश्चितपणें करावेंसें वाटत असे, किंवा ज्या मंडळीचा ते सल्ला घेत असत त्यांची ज्यासंबंधानें एकवाक्यता असे, तें करण्यास ते कधीं मागें पुढें पाहात नसत. मात्र ज्या

गोष्टीसंबंधानें त्यांची एकवाक्यता नसेल किंवा जी गोष्ट मनुष्याच्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरची असेल ती गोष्ट करण्यासंबंधानें ते देवापुढें चिठ्या घालून त्याची आज्ञा होईल त्याप्रमाणें करीत असत.

भाईंचा नवविधा भक्तीवर व विशेषेंकरून नामस्मरणावर जास्त भर असे. पडल्या ठिकाणीं त्यांचें अखंड नामस्मरण चालत असे व दुखण्यांतहि त्यांनीं चारी प्रहरचें भजन बंद ठेविलें नाहीं. रोजच्या भजनाच्या वेळीं सोहिरोबा-नाथांचें 'श्रीराम जयराम जय जयराम' हें पद भाई म्हणत असतांना ज्यांनीं ऐकलें असेल त्यांनाच त्यांची भगवन्नामावर किती एकान्तिक प्रीति होती ह्याचें अनुमान करितां येईल. भाई प्रेमभरानें नामाची सद्गदित अंतः-करणानें स्तुति करीत ह्यांत नवल नाहीं, कारण सर्व साधुसंतांनीं नामावरच भिस्त ठेविली होती आणि त्याच्या माहात्म्याचें त्यांनीं असंख्य कवनांत वर्णन केलें आहे.

सर्व संतांनीं सर्व साधनांत नामस्मरणच श्रेष्ठ कां ठरविलें याविषयींचीं दोनचार शास्त्रीय प्रमाणें येथें दिलीं असतां अप्रासंगिक होणार नाहीं:—

( १ ) जसा गूळ आणि गोडी एकच तसें नाम व नामी यांत अभिन्नता आहे, म्हणून नाम घेऊं लागलें कीं नामी आहेच तो प्रकट होईल.

( २ ) नाम वस्तुतंत्र व इतर साधनें कर्तृतंत्र आहेत, म्हणजे नामांत पावन करण्याची स्वतःसिद्ध शक्ति आहे. इतर साधनांत कर्त्याच्या अधिक-उण्या श्रद्धेच्या मानानें फलप्राप्ति होते. सोन्यारुप्याच्या नाण्यावरचा राजाचा शिक्का गेला असला तरी कांहीं किंमत आणण्याची नाण्यांत शक्ति असते. त्या शक्तीला वस्तुशक्ति म्हणतात. तशी नोटा, हुंड्या वगैरेंत नाहीं. त्यांत लोकांची नोटीवर सही करणाऱ्यावर ज्या प्रमाणांत श्रद्धा असेल त्या प्रमाणांत फळ मिळतें व सही कांहीं कारणांनीं नाहींशी झाली असेल तर कांहींच किंमत येत नाहीं. तद्वत् श्रद्धा नसेल तर कर्म करूनही फलप्राप्ति होत नाहीं.

( ३ ) अवताररूपांत अधिक शक्ति आहे व नामांत कमी आहे असें वेद्, स्मृति, पुराण कोणीच सांगत नाहीं. उलट नाम हें बुद्धीस कानाच्या व वाचेच्या योगानें कळतें आणि रूप नुसतें डोळयाच्या योगानें प्रतीत होतें म्हणजे नामाच्या बाजूला श्रवणेंद्रिय व वागिंद्रिय या दोघांची साक्ष व रूपाच्या बाजूला नुसत्या नेत्रेंद्रियाचा पुरावा आहे असें सिद्ध झालें. यावरून नामाच्या बाजूला दोन साक्षीदार आहेत म्हणून नाम हें व्यवहारदृष्ट्याहि श्रेष्ठ ठरतें. यास प्रमाणः—

**दृष्टीस न दिसे वारा । तरी कळतो लागतां शरीरा ।**
**आणि आइकों येतो भरारा । श्रोत्रेंद्रियातें ॥**
**दृष्टीस वारा न दिसे । तरी काय म्हणावा न असे ? ।**
**तैसा वाचेस कानास गवसे । तो काय नव्हे स्वयें ईश्वर ? ॥**
**ईश्वर स्वयें निराकार । तो नेत्रांस दाखवी शरीर ।**
**ते अवतार तैसेचि हे अवतार । कानास वाचेस जाणवी ॥**
**अवताररूपीं अधिकपण । आणि नामपणीं उणा आपण ।**
**ऐसें वेद अथवा स्मृतिपुराण । कोणीच न म्हणे ॥ ( य. दी. )**

( ४ ) ‘ लाइफ् सायन्स ’ किंवा ‘ जीवनशास्त्र ’ या पुस्तकांत ग्रंथकर्त्यानें स्पष्ट नमूद केलें आहे कीं, ‘ ज्या शब्दांचे आणि सुरांचे हे मंत्र बनविलेले असतात त्यांची रचना आणि जुळणी ध्वनिशास्त्राच्या नियमाप्रमाणें केलेली असते. त्यामुळें त्यांच्या आघातानें मनुष्याच्या अंतःकरणतंतूंत एक वेगाचा तरंगप्रवाह उत्पन्न होतो. इतकेंच नाहीं, तर त्या मंत्रांचा सतत घोष केल्यानें त्यांना विलक्षण जोर येतो.’ अशी जरी वस्तुस्थिति आहे तरी नामाचें पूर्ण फल सत्संगतीशिवाय मिळत नाहीं. कारण संत तें कसें घ्यावें, तें घेतांना कोणते दोष घडतात वगैरे खुब्या शिकवितात. नामस्मरणानें सत्संगतीचा लाभ होतो ( नामें महादोष जाती । पुढें संतांची संगती ॥

—श्रीसमर्थ ). म्हणून कांहीं सबब न सांगतां परमार्थहितेच्छूंनीं—सत्संगत असो वा नसो—नामस्मरण करावें हें हितावहच ठरतें.

भाई हे उपजत शिक्षक ( born teacher ) होते. लौकिकदृष्ट्या ते किती उत्तम तऱ्हेनें शिकवीत असत हें चरित्रांतील चवथ्या प्रकरणांत दाखविलें आहे. परमार्थांत देखील त्यांची शिकविण्याची हातोटी व वेदांतासारखा गहन विषय सुलभ करून सांगण्याची पद्धत अलौकिक होती हें ज्यांनीं त्यांचीं प्रवचनें ऐकलीं असतील त्यांना सांगण्याची जरूरी नाहीं. ह्यासंबंधानें पुढील दोनचार सिद्धांतांचे त्यांनीं दिलेले अर्थ वाचून वाचकांची खात्री होईल.

(१) कृष्णार्पण किंवा ईश्वरार्पण:—ईश्वरार्पण करणें म्हणजे 'ॐकृष्णार्पणमस्तु' असें केवळ तोंडानें म्हटल्यानें, तें तसें होत नाहीं. अहंकाररहित कर्म करणें, यास कृष्णार्पण किंवा ब्रह्मार्पण म्हणतात. जसें, आपला पैसा खर्च करून घर बांधिलें म्हणून तें 'माझें घर' असें आपण म्हणतों. तेंच एका ब्राह्मणास अर्पण केलें तर पुढें त्या घरास 'माझें घर' असें म्हणवत नाहीं. या कृत्यानें आपण आपल्या 'माझें' म्हणण्याचा त्याग करतों. 'मी' व 'माझें' यास अहंकार व ममता म्हणतात. यावरून अर्पण या शब्दाचा अर्थ अहंकारत्याग असा होतो.

(२) निष्काम कर्म:—काम, कामना म्हणजे कर्मास सुरवात करितांना त्याचें फळ अमुक एका तऱ्हेनेंच झालें पाहिजे असा संकल्प न धरितां केलेलें कर्म तें निष्काम कर्म. कर्माचें फळ काय व्हावयाचें तें अगोदर ठरलेलेंच असल्यामुळें एका विशिष्ट प्रकारची कामना कर्म करीत असतां बाळगणें तें सकाम कर्म.

"The sting of desire of seeking pleasure and avoiding pain is called kâmanâ".

(३) ईश्वरार्पण ( सांडावें कर्माचें कर्तेपण। मदर्पण या नांव ॥—ए. भा.), दास्य ( कर्ता मीच असें कदा म्हणूं नको ॥—ना. म. ), सेवा, भाव ( तुका म्हणे नको वरपंग देवा । ध्यावी माझी सेवा भाव शुद्ध ॥ ), ह्या चारी शब्दांचा उपयोग संतांनीं समानार्थींच केला आहे.

(४) चित्तशुद्धि:—सर्वांचें चित्त मूळचें शुद्धच आहे. परंतु विषयांच्या संपर्कानें त्यांची आसक्ति उत्पन्न होऊन, चित्तावर त्या आसक्तीचीं पुटांवर पुटें चढतात. विषयासक्ति हाच मळ होय. हा आसक्तिरूप मळ जाऊन चित्त शुद्ध झालें म्हणजे आत्म्याचें स्वरूप अनुभवास येऊं लागतें. यावरून चित्तशुद्धीचा तात्पर्यार्थ वैराग्यप्राप्ति असा झाला. मूळचें शुद्ध चित्त वहुत काळपर्यंत विषयसुखाचा संयोग झाल्यामुळें आसक्तिरूप मळाचीं पुटें जडून अशुद्ध होतें. त्यामुळें ती आसक्ति म्हणजे मळ चित्तास फार घट्ट चिकटलेला असतो. कोणतीहि फार दिवसांची संवय मोडणें झाल्यास ती हळू हळू मोडावी लागते. तद्वत् विषयभोगाचे संवयीनें चित्तावर चढलेला हा मळ हळू हळू नाहींसा केला पाहिजे व निष्काम कर्म करून ईश्वरार्पण करणें हाच त्याला उत्तम उपाय. मनुष्य प्रत्येक कर्म कांहींतरी फळाचे आशेनेंच करितो, व तें फळ प्राप्त झालें म्हणजे त्याचा उपभोग घेतो. अशा उपभोगानें त्या त्या विषयांची आसक्ति बळकट होत जाते. याचें मूळ फलाशा होय हें उघड दिसतें. ती फलाशा नाहींशी करून, तीविरहित कर्म केलें म्हणजे पारिणामिक आसक्तिरूप मळ चित्तावर चढत नाहीं म्हणजे विषयांचा विराग उत्पन्न होतो. हेंच वैराग्य दृढ झालें म्हणजे चित्त रजतमरहित होतें. तेव्हां चित्त शुद्ध झालें असें समजावें, आणि तेव्हांच तो पुरुष ज्ञानयोगास पात्र होतो.

येथें जास्त विस्तार करितां येत नाहीं. श्रीभाईंचे ग्रंथ वाचले असतां आम्ही म्हणतों याची सत्यता पटेल.

# प्रकरण नववें.

## श्री भाईंनीं काय शिकविलें ?

नाम एकचि हृदयमंदिरीं । दृढ धरि तरी सांपडे हरि ॥
प्रेमभावें तूं मज सदा स्मरीं । मीच तूजला सहज उद्धरी ॥

—श्री शंकर सुधा

नामें अज्ञान नासे । नामें आत्मा प्रकाशे ।
पावले जीवन्मुक्तदशे । नामेंचि करूनी ॥
ज्ञानी आणि हरिभक्त । ज्ञान ज्याचें भक्तियुक्त ।
तो होउनी जीवन्मुक्त । अंतीं सगुणमुक्ति पावे, अर्थ ऐसा ॥—य. दी.

श्रीमद्भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायांत ७ ते ११ श्लोकांत श्रीकृष्णांनीं ज्ञानाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. तीं हीं:—

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥
इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥
असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥
मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥
अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥

‘ अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, सोशिकपणा, सरळपणा, गुरुसेवा, शुचिर्भूतपणा, स्थिरता व मनाचा संयम; इंद्रियांच्या विषयांचे ठिकाणीं विरक्ति, अहंपणाचा अभाव, आणि जन्म हा मृत्यु, वृद्धपण, व्याधि व दुःख यांनीं व्याप्त आहे हा विचार नेहमीं मनांत वागविणें; स्त्रीपुत्र-गृह इत्यादिकांचे ठायीं आसक्ति नसणें, त्यांच्या सुखदुःखाचा ध्यास न ठेवणें, इष्ट-अनिष्ट

कशीहि गोष्ट घडली तरी मन शांत ठेवणें; माझ्याठायीं ( ईश्वराचे ठिकाणीं ) अनन्य व एकनिष्ठ भक्ति, मनाला प्रसन्नता आणणाऱ्या जागीं राहण्याची आवड, प्राकृतजनसंसर्गाची नावड; मी ईश्वराचाच अंश आहें असें मनांत नेहमीं वागविणें, तत्त्वबोधाचें प्रयोजन मोक्ष असें समजणें—यालाच ज्ञान म्हणतात; याहून निराळें तें अज्ञान होय."

वर सांगितलेलीं सर्व लक्षणें टाकीमहाराज ऊर्फ श्री भाई यांच्या अंगीं वसत होतीं. व जो कोणी त्यांच्या जीवनक्रमाचें बारीक दृष्टीनें निरीक्षण करील त्याला हें म्हणणें पटल्याशिवाय राहणार नाहीं. असो. अर्थात् त्यांनीं स्वतःच्या उन्नतीसाठीं वाचन, अवलोकन, परिशीलन वगैरे केलेंच होतें. त्याचप्रमाणें ते ईश्वरचिंतन, स्मरण, मनन, भजन इत्यादि साधनांचा नेहमीं मनमुराद उपयोग करीत असत. अष्टौ प्रहरांपैकीं एकाद्या घडीला देखील हरिभजन करणें, वामनपंडितांनीं म्हटल्याप्रमाणें—

> **घड्या ज्या वस्त्राच्या रजक परिमार्जीत जितुक्या**
> **जलस्पर्शें होती वरिल घडिनें शुद्ध तितुक्या ।**
> **तशासाठीं जेथें हरिभजनही ज्या घडि घडे**
> **तयाच्या संसर्गें सकल घडियांचा मल झडे ॥**

जर इतकें श्रेयस्कर आहे तर जेथें नेहमींच हरिभजन चालू असतें तेथील गोष्ट काय सांगावी ?

प्रथम प्रथम जोगेश्वरीस ज्यांना या गोष्टीची थोडीबहुत गोडी असे असले लोक प्रवचनाकरितां जमत असत. पण पुढें या संबंधाची जसजशी बातमी पसरत गेली तसतशी श्रवणास येणाऱ्या मंडळीची संख्या वाढूं लागली व गिरगांव, दादर, खार, सान्ताक्रूझ वगैरे लांब लांबच्या ठिकाणांहूनहि लोक श्रवणास येऊं लागले. असें होतां होतां श्रोत्यांची संख्या इतकी वाढली कीं, त्यायोगें सद्भक्तिमंदिराचा मोठा दिवाणखाना भरगच्च भरून लोकांस बाहेरच्या गॅलरींत

देखील बसण्याची पाळी येऊं लागली. ही सर्व मंडळी अर्थात् सद्भावानें प्रवचन श्रवण करीत असत. पण त्यांतहि विशेष हा कीं, प्रवचन चालू असतांना भगवंताच्या अगाध लीलांचें वर्णन करण्याची वेळ आली म्हणजे प्रवचनकार भाई हे स्वतः अत्यंत सद्गदित होत असत, इतकेंच नव्हे तर त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा वाहत असत, व श्रोते मंडळीचीहि तशीच स्थिति होत असे. अशा प्रसंगाचें प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनींच गीतेंत—

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥

याप्रमाणें वर्णन केलेलें आहे. तात्पर्य, मंदिरांतलें सबंध वातावरणच भक्तिरसपूर्ण अशा भगवंताच्या कीर्तनानें व भजनानें भरून गेल्यामुळें प्रत्यक्ष श्रीकृष्णाला देखील तशा प्रसंगीं गुप्त रूपानें हजर राहण्यास आवडलें असेल यांत काय आश्चर्य ? भगवंतांनींच श्रीमद्भागवतांत नारदास सांगितलें आहे कीं,

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥

असो. अशा प्रकारचीं भक्तिरसयुक्त प्रवचनें शिंवला व नंतर जोगेश्वरीला नेहमींच चालू असत. पण त्यांचा सारांश टिपून घेण्याचें प्रथम कांहीं दिवस कोणास सुचलें नाहीं. तें काम सन १९२६ सालापासून कांहीं प्रेमळ भक्त करूं लागले. या त्यांच्या हौसेच्या पण देवाच्या सेवेप्रीत्यर्थ पत्करलेल्या कामाचा परिणाम असा झाला कीं, अशा प्रकारच्या प्रवचन-सारांशाच्या अठरा वीस चोपड्या—प्रत्येकीं सुमारें ४५० पानांच्या—म्हणजे सर्व मिळून ९००० पृष्ठें भरतील इतका मजकूर आज तयार आहे. याशिवाय ‘ सद्भक्तिप्रकाश ’ मासिकाकरितां दर महिन्यास भाई स्वतः पुष्कळसा मजकूर सांगत असत तो निराळाच.

इतक्या प्रवचनांचा सारांश इकडे देण्याचा प्रयत्न केल्यास ग्रंथविस्तार फार होईल. सबब तसें करितां येत नाहीं. फक्त भाईंनीं आपल्या येथें जमत असलेल्या मंडळीस प्रवचनांच्याद्वारें एकंदरींत काय शिकविलें ह्याचा मात्र थोडासा उल्लेख करतों:—

भाईंनीं मनुष्यमात्राचें ध्येय काय असावें हें प्रथम सांगून तें ध्येय कोणत्या मार्गानें गेलें असतां प्राप्त होतें हें फार चांगल्या रीतीनें दाखविलें आहे:

## १. ध्येय काय असावें.

याचें पंडितांनीं यथार्थदीपिकेंत असें विवेचन केलें आहे:

**निर्गुण ज्ञान सगुण भक्ति । परमपुरुषार्थ सगुण मुक्ति ।**
**ऐसी गीता भगवदुक्ति । सार सकळां वेदांचें ॥**

म्हणजे सगुण मुक्ति हेंच परम ध्येय होय. हें ध्येय झालें तरी गीतेंतल्या ‘ अक्षरं ब्रह्म परमं ’, ‘ विशते तदनंतरम् ’, ‘ येन मामुपयांति ’ इत्यादि वचनांचाच अनुवाद आहे. व गीता ही मुख्यतः उपनिषदांच्याच आधारानें लिहिलेली असल्यामुळें त्या उपनिषदांतहि **‘ ईशं तं ज्ञात्वा अमृता भवन्ति ’** व **‘ निरंजनः परमं साम्यमुपैति ’** अशीं वचनें जिकडे तिकडे पसरलेलीं आढळावींत यांत आश्चर्य नाहीं.

ज्याला हिंदु धर्मांत सगुणमुक्ति अगर वैकुंठवास म्हटलें आहे त्यालाच बौद्ध ग्रंथांत ‘ निर्वाण ’, ख्रिस्ती धर्मांत ‘ किंग्डम् ऑफ हेव्हन ’ ( Kingdom of Heaven ), पारशी धर्मांत ‘ गॅरोनेमन ’ व इस्लामी धर्मांत ‘ खलास ’ अशीं नांवें दिलीं आहेत. म्हणजे नांवें कोणतींहि असलीं तरी तुकाराममहाराजांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ अंतीं पावतील निजपद ’, अर्थात् मानवी आत्म्यानें शेवटीं परमात्म्याशीं तादात्म्य पावणें हेंच प्राणिमात्राचें खरें ध्येय ठरतें.

## २. जगद्वंद्य धर्म.

याप्रमाणें ‘ ध्येय काय असावें ’ हें भाईंनीं सांगून तें साधण्यास मनुष्यानें ‘ जगद्वंद्य धर्म ’ आचरावा असें प्रतिपादन केलें आहे. ह्या धर्माचें मुख्य तत्त्व म्हणजे—

> यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
> स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥
> कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
> जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥

अर्थात् ज्याच्यापासून प्राणिमात्र उत्पन्न झाले आहेत व ज्याच्या सामर्थ्यानें सर्व जग चाललें आहे त्याला मनुष्यानें आपलें कर्तव्यकर्म निष्काम बुद्धीनें करून संतुष्ट ठेवावें म्हणजे त्याला सिद्धि—दुःखमुक्त पद सहज मिळतें. हें तत्त्व जसें हिंदु धर्मास तसेंच इतर धर्मांसहि मान्य आहे. अतएव हाच जगद्वंद्य धर्म होण्यास योग्य आहे व तो आचरल्यानें जसें हिंदुधर्मीय लोकांस तसेंच ख्रिस्तीधर्मीय अगर महंमदीधर्मीय लोकांस अंतीं श्रेष्ठ स्थान मिळावें यांत काय आश्चर्य ?

याप्रमाणें मनुष्याचें ध्येय व तें गांठण्याचा खरा मार्ग यांचें विवरण करून जगद्वंद्य धर्माचें आचरण करण्याचीं साधनें काय आहेत हें भाईंनीं सांगितलें आहे, व हें सांगतांना त्यांनीं ‘ सगुण ईश्वर ’, ‘ सगुण ज्ञानाची फलप्राप्ति ’, ‘ सगुण भक्तीचा लाभ ’, ‘ क्रियमाण कर्म व त्याच्या नाशाचा उपाय ’, ‘ निष्काम कर्म व ईश्वरार्पणाचें वर्म ’ व अखेर ‘ सगुणमुक्ति किंवा वैकुंठवास ’ अशा क्रमानें त्या साधनांचें फार उत्तम रीतीनें विवरण केलें आहे. पण त्या संबंधाचा इकडे जास्त विस्तार न करतां फक्त त्या मुद्द्यांचें वाचकांच्या माहितीकरितां दिग्दर्शन करण्याचा आम्हीं विचार केला आहे.

## ३. सगुण ईश्वर.

'सगुण ईश्वरा' संबंधीं कित्येक मोठमोठ्या विद्वान् व बहुश्रुत लोकांच्या देखील कल्पना केव्हां केव्हां बाहेर पडतात त्या चुकीच्या असतात. सगुण ईश्वराचें खरें वर्णन उपनिषदांतून ठिकठिकाणीं आलेलें आहे. उपनिषदांत पुढील मंत्र आहे:—

> अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ।
> स एव वेद्यं नच तस्य वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं पुराणम् ॥

म्हणजे "तो ईश्वर हातांपायांशिवाय वस्तूचें जलद ग्रहण करतो; डोळ्यांशिवाय पाहतो; कानांशिवाय ऐकतो; अर्थात् तो सर्व गोष्टी जाणतो, पण त्याला मात्र जाणणारा कोणी नाहीं. तथापि त्याला मोठा, सर्वश्रेष्ठ व आदिपुरुष असें म्हणतात." अशा सगुण ईश्वराचें मनुष्यानें भजन केलें पाहिजे, म्हणजे मग सगुणज्ञानाची फलप्राप्ति होते.

## ४. सगुणज्ञानाची फलप्राप्ति.

भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायांत ७५ व्या श्लोकांत संजयानें '**व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम्**' असें म्हटलें आहे. संजय हा व्यासाचा शिष्य होता, व त्याला गुरूपासूनच ब्रह्मज्ञानप्राप्ति झाली होती. भगवंतांनीं सांगितलेला ऐश्वरयोग त्याला पूर्वी माहित नव्हता. म्हणूनच वर त्या योगाला 'गुह्य' असें विशेषण दिलें आहे.

> मी शिष्य व्यासाचा । ज्यानें दिधला ब्रह्मसाक्षात्कार साचा ॥
> तथापि योग ऐश्वर जगन्निवासाचा । हें जग ऐसेंच म्हणूनी मी नेणें ॥
> हें जगची जगदीश्वर । परम गुह्य हा योग ऐश्वर ॥
> तो स्वयें बोलतां योगेश्वर । आइकता मी झालों तयापासुनी ॥

## ५. सगुण भक्तीचा लाभ.

भक्ति म्हणजे मोक्षप्रद सगुण सर्वेश्वराची आत्मत्वभावें प्रीति. रंगनाथ-स्वामींनीं म्हटलें आहे:—

ईश्वरीं जे अनन्य प्रीति । तेचि जाण विमल भक्ति ।
तेणें आभारें विश्वमूर्ति । सर्वेश्वरू तो ॥

श्रुतीमध्येंहि अनन्यभक्तीचें असें वर्णन आलें आहे:—

अथ योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योऽसावन्योऽहमस्मीति न स वेद यथा पशुः ॥

श्रुति म्हणे, जो उपासितो देवता अन्य । कीं देव अन्य, मी अन्य ।
ऐसा भेद मानोनी, अनन्य । उपासितो, तो नेणता पशु जैसा ॥

अर्थात् जो पूर्वीं ब्रह्मास निर्माण करतो व त्यास वेद देतो अशा मोक्षद सगुण सर्वेश्वराची सर्वात्मभावें घडणारी जी प्रीति तिचेंच नांव भगवद्भक्ति होय.

## ६. क्रियमाण कर्म व त्याच्या नाशाचा उपाय.

कर्म त्रिविध आहे:—संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध. त्यांपैकीं अनेक जन्मांत केलेलें जें कर्म बुद्धिरूप पेटींत सांठवून ठेवलेलें असतें त्यास **संचित** म्हणतात. त्याचा नाश ज्ञानाभ्यासानें चित्तचैतन्य होतांच होत असतो.

मनुष्य हा शरीर, मन व इंद्रिय यांच्या योगें यावज्जीव 'मी देह' या भावनेनें जीं कर्में करतो त्यांस **क्रियमाण** म्हणतात. हीं कर्में देह पतन झाल्यावर संचितास जाऊन मिळतात.

या संचितांतून निवडून एक जन्म भोगण्याकरितां जें कर्म ईश्वर देतो त्यास **प्रारब्ध** म्हणतात. आत्मा निष्क्रिय असल्यामुळें आपण कांहीं-एक करीत नसून प्रारब्धानुरूप प्रकृतीकडून सर्व कर्में आपोआप होत असतात व तिचे आपण केवळ साक्षी आहों असा सत्संगतींत निश्चय

होऊन जो ईश्वरभक्तीशिवाय दुसरी कसलीच इच्छा करीत नाहीं, त्याचें आत्मसाक्षात्कार होण्यापूर्वींहि क्रियमाण नष्ट होतें.

प्रारब्धाचा मात्र भोगानेंच क्षय होतो.

प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः । ( स्मृति )
स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ॥ ( भ. गी. )

प्रारब्ध सरे भोगें । संचित जळे चित्तचैतन्ययोगें ।
कर्म हेतु प्रकृति वियोगें। साक्षि होतां बुद्धीस लेप न लागे क्रियमाणाचा ॥
( य. दी. )

## ७. निष्काम कर्म व ईश्वरार्पणाचें वर्म.

कोणतेंहि धार्मिक कृत्य करून शेवटीं '**ॐ तत्सत्कृष्णार्पणमस्तु**' किंवा '**तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु**' म्हटल्यानें तें खरें ईश्वरार्पण होत नाहीं. आत्मानात्मविवेकाचें ज्ञान होऊन आत्मा वस्तुतः कांहींच करीत नसून प्रकृति आपणांकडून प्रत्येक कर्म करविते असा बुद्धीचा निश्चय झाला कीं तें खरें ईश्वरार्पण होतें. एकनाथमहाराजांनीं म्हटलें आहे:—

मी एकु कर्मकर्ता । ऐसी उठों नेदी अहंता ।
तें कर्मचि स्वभावतां । अर्पि श्रीअनंता ईश्वरातें ॥
सांडितां कर्माभिमान । कर्म होय ब्रह्मार्पण ।
हें संकल्पेंवीण जाण । अर्पितो खूण उद्धवा ॥ ( ए. भा. )

भोगें प्रारब्धाचा क्षय । ऐसा सकळशास्त्रांचा निर्णय ।
याकारणें रुक्मिणीप्रिय । कर्मसमर्पण म्हणे करावें आपणातें ॥ ( य. दी. )

अमुक फळ मिळावें अशी इच्छा धरून केलेलें कर्म **सकाम कर्म** व तशी इच्छा न धरतां केलेलें कर्म **निष्काम कर्म** असें म्हणतात. कामना मनांत न धरतां ईश्वराची आज्ञा म्हणून केलेलें कर्म तेंहि ईश्वरार्पणच म्हणावयाचें:—' मत्कर्मकृत् मत्परमो मद्भक्तः ' ( भ. गी. )

## ८. सगुणमुक्ति किंवा वैकुंठवास.

श्री वामनपंडितांनीं सगुणमुक्तीची अगर वैकुंठवासाची पुढीलप्रमाणें थोरवी वर्णिली आहे:—

घनाच्या मुखें सिंधुचा बिंदु जैसा । मिळे सागरीं, निर्गुणीं मोक्ष तैसा ।
सदा भेटते ऐक्य पावोनि गंगा । समुद्रीं असी भक्ति हे अन्तरंगा ॥

म्हणजे पावसाचा थेंब समुद्रास एकदांच मिळून नाहींसा होतो. पण गंगानदी सतत समुद्रास मिळूनहि वाहतच असते. त्याचप्रमाणें निर्गुण परमात्म्याशीं ऐक्य झालें म्हणजे त्याला निर्गुण मोक्ष किंवा सायुज्यता म्हणतात. परंतु असा मोक्ष मिळाल्यावर त्याच्या दुःखाबरोबर सुखाचाहि नाश होतो. परंतु वैकुंठवास लाभला म्हणजे जन्ममरणाचा नाश होऊन अखंड सुख प्राप्त होतें.

भक्त्या मामभिजानाति यावान् यश्चास्मि तत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥

असो. याप्रमाणें भाईंनीं प्रवचनांच्या द्वारें सद्भक्तिमंदिरांत जमत असलेल्या श्रद्धाळू लोकांस मनुष्यमात्राचें ध्येय कोणतें असावें हें सांगून तें गांठण्याचा मार्गहि क्रमाक्रमानें दाखविला. पण आणखीहि दोन महत्त्वाचे मुद्दे त्यांनीं प्रतिपादिले आहेत. ते म्हणजे (१) त्रिमूर्ति हें जगाचें आराध्य दैवत आहे, व (२) श्रीमद्भगवद्गीता हा जगद्वंद्य धर्मग्रंथ आहे, हे होत.

त्रिमूर्ति ही केवळ हिंदुलोकांनाच पूज्य नसून सर्व मुख्यधर्मीय लोकांनाहि पूज्यच आहे.

१. हिंदु धर्म—ब्रह्मा, विष्णु, महेश.
२. बौद्ध धर्म—बुद्ध, धर्म आणि संघ.
३. ख्रिस्ती धर्म—पिता, पुत्र व पवित्र आत्मा.
४. पारशी धर्म—अग्नि, उदक व सूर्य.
५. इस्लामी धर्म—रहमान्, रहिम व मालिक.

येथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिंदु धर्मांत त्रिमूर्तीला गुरुदेव म्हणतात, व त्याची शैव, वैष्णव वगैरे सर्वपंथीय लोक उपासना करीत असतात. याचें कारण असें कीं इतर अवतारांत देवाला एकाद्या असुराचा किंवा दुष्टाचा नाश करावयाचा होता. श्रीदत्तावतारांत तसें कांहीं करावयाचें नसून फक्त जनतेवर कृपा करावयाची होती. अर्थात् श्रीदत्ताचा अवतार हें एक दयाळू सद्गुरूचेंच रूपक आहे असें उघडच दिसतें.

आतां जगाच्या दृष्टीनें भगवद्गीतेच्या योग्यतेसंबंधानें भाईंनीं फार उत्तम व मार्मिकपणानें विवेचन केलें आहे. गीता ही हिंदु लोकांच्या एका प्राचीन ग्रंथाचा (महाभारताचा) भाग आहे असें जरी खरें असलें तरी तो ग्रंथ सर्व देशांतील लोकांच्या कल्याणाकरितां भगवंतानें निर्माण केला आहे असें उघड दिसतें. त्या ग्रंथांत प्रतिपादिलेलीं तत्त्वें इतकीं उदात्त व त्रिकालाबाधित आहेत कीं त्यामुळें त्या ग्रंथावर केवळ हिंदु लोकांचाच हक्क नसून जगांतील सर्व राष्ट्रांचा हक्क आहे, असें आजकाल सर्व देशांत चाललेल्या धर्मविषयक विचारक्रांतीवरून दिसून येत आहे.

गीतेच्या या अधिकारासंबंधानें त्या ग्रंथांतील एकदोन गोष्टींचाच उल्लेख पुरेसा आहे. गीतेनें ब्राह्मणादि जातींची व्याख्या केली आहे ती ‘ शमोदमस्तपः शौचं ’ गुणकर्मांवरून केली असून ती जन्मावर आधारलेली नाहीं. त्यामुळें ती व्याख्या सर्व देशांतील लोकांस लागू होण्यासारखी आहे. व त्यामुळेंच आपल्या देशांतील संतमंडळांतील तुकाराम, सजनकसाई, चोखामेळा, कबीर वगैरे संतश्रेष्ठ ब्राह्मणांसहि पूज्य झालेले आहेत. त्याचप्रमाणें गीतेनें आहाराविषयीं प्रतिपादन करतांना फक्त सात्त्विक आहारच श्रेष्ठ सांगितला आहे. अमुक प्रकारचें धान्य किंवा फळें आहारास योग्य आहेत असें सांगितलें नाहीं. कारण हवा किंवा परिस्थिति बदलल्यास पदार्थांचे गुणधर्महि बदलूं शकतात. जसें, ताक पूर्वीं अपायकारक गणलें

जात असे, पण तेंच आतां आरोग्यवर्धक गणलें जाऊन सात्त्विक आहारांत मोडतें. तात्पर्य काय कीं, गीतेचें प्रतिपादन हें सार्वत्रिक व सार्वकालिक होण्यासारखें आहे.

दुसरें असें कीं, मनुष्यास उत्तम गति मिळविण्याचें साधन म्हणजे फक्त ईश्वरभजन होय हें तत्त्व केवळ गीतेसच नव्हे तर सर्व धर्मांस मान्य आहे.

(१) **अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥—भ. गी.**

(२) **ईश्वराची भेट व्हावी अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं त्याचें भजन करावें, असें ख्रिस्ती धर्म सांगतो.** ( Glory ye in His Holy Name; let the heart of them rejoice that seek the Lord.—*Bible* )

(३) **ज्या अहुर्मज्दाहून कोणी श्रेष्ठ नाहीं, त्याचीं स्तोत्रें गाऊन स्तवन व गौरव करा हें पारशी धर्माचें तत्त्व आहे.** ( Sing hymns of glory to that Ahur Mazda beyond Whom there is none.—*Yasna* )

(४) **परमेश्वराचीं अनंत नामें असून तीं सर्व अत्युत्तम आहेत; म्हणून तीं नामें गाऊन त्याची करुणा भाका, असें इस्लामी धर्म स्पष्ट प्रतिपादितो.** ( God hath most excellent names; therefore call on Him by the same.—*Al Koran* )

( १ ) श्रीकृष्णांनीं गीतेंत, आपलें प्रतिपादन त्रिकालाबाधित व सार्वत्रिक व्हावें या हेतूनें मी देवकीपुत्र जो श्रीकृष्ण त्यालाच भजा असें न सांगतां, ' अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ॥ . . . . तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ॥ ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥' सर्व जगाचा उत्पत्तिकर्ता व चालक असा जो ( मी ) त्याला भजा असें सांगितलें आहे. यामुळें गीता हा सर्व जगाचा धर्मग्रंथ होण्यास योग्य आहे, हें सिद्ध होतें.

( २ ) ब्रूक्स म्हणतोः ' **गीता हें हिंदु धर्माचें केवळ पुस्तक नसून . . . विश्वव्यापी शाश्वत धर्माचें पुस्तक आहे; व ह्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील आर्यांपेक्षां**

 ५५५

आम्हां युरोपियनांचाच त्यावर अधिक वारसा हक्क आहे.' ('*Gospel of Life* : BROOKS )

( ३ ) जस्टिस मिर्झा अली खान म्हणतात:—' भगवद्गीता ईश्वरप्रेरित आहे हें तत्त्व इस्लामी धर्मास मान्य आहे.'

( ४ ) विल्यम हंबोल्ट म्हणतो:—' जगांत जितके म्हणून ग्रंथ आहेत, त्यांत अतिगहन व प्रगल्भ तत्त्वें ज्यांत प्रतिपादन केलीं आहेत असा भगवद्गीते-सारखा एकहि ग्रंथ सांपडणार नाहीं. परमेश्वरानें मला आयुष्य देऊन या ग्रंथाचा अभ्यास करण्याचा योग घडवून आणला हें मी माझें भाग्य समजतों. आणि जेव्हां जेव्हां मी हा ग्रंथ वाचतों तेव्हां तेव्हां मी त्या परमेश्वराचे आभार मानल्याशिवाय राहात नाहीं.'

याप्रमाणें भगवद्गीतेच्या थोर योग्यतेविषयीं सर्व धर्मांच्या व देशांच्या विद्वान् व अभ्यासी वृत्तीच्या लोकांचें अत्यंत अनुकूल मत व आदर असल्यामुळें त्या ग्रंथाचीं इंग्लिश, फ्रेंच, लॅटिन, जर्मन वगैरे सर्व युरोपियन भाषांतून भाषांतरें व्हावींत यांत आश्चर्य नाहीं. हिंदुस्थानांतील अनेक भाषांतून त्याचीं भाषांतरें तर कधींच झालीं आहेत.

' अशा रीतीनें सर्वतोपरी निर्भय व व्यापक असून सम म्हणजे वर्णाचा, ज्ञातीचा, देशाचा किंवा दुसरा कोणताच भेद न ठेवितां सर्वांस एकाच मापानें एकच सद्गति देणारा व इतर धर्मांबद्दल योग्य सहिष्णुता दाखविणारा ज्ञान–भक्ति–कर्मयुक्त असा हा गीताधर्म सनातन वैदिक धर्मवृक्षाचें अत्यंत मधुर व अमृतफल आहे.'—गीतारहस्य.

आणि खरोखरीच कै. रामभाऊ गुंजीकरांनीं आपल्या गीतेच्या प्रस्ता-वनेंत म्हटल्याप्रमाणें:—

' थोर भाग्य पृथ्वीचें, म्हणून श्री भगवद्गीतेसारखा पुण्यग्रंथ उपलब्ध झाला. याच्या योग्यतेचें वर्णन करण्याचें वाणीला सामर्थ्य नाहीं. केवळ अर्जुनाला बोध करण्याकरितां नव्हे तर सर्व सृष्टीच्या उद्धारास्तव परमात्म्यानें ही अमूल्य देणगी देऊन ठेविली आहे, व याबद्दल आम्ही त्या परमात्म्याचें सदैव ऋणी राहिलें पाहिजे.'

तसेंच भाई नेहमीं सांगत असत कीं श्रीमद्भगवद्गीतेंतील तत्त्वज्ञानच विशद रीतीनें उद्धवास श्रीमद्भागवतांत उपदेशिलें आहे. याचें कारण गीता ही अर्जुनास थोडक्या वेळांत सांगणें भाग होतें, तशी स्थिति उद्धवास उपदेश करण्याच्या वेळीं नव्हती. यास प्रमाण:—

(१) उभे कौरव पांडव रणीं । मिळाली असे अणीस अणी ।
हे भगवद्गीता चक्रपाणी । उभयदळामध्यभागीं रथी उपदेशितो ॥
गीता शास्त्र सूत्रप्राय । गूढ येथें जो भगवदभिप्राय ।
याच्या अर्थबोधाचा उपाय । विशद श्रीमद्भागवतीं ॥
श्रीभागवत महापुराण । तेथें वेदव्यासरूपी नारायण ।
विशद गीतार्थ निरूपण । पदोपदीं करीतसे ॥—य. दी.

(२) सांडोनि निजधामा जाणें । स्वयें श्रीकृष्ण त्याकारणें ।
देता झाला निजगुह्य ठेवणें । त्याचें भाग्य वानणें ते किती ॥
म्हणाल सांगितलें अर्जुनासी । तोही अत्यंत पढियन्ता त्यासी ।
त्या हातीं उतरावया धराभारासी । युद्धीं त्वरेंसी उपदेशिला ॥
तैसें नव्हे उद्धवाकडे । सावकाश निजनिवाडें ।
गुह्य ठेवणें फाडोवाडें । अवघें त्यापुढें अर्पिलें ॥'—ए. भा.

श्रीमद्भगवद्गीता व श्रीमद्भागवत या दोन्ही ग्रंथांचा सात्त्विक व प्रेमळ संतांनीं व परदेशस्थ पंडितांनीं गौरव केला आहे यांत नवल नाहीं. पण वॉरन हेस्टिंग्जसारख्या रजोतमोगुणी म्हणजे केवळ मुत्सद्दी सुभेदाराला सुद्धां त्यांची योग्यता पटून त्यानें त्याविषयीं काढलेले उद्गार खालीं दिले आहेत. हे दोन्ही ग्रंथ जगन्मान्य होण्यास कांहींच हरकत नाहीं. कारण अतिशय सात्त्विक व अत्यंत तमोगुणी अशा दोघांनाहि ते मान्य झाले आहेत.

(१) 'गीता हा ग्रंथ अगदीं अपूर्व आहे. त्यांत प्रतिपादन केलेले सिद्धांत, विचारसरणी व तिची भाषा ह्यांच्याशीं बरोबरी करणारा जगांतील जे धर्म मला माहीत आहेत त्यांमध्यें एकहि धर्मग्रंथ नाहीं. ज्या धर्मतत्त्वांचें त्यांत विवेचन केलें आहे तीं तत्त्वें आपल्या ख्रिस्ती लोकांच्या बायबलचा नवीन शुभवर्तमान म्हणून जो भाग आहे त्यांत प्रतिपादन केलेल्या सिद्धांतांची बरोबरी करतील

इतकेंच नाहीं तर त्यावर अति उज्ज्वल प्रकाश पाडतील अशी माझी खात्री आहे.'

( २ ) 'आपणां इंग्रज लोकांच्या विचारसरणीला न झेपण्यासारखे परमावधीचे उन्नत व उदात्त विचाराचे अनेक प्रसंग भागवतग्रंथांत सांपडतील आणि आपल्या रुचीला न रुचणाऱ्या विविध कल्पनांचे चमत्कारहि यांत दृष्टीस पडतील. तथापि आपण कृपा करून हा ग्रंथ एकवार अवश्य वाचून पाहावाच, अशी माझी विनंति आहे.'

श्रीमद्भागवत हें एक पुराण आहे व श्रीमद्भगवद्गीतेंतील अ. १३ श्लोक ७-११ यांत ज्ञान्याचीं जीं अठरा लक्षणें सांगितलीं आहेत त्यांच्या स्पष्टीकरणाकरितां अठरा पुराणें लिहिलीं आहेत, असें पुढील प्रमाणावरून दिसून येईल:—

> हींच अष्टादश लक्षणें । अष्टादशाध्यायीं बोलिलीं कमलेक्षणें ।
> तींत जगदज्ञानमोक्षणें । व्यासें अष्टादश पुराणें बोलिलीं ॥—य. दी.

आतां कित्येक आधुनिक विद्वान् पुराणांना त्याज्य मानतात. त्यांत बीभत्स प्रकार कित्येक ठिकाणीं वर्णिले आहेत हें खरें, पण तेवढ्यावरून तीं सर्वस्वीं त्याज्य ठरत नाहींत. कारण त्यांतील हे बीभत्स प्रकार अनुकरणीय म्हणून म्हटलें नसून त्याज्य म्हणूनच सांगितलें आहे. ज्या शेक्सपियरच्या नाटकांची आधुनिक विद्वान् स्तुति करतात, त्यांत काय बीभत्स प्रकार कमी वर्णिले आहेत ? मग तीं नाटकें जर अभ्यसनीय ठरतात, तर पुराणें तेवढीं त्याज्य ठरावीं हें विलक्षण नव्हे काय ? पण खरें पाहिलें तर मनुष्यस्वभावाचें चित्र शेक्सपियरनें जितक्या विविधतेनें व कुशलतेनें रंगविलें आहे, त्याहून कितीतरी विविधतेनें मनुष्यस्वभाव पुराणांत चितारला आहे.

श्रीभाईंनीं पुराणें हीं जनांस सन्मार्गास लावण्यास कशीं उपयोगी आहेत हें दृष्टांत देऊन एका प्रवचनांत सांगितलें आहे तें येणेंप्रमाणें:—

पुराणें हीं सर्व जनांस सन्मार्ग लावण्यास फार उपयोगी आहेत. उदाहरणार्थ, नीतिशास्त्राचे सिद्धांत शिकविण्याच्या कामीं महाभारताचा फार महत्त्वाचा उपयोग होतो. मुलें, मुली, पुरुष व स्त्रिया वगैरे सर्वांनीं आयुष्याच्या प्रत्येक भागांत कसें वागावें, हें महाभारतांत उत्तम रीतीनें प्रतिपादन केलें आहे. रोजच्या आयुःक्रमांत लागणाऱ्या गोष्टी दृष्टांतांच्या द्वारें त्यांत फार मनोरंजक रीतीनें सांगितल्या आहेत. 'सत्य सदा बोलावें' हें तुमचें कर्तव्य आहे, असें न सांगतां, सत्याच्या मार्गानें गेले त्यांना त्यापासून काय फल प्राप्त झालें, अशा लोकांच्या कथा त्यांत दिल्या आहेत, व त्यापासून कोणता धडा घ्यावा हें जोरदार भाषेंत सांगितलें आहे. तसेंच 'खोटें कधीं बोलूं नये' असें फक्त न सांगतां खोटें बोलणाऱ्यांना काय परिणाम भोगावे लागले हें अनेक कथा देऊन दाखविलें आहे. ज्याप्रमाणें शिक्षक गणिताचा नियम समजावितांना बरींच उदाहरणें सोडवून दाखवितो, आणि तेणेंकरून उदाहरणांच्या साहाय्यावांचून जर तो नियम कोणी विद्यार्थी शिकला असता त्यापेक्षां तो नियम उत्तम प्रकारें शिकणाराच्या—विद्यार्थ्यांच्या—मनावर ठसतो, त्याप्रमाणें दृष्टांतांच्या साहाय्यानें नीतिशास्त्राचे नियम कसे प्रचारांत आणावे, हें आपण महाभारताच्या अध्ययनानें उत्तम प्रकारें शिकतों.

याप्रमाणें श्रीमद्भगवद्गीतेच्या सर्वश्रेष्ठ योग्यतेविषयीं भाईंनीं विवेचन करून दुसऱ्याहि एकदोन मुद्द्यांसंबंधानें आपल्या प्रवचनांच्या द्वारें फार मार्मिक व समर्पक रीतीनें खुलासा केला आहे. ते मुद्दे म्हणजे श्रीकृष्ण परमात्मा याचा अवतार व त्याची रासक्रीडा वगैरे अवतारकृत्यें यासंबंधीं कित्येक मिशनरी लोकांनीं व इतरांनीं घेतलेले आक्षेप. याविषयींहि इकडे फार विस्तार न करतां वरील आक्षेपांचें भाईंनीं कसें खंडन केलें आहे त्याचें फक्त दिग्दर्शन करतों.

ज्या भगवद्गीतेची थोरवी वर वर्णिल्याप्रमाणें आहे ती गीता सांगणाऱ्या श्रीकृष्ण परमात्म्याची योग्यताहि तशीच श्रेष्ठ असली पाहिजे हें उघडच आहे. गीता ही श्रीकृष्णांनींच अर्जुनाला सांगितली याबद्दल तर वादच नाहीं. गीतेच्या प्रत्येक आवृत्तीस जोडलेल्या ध्यानाच्या पहिल्याच श्लोकावरून तें सिद्ध आहे.

**"पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयम् ॥"** पण या मुद्द्यासंबंधानें एकदां स्वामी विवेकानंदांनीं काढलेले उद्गार अत्यंत संस्मरणीय आहेत, ते हे:—

'कोणत्याहि अवतारी पुरुषाचें चरित्र तुम्हीं पाहिलें तर त्याचा अवतार होण्यापूर्वी जो कल्पनासमूह अस्तित्वांत होता त्याचेंच उत्क्रांतरूप त्या अवतारी पुरुषाच्या द्वारें व्यक्त झालें आहे असें दिसून येईल. त्या त्या देशांत त्या त्या काळीं जीं धर्मतत्त्वें इतस्ततः वावरत होतीं, त्यांचेंच एकीकरण करून तीं सुसंबद्ध रीतीनें जनतेस शिकविण्याचें कार्य तो करीत असतो. दीर्घकालानंतर असा एकादा पुरुष तरी खरोखरी अस्तित्वांत होता कीं नाहीं अशी शंका उत्पन्न होणें हल्लींच्या काळीं साहजिक आहे. पण तसें झालें तरी त्यानें सांगितलेलें तत्त्वज्ञान नष्ट झालेलें नसतें. तें जगांत जीवंत रूपानें सदोदित वावरतच असतें. निष्कामकर्म, निष्कामप्रेम व श्रीकृष्णांनीं सांगितलेलें दुसरें तत्त्वज्ञान या गोष्टी हल्लीं नष्ट झालेल्या आहेत काय ? त्यांचें अस्तित्व आज आम्ही डोळ्यांनीं पाहात नाहीं काय? मग तीं तत्त्वें कोणातरी एका व्यक्तीपासून उत्पन्न झालीं असलीं पाहिजेत असें आम्हीं म्हटलें तर त्यांत काय बिघडलें ? तीं तत्त्वें आकाशांतून पडलीं व धरणीवर सांवरलीं असें तर झालें नाहीं हें खास. मग तीं जिकडून निर्माण झालीं असें एक मूल-स्थान असलें पाहिजे असें म्हणणें चुकीचें होईल काय ? जर तसें नाहीं, तर त्या तत्त्वांचा प्रचार श्रीकृष्णांनीं प्रथम केला असें म्हणण्यांत मुळींच चूक होत नाहीं.'—नवम खंड, पृ. २१३.

नीतिशास्त्रांचीं तत्त्वें शिकविण्यांत श्रीकृष्ण हे येशू ख्रिस्तापेक्षां कमी तर ठरत नाहींतच. ते त्याच्याहिपेक्षां कदाचित् अधिक श्रेष्ठ ठरतील. ख्रिस्ती बायबलांत नीतिपोषक असें जें एक वाक्य दाखविण्यांत येत असतें तें हें :—'आपल्या स्वतःवर जसें तुझें प्रेम आहे तसेंच दुसऱ्यावर, शेजाऱ्यावर ठेवावें.' पण

याच्याच तोडीचें नीतितत्त्व अगर त्याहिपेक्षां अधिक स्पष्ट असें वाक्य भगवद्गीतेंत आहे :

> आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
> सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥

यांत सर्वांशीं समबुद्धीनें वागण्याचाच उपदेश केला आहे. पण येशू ख्रिस्तापेक्षांहि श्रीकृष्णांनीं प्रतिपादन केलेलें तत्त्व अधिक उदात्त व श्रेष्ठ आहे असें म्हणण्यास आणखी एक कारण आहे. फक्त ख्रिस्ती मनुष्यासच येशू तारील, इतरांस तारणार नाहीं असें ख्रिस्ती धर्मोपदेशक सांगत असतात. व तसेंच फक्त मुसलमानासच गति आहे, इतरांस नाहीं असें इस्लामी धर्मोपदेशक म्हणतात. पण कोणत्याहि जातीचा अगर मताचा मनुष्य असो, तो परमेश्वराच्या कोणत्याहि विभूतीच्या भक्तीनें मोक्षास जाईल हें अत्यंत उदात्त तत्त्व श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत प्रथम प्रतिपादिलें आहे.

> येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।
> तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥
> यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
> तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥
> यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
> तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ॥

इतकें भक्तिमार्गाचें (Religion of Devotion) उदात्त धोरण गीतेशिवाय इतर कोणत्याहि धर्मांत मिळूं शकेल असें वाटत नाहीं.

आतां श्रीकृष्णाच्या रासक्रीडेसंबंधानें जे आक्षेप घेण्यांत येत असतात त्यांसंबंधानें भाईंनीं प्रवचनांच्या द्वारें जे कांहीं विचार लोकांपुढें मांडले आहेत त्यांचा थोडक्यांत उल्लेख करून हें प्रकरण संपवूं.

यासंबंधानें प्रथम एक गोष्ट सांगितली पाहिजे. श्रीकृष्णांच्या क्रीडा कांहीं ठिकाणीं रहस्यमय आहेत. स्वामी विवेकानंदांनीं एकदां म्हटल्याप्रमाणें,

स्वतः अत्यंत शुद्ध व पवित्र होईपर्यंत तें रहस्य समजून घेण्याचा कोणीं प्रयत्न करूं नये. किंबहुना प्रेमामृतानें पूर्ण वेडा झाल्याशिवाय तें रहस्य कळणारहि नाहीं. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे गोपींचें श्रीकृष्णावरील प्रेम हें एक सर्व प्रकारच्या प्रेमाला आदर्शभूत होईल असें होतें. या प्रेमाचें दर्शक असें भागवतांतील एकच वचन देतोंः—

तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।
श्रवणमंगलं श्रीमदाततं भुवि गृणंति ये भूरिदा जनाः ॥

गोपीगीतांत सर्व गोपी मिळून श्रीकृष्णाला आळवितांना म्हणतात कीं, ‘ देवा, तुझें कथामृत जगांत जे जे कोणी ग्रहण करतील त्यांचें त्यांचें कल्याण झाल्याशिवाय राहणार नाहीं. ’

रासक्रीडेसंबंधानें आक्षेप घेतांना आक्षेपकांनीं प्रथम ही गोष्ट लक्षांत धरली पाहिजे कीं, ती क्रीडा करतांना श्रीकृष्णाचें वय अवघें सात वर्षांचें होतें ! त्या वयांत मनुष्यास कामवासना उत्पन्न होणें शक्य आहे काय ? आतां श्रीकृष्ण हे परमेश्वराचे अवतार असल्यामुळें त्यांना त्या अल्पवयांत देखील कामवासना होणें शक्य होतें असें मानावयाचें तर हेच आक्षेपक श्रीकृष्णांचीं इतर कांहीं अद्भुत कृत्यें कबूल करण्यास तयार नसतात हें विचित्र नव्हे काय ? एक गोष्ट कबूल करणें व दुसरी कबूल न करणें हें सरळ नव्हे. दुसरें असें कीं, श्रीकृष्णांनीं गोपींशीं कामवासनेनें मोहित होऊनच संबंध ठेविला होता असें मानावयाचें तर त्यांच्यापासून एकाहि गवळणीला गर्भसंभव झाला नाहीं कीं कुणाला मूल झालें नाहीं हें कसें ? अर्थात्, अशा प्रकारचे आक्षेप हे सर्व अविचारमूलक असतात हेंच खरें !

श्रीकृष्णांच्या पावित्र्यासंबंधानें केव्हां केव्हां आक्षेप घेतांना ऐकण्यांत येत असतात. पण त्यांचेंहि कारण बहुतेक विचार करण्याची अनिच्छाच. श्रीकृष्णांसाठीं गोपींना घरदार सोडावें लागलें. पतींना सोडून जावें लागलें हें

फार वाईट असें कित्येक म्हणतात. पण स्वतः येशू ख्रिस्त देखील तसेंच करीत असे याचा कोणी विचार करतो काय ? मॅथ्यू ( Mathew 10. 37; 19. 29; Luke 14. 26) व ल्यूक यांच्या शुभवर्तमानांत असें सांगितलें आहे कीं, जेव्हां येशू बोलावील तेव्हां पति, पत्नी, माता, पिता यांचा त्याग केला पाहिजे, म्हणजे अंतकालचें जीवन (eternal life) हें फळ मिळेल. मग येशूनें केलें तें चांगलें व श्रीकृष्णांनीं केलें तें वाईट असें म्हणावयाचें काय ?

तात्पर्य, हे सगळे आक्षेप कोणत्याहि गोष्टीकडे दोषैकदृष्टीनें पाहणाऱ्या लोकांचे असतात. ते जर त्याच गोष्टीचा निर्विकार दृष्टीनें विचार करतील तर त्यांना खरा प्रकार पटल्याशिवाय राहणार नाहीं.

आणखी एक गोष्ट सांगावयाची ती ही कीं, हें श्रीकृष्णांच्या लीलांचें वर्णन शुकाचार्यांनीं—म्हणजे आजन्म ब्रह्मचर्य पाळणाऱ्या महातपस्व्यानें —केलें आहे. अर्थात् त्या लीलांचें वर्णन त्या दृष्टीनें वाचलें पाहिजे.

# श्री भाईंच्या हस्ताक्षराचा नमुना

गीता अ. १४ श्लोक २ ज्ञा.दी.ओ. ८४

'इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः' — अगा! अर्जुना! पाती ज्ञानें करूनी। मान ज्ञानाचा आश्रय धरूनी।
निकट आले ना मज ज्ञानी। [illegible] करूनी। साधर्म्य माझें पावले ॥८४॥ हें ज्ञान मोक्षसदन। सर्वां ऐसें आहे
विशेष। आतम्या [illegible] ते पवित्र। जे पवित्रते ॥८५॥ जे नुसते ज्ञानी। कुशल मननादि करून,
ऐसे मुनी। सगुण भक्ती ते करिती, म्हणोनी। पावती मुक्तीते परती पुन्हा। [illegible] ॥८६॥ [illegible]
सर्व प्रकृती। [illegible] अखंड ब्रह्मस्थिती। तेही नव्हे ते पावती। तीपरती मुक्तीते ॥८७॥ ज्ञानी होऊनी
सगुण भक्त। जे सर्वांत भावें सगुणीं अनुरक्त। ते पूर्ण ज्ञाले मुक्त। तरी माझी सधर्मता पावती ॥८८॥
ब्रह्मी [illegible]। सगुण मोक्षी [illegible]। ते [illegible] कीर्ती [illegible]। ऐसें सुजनी ॥८९॥ ईश्वरी
[illegible] धर्म। ऐसा की अखंड आपण ब्रह्म। माझें साधर्म्य पावले त्यांचे सर्वोत्तम। [illegible] ॥९९॥
ऐसे साधर्म्य [illegible]। [illegible] त्यां। [illegible] धनंजया। शंका उपजली ॥१००॥ की प्रलयीं [illegible]
[illegible] साधर्म्य। न उरे, ऐसें मुक्ती न [illegible]। सर्व संहार ज्ञालेया [illegible]। तेंन [illegible] ॥१०१॥
तेव्हां ज्ञानी सगुण भक्त। जे ऐसे साधर्म्य युक्त। [illegible] तेही मुक्त। नउरती सर्वथा ॥१०२॥ [illegible]
नसती सर्वथा। तेथें मुक्त देह आदिं यांची काय कथा? । तें [illegible] प्रलयकाळीं [illegible]। तेही पावत
असतील ॥१०३॥ प्रलयीं नाश आंता। सृष्टीकाळीं [illegible] उत्पत्ती होती [illegible]। मोक्ष [illegible]
[illegible] ॥१०४॥ या संशयाचा परिहार। साधर्म्य [illegible]। की प्रलयकाळीं नसती आकार।
माझेही आणि अज, अव्यय, ईश्वर मी ॥१०५॥ [illegible] आकार। [illegible] आणि प्रलयीं
संहार। [illegible] पावती, तरी ते प्रकार। तेही पावती, जे पावले माझें साधर्म्य ॥१०६॥ साधर्म्य [illegible]
अर्थ। [illegible] पार्थ। [illegible] समर्थ। [illegible] ॥१०७॥
'सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च' ॥२॥ अगा! सृष्टिकाळ ज्ञाला असतांही। ते न उपजती कांहीं।
प्रलय होतांही, होत नाहीं। व्यथा कांहीं त्यांतें ॥१०८॥ की सृष्टीकाळीं [illegible]। मूर्ती प्रगटती धनंजया! प्रल
यकाळीं त्या [illegible]। मूर्ती [illegible] पावती ॥१०९॥ [illegible] प्रलयीं [illegible] मूर्ती। नसती आणि
सृष्टिकाळीं प्रगटती। प्रगटती [illegible], उपजती। न [illegible] त्यां मूर्तीतें ॥११०॥ माझें साधर्म्य पावले। तेव्हां
[illegible] होऊं लागले। [illegible] सृष्टिकाळीं न [illegible] उपजले। व्यथा न पावले प्रलयकाळीं ॥१११॥
[illegible] सृष्टि होतांही न उपजती। प्रलयीं व्यथाही [illegible] पावती। जे या ज्ञानें माझी साधर्म्यगती। अर्जुना! पावले [illegible]
कीं या ज्ञानाही [illegible]। भगवंताचें [illegible] सगुण। पावती जे स्मरण [illegible]। देहावसानीं स्मरती [illegible] ॥११७॥
[illegible] अनुभव [illegible]। अनंत करिती सगुण ध्यान। [illegible] होतां देहावसान। [illegible] ॥११८॥
[illegible] भावें [illegible]। तें देहावसानीं आठवी [illegible]। आणि ते [illegible]। [illegible]। जें देहावसानीं आठवे
॥११९॥ [illegible] स्मरण। भरत राजा [illegible]। तो [illegible] हरिण। ऐसे किती? ॥१२०॥

# प्रकरण दहावें.

## ग्रंथरचना.

प्रेमानें ‘ पुरुषार्थ ’ गाउनि स्वयें तो ‘ दीपिकीं ’ बोधिला
सारांशें ‘ लघुबोधिं ’ तोचि कथुनी सर्वांसही अर्पिला।
तीं गीतेंच ‘ सुरेशगीत ’ स्वरूपीं ‘ प्रेमामृतीं ’ ओंविलीं
त्या श्रीवामनभक्त शंकरसुता अर्पीं प्रणामावली ॥

श्री टाकीमहाराज ऊर्फ भाई यांनीं स्वतः उत्तम प्रकारचें आचरण ठेवून लोकांस प्रवचनांच्याद्वारें अनुपम उपदेश केला त्याचें मागील दोन प्रकरणांत अल्पसें दिग्दर्शन केलेंच आहे. पण भाई इतकेंच करून राहिले नाहींत. त्यांनीं कांहीं ग्रंथरचनाहि केली आहे.

भाईंनीं मराठींत व इंग्रजींत पुढील ग्रंथ लिहिले आहेतः—

१. पुरुषार्थदीपिका.

२. लघुबोध.

३. सद्भक्तिविजय अथवा श्री ज्ञानेश्वर महाराज.

४. Amourism (प्रेमामृत).

५. Commentary on the Bhagwadgita ( श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका ).

६. Religion of Love or World Religion ( जगद्वंद्य धर्म ).

या पुस्तकांचा तीं प्रसिद्ध झालीं त्या कालानुक्रमानें अल्पसा सारांश इकडे देणें इष्ट वाटतें.

१. पुरुषार्थदीपिकाः—मानवी जीविताचें अंतिम ध्येय काय असावें व तें कसें साध्य करून घ्यावें याचें या ग्रंथांत सविस्तर विवेचन केलें आहे. त्यांत श्रुति, स्मृति, पुराणें व अनेक साधुसंत यांच्या ग्रंथांत ग्रथित झालेल्या

अनुभवसिद्ध तत्त्वांचेंच प्रतिपादन असून तें वाचकांच्या अंत:करणावर बिंबेल अशा सोप्या रीतीनें केलेलें असल्यामुळें हा ग्रंथ श्रद्धेनें वाचणाऱ्या मनुष्यास पुरुषार्थप्राप्ति करून देईल यांत शंका नाहीं. हा ग्रंथ दांड्यास लिहिला व सन १९१८ सालीं प्रसिद्ध केला.

२. लघुबोध:—ह्यांत मुख्यत: पुरुषार्थदीपिकेचेंच सार आलें आहे. त्यामुळें त्यांत वेद, शास्त्र, पुराणें व साधुसंत यांच्या वचनांची सुसंगतता व विचारांची एकवाक्यता थोडक्यांत वाचकांच्या लक्षांत यावी अशा रीतीनें विवेचन केलें आहे. हा ग्रंथ सन १९२१ सालीं प्रसिद्ध झाला.

३. प्रेमामृत (Amourism):—या पुस्तकांत महाराष्ट्रांत रूढ असलेल्या भागवत धर्माचें (पांच प्रकरणांत) विवेचन केलें आहे. जागजागीं पाश्चात्य व पौरस्त्य धर्मग्रंथ व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ ह्यांतले उतारे देऊन भागवत धर्मांतील तत्त्वें कशीं सनातन आहेत, हें यांत स्पष्ट केलें आहे. 'गीतेवरील टीका' या विस्तृत ग्रंथांतील विषय थोडक्यांत समजावा म्हणून हा ग्रंथ तयार केला आहे. हा सन १९२२ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला.

४. श्रीमद्भगवद्गीतेवरील विस्तृत टीका (De Carmine Dei Deorum or On the Song of the God of Gods):—भगवंतांनीं जो अर्थ मनांत धरून मूळ गीता अर्जुनास सांगितली, तो अर्थ भाईंनीं या टीकेंत आणण्याचा प्रयत्न केला आहे; व भगवत्प्राप्तीचा राजमार्ग भक्तीच आहे असेंहि मुद्देसूद रीतीनें प्रतिपादन केलें आहे. योग्य प्रसंगीं खिस्ती धर्मशास्त्र व इतर धर्मग्रंथ यांतून व तसेंच प्रसिद्ध तत्त्ववेत्ते बर्गसन (Bergson) ह्यांच्या ग्रंथांतून भरपूर उतारेहि दिले आहेत. हा ग्रंथ तीन भागांत सन १९२५ सालीं संपूर्ण प्रसिद्ध झाला.

५. सद्भक्तिविजय अथवा श्री ज्ञानेश्वर महाराज:—ज्ञानेश्वरांनीं भगवद्गीतेवर 'भावार्थदीपिका' (ज्ञानेश्वरी) हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत

त्यांनीं श्रुति, स्मृति, पुराणें, गुरु–शिष्यसंवाद व संतवचनें या पांचांचाहि आधार घेऊन जगांतील सर्व धर्मशास्त्रांपेक्षां किंबहुना वेदांपेक्षांहि गीतेची योग्यता कशी श्रेष्ठ ठरते हें उत्तम रीतीनें दाखविलें आहे. ह्याचेंच भाईंनीं या आपल्या ग्रंथांत रसाळ रीतीनें विवरण केलें आहे. रोजच्या व्यवहारांतले सोपे दृष्टांत देऊन विषयप्रतिपादन केलें असल्यामुळें व ठिकठिकाणीं वाङ्मयांतले उतारे दिलेले असल्यामुळें हा ग्रंथ भाविकजनांप्रमाणें पंडित-जनांनाहि मान्य होण्यासारखा आहे. हा ग्रंथ सन १९२७ सालीं प्रसिद्ध झाला.

६. जगद्वंद्य धर्म (Religion of Love or World Religion): जगद्वंद्य धर्म किंवा जो धर्म सर्व जगास पूर्णपणें मान्य होईल अशा धर्माचें या ग्रंथांत विस्तृत रीतीनें विवेचन केलें आहे. ह्या धर्माच्या आचरणानें होणारी अंतिम फलप्राप्ति अशी आहे कीं, त्यायोगें जगांतील निरनिराळ्या देशांत त्याचप्रमाणें निरनिराळ्या संप्रदायांत व पोट संप्रदायांत देखील शांति व ऐक्य अक्षय नांदतील. हें पुस्तक सन १९३३ सालीं प्रसिद्ध करण्यांत आलें.

'सद्भक्ति प्रसारक' मंडळीतर्फे 'सद्भक्तिप्रकाश' हें मासिक पुस्तक सन १९२८ सालापासून प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलें हें मागें सांगितलेंच आहे. त्यांतून भाईंनीं लिहिलेलीं खालील संतांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत.

( १ ) श्री तुकाराममहाराज; ( २ ) श्री रामदासस्वामी; ( ३ ) श्री वामनपंडित; ( ४ ) श्री नारायणमहाराज जालवणकर; ( ५ ) श्री नारायणमहाराज ( रत्नागिरीवासी ); ( ६ ) श्री राधाकृष्ण तोरणे; ( ७ ) श्री सद्गुरुबाबा ( शंकरराव टाकी ); ( ८ ) श्री सोहिरोबा आंबिये; ( ९ ) श्री नामदेव महाराज; ( १० ) श्री प्रल्हाद; ( ११ ) श्री अंगद; ( १२ ) श्री उद्धव.

याप्रमाणें भाईंनीं ग्रंथरचना केली आहे. याशिवाय, मागें एकवार सांगितल्याप्रमाणें, दर महिन्यास ते ‘ सद्भक्तिप्रकाश ’ मासिकाकरितां मजकूर सांगत असत तो निराळाच.

आपण कोणत्या संतांपासून विशेषेंकरून काय शिकलों हें भाईंनीं पुढील अभंगरूपानें सांगितलें आहे:—

नाथें शिकविली गुरुदेवभक्ति । पंडितें विरक्ति वर्षियेली ॥ १ ॥
सद्गुरु शंकरें दिलें पूर्णज्ञान । केलीं तीं जतन मांगिरीशें ॥ २ ॥
आद्य गुरुरायें भक्तिपंथ वर्म । भागवतधर्म दावियेला ॥ ३ ॥
तुकाराम वाणी रामदासस्वामी । गोडी हरिनामीं चाखविली ॥ ४ ॥
आणखी बहुत संतभक्त थोर । त्यांचे उपकार किती वर्णूं ॥ ५ ॥

तसेंच मुमुक्षु, साधक व सिद्ध यांनीं कोणाचे ग्रंथ केव्हां वाचावे हें श्री भाईंनीं पुढील सवाईंत दाखविलें आहे:—

भक्तजनांसी हीच विनंति, जीवित ऐसें सफल करा ।
दासबोध हा आधीं ऐकुनि, सत्संगें हरिनाम स्मरा ॥ १ ॥
मुकुंदराजकृत विवेकसिंधु, नावेंतुनि भवसिंधु तरा ।
रंगनाथी वासिष्ठचि देइल, विराग आणि सत्त्व बरा ॥ २ ॥
सप्तसागरीं यथार्थदीपीं, घ्या तुम्हि निर्गुण मोक्ष खरा ।
नाथ भागवत दावी मग तो, सगुण भक्तिचा प्रेमझरा ॥ ३ ॥
अमृतानुभव कसीं शेवटीं, संशय अवघा परी हरा ।
तुकोबाचिया गाथास्मरणें, सगुण मुक्तिची वाट धरा ॥ ४ ॥

## प्रकरण अकरावें.

# लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी.

सर्वेषामपि दानानां ब्रह्मदानं विशिष्यते ॥—श्रुति

स्वोपमेनें स्वसम। सुखदुःख पाहणें उत्तम।
यास्तव बोले श्रीकृष्ण कीं स्थावरजंगम। भूतें सुखी करावीं दुःखें हरूनी ॥
त्या सकळ दुःखाचें मूळ। अविद्या अनादि हृदय शूळ।
तीस करूनि निर्मूळ। परममंगळ स्वसुख द्यावें जीवांतें ॥

—य. दी.

जरी प्राणांत केला अपकार। तरी न म्हणे हा दुष्ट नर।
अपकाऱ्या करी अति उपकार। प्रशांति प्रकर यां नांव ॥

—ए. भा.

श्री टाकी महाराज ऊर्फ भाई यांच्यामध्यें कांहीं प्रशंसनीय वैशिष्ट्यें होतीं त्यांचा या प्रकरणांत थोडक्यांत उल्लेख करावयाचा आहे.

**पहिलें** वैशिष्ट्य हें कीं, आपण पेन्शन घेतल्यानंतर आपलें उरलेलें आयुष्य कांहीं तरी सत्कर्म करण्यांत घालविण्याचा त्यांचा निश्चय झाला होता. इतर कांहीं पेन्शनर लोक आपल्या आवडीप्रमाणें राजकीय, सामाजिक, वाङ्मयात्मक इत्यादि क्षेत्रांत आपला काळ घालवितात. तीं कामें झालीं तरी देशहिताच्या दृष्टीनें उपयुक्तच होत. पण इतर पुष्कळ पेन्शनर लोक नुसते पत्ते खेळण्यांत अगर दुसऱ्या प्रकारच्या करमणुकींत किंवा गप्पा मारण्यांत आपला सारा वेळ घालवीत असतात. करमणूक या दृष्टीनें असे कांहीं खेळ खेळण्यांत थोडा वेळ घालविणें हें कांहीं वाईट नाहीं. पण दुसरें कांहीं तरी उपयुक्त काम न करतां नुसतां आपला वृद्धापकाळांतील सारा फुरसतीचा वेळ खेळ खेळण्यांत घालविणें हें कोणत्याहि दृष्टीनें इष्ट नाहीं. तिसरा एक पेन्शनर लोकांचा वर्ग आहे. ते पेन्शन घेतल्या-

नंतर व स्वतःची सांपत्तिक स्थिति साधारणतः समाधानकारक असली तरी संस्थानांत किंवा इतर ठिकाणीं दुसरी नोकरी धरितात. याला कित्येक द्रव्यलोभ म्हणतील; दुसरे कित्येक त्याला दुसरें नांव देतील. पण नांव कोणतेंहि दिलें तरी, लोकाहिताच्या दृष्टीनें त्या मार्गाचें महत्त्व नाहीं हें कबूल केलें पाहिजे. या दोन मार्गांचा विचार केला म्हणजे भाईंनीं अनुसरलेला मार्ग खरोखर अधिक श्रेयस्कर व उपयुक्त ठरतो. धर्ममार्गाकडे त्यांचें लक्ष पूर्वीपासून होतेंच; व त्याच मार्गाचें, पेन्शन घेतल्यावरसुद्धां, अवलंबन करून त्यांनीं भक्तिरसयुक्त अशा प्रवचनांच्या द्वारें व ग्रंथ लिहून लोकांस सत्पथास लावलें व त्यायोगें आपलें आयुष्य भगवच्चरणीं अर्पण केलें. हें त्यांच्यामधलें **दुसरें** वैशिष्ट्य होय. भाई हे सुशिक्षित पदवीधर होते व ते शक्य असेल तितकें करून पूर्वपरंपरेला चिकटून राहण्याचा यत्न करीत असत. पण तसें करतांना ते आपलें धोरण उच्च ठेवीत असत. त्यांनीं ख्रिस्ती, इस्लामी, पारशी इत्यादि धर्मांतील कांहीं ग्रंथांचें अध्ययन केलें होतें. तसेंच त्यांनीं थिऑसफी व रामकृष्ण परमहंस या पंथांसंबंधाचें लिखाणहि बरेंच वाचलें होतें. ह्यामुळें त्यांच्या प्रवचनांतून वरील सर्व धर्मांच्या व पंथांच्या लिखाणांतून वरचेवर वचनें व आधार दिलेले आढळत असत. असा प्रकार इतर महाराज अगर बोवा यांच्या बाबतींत क्वचित्‌च आढळतो. ते आपल्या ठरलेल्या पंथानें केवळ अंधश्रद्धेनें जात असलेले आढळतात. या दृष्टीनें पाहिलें तर भाईंचें धोरण किती तरी उदार होतें. फार काय, पण त्यांचीं प्रवचनें थिऑसॉफिकल हॉलमध्यें व खार येथील रामकृष्णाश्रमांत देखील झालेलीं आहेत. इतकी उदार दृष्टि भगवद्गीतेच्या निःसीम भक्तांशिवाय इतर ठिकाणीं शक्य दिसत नाहीं.

भाईंमधलें **तिसरें** वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा हरएक बाबतींतील निःस्पृहपणा होय. 'मा गृधः कस्यचिद्धनम्।' हें ईशोपनिषदांतील तत्त्व त्यांच्या वृत्तींत

परमपूज्य गुरुवर्य
श्री रामचंद्र शंकर टाकी महाराज
ऊर्फ श्री भाई



नेहमीं दृष्टीस पडत असे. या गुणाचें त्यांच्या ठिकाणीं नोकरींत शिरण्यापूर्वी-पासूनच बीजारोपण झालेलें होतें. त्याची मग वाढ होऊन ते नोकरींत असतांना व नंतर कसे निरिच्छपणें वागत असत याचीं उदाहरणें मागील प्रकरणांत आलींच आहेत; त्यांची इकडे पुनरुक्ति करीत नाहीं. भाईंच्या या गुणाचें म्हणजे त्यांच्या खऱ्या वैराग्यशील वृत्तीचें महत्त्व किती होतें हें पाहावयाचें तर महाराष्ट्रांत अलीकडे गाजलेल्या व आपलीं प्रस्थें माजविणाऱ्या महाराजांच्या किंवा बोवांच्या प्रसिद्ध झालेल्या कृतीकडे पाहावें म्हणजे खात्री होईल. यापेक्षां येथें जास्त लिहिण्याचें कारण नाहीं.

भाईंचें **चवथें** वैशिष्टय हें कीं, त्यांची कोणत्याहि दृष्टीनें स्वतःविषयींची उदासीनता अथवा पूर्ण निरहंकारता होती. द्रव्याच्या बाबतींत किंवा मानाच्या बाबतींत त्यांना स्वतःचें स्तोम माजवावें असें कधींहि वाटलें नाहीं किंवा त्यांनीं तसा प्रयत्नहि केला नाहीं. फार काय, आपला फोटो घ्यावा हें देखील त्यांना आवडत नसे. एकदां त्यांचा फोटो घ्यावा अशी जेव्हां कल्पना निघाली तेव्हां त्यांनीं प्रथम ‘ साफ नाहीं ’ असें सांगितलेंच. पण पुढें मंडळींनीं युक्ति करून असा योग जुळवून आणला कीं भाईंना ‘ नाहीं ’ म्हणतांच आलें नाहीं. इतका प्रसंग आला तेव्हां त्यांनीं शेवटीं परवानगी दिली व मग फोटो घेतला. ही गोष्ट सन १९१७ मध्यें घडली.

भाईंचें स्वतःच्या कपड्यांकडे देखील लक्ष नसे. कपडे खराब झालेले अगर फाटलेले असले तर त्यांच्या वडिलांनीं त्यांना ‘ अरे, आज कपडे बदलले पाहिजेत ’ असें सांगावें लागत असे. तोंपर्यंत तिकडे त्यांचें लक्षच नसे.

याप्रमाणें भाईंची निरिच्छ, निरहंकारवृत्ति असल्यामुळें सद्भक्तिमंदिरांत जमणाऱ्या बऱ्याच मंडळींची त्यांजवर अत्यंत भक्ति बसली होती, व त्यांपैकीं कांहींनीं योग्य संधि मिळतांच ती व्यक्त केल्याचीं एक दोन उदाहरणें देतों.

मिस्टर जमशेडजी फरदुनजी मादन हे पारशी गृहस्थ मुंबईस भाईंच्याच खात्यांत दुसरे डे. ए. इन्स्पेक्टर होते. पण त्यांना धर्मविषयक निरूपण ऐकण्याची आवड असल्यामुळें ते शिंवला भाईंचीं प्रवचनें ऐकण्यास वरचेवर जात असत. त्यांची मग भाईंवर इतकी भक्ति बसली कीं, ते त्यांना गुरूप्रमाणें मानूं लागले. त्यांनीं सन १९०५ सालीं पेन्शन घेतलें व ते परगांवीं—लांब मद्रासच्या बाजूला—जाण्यास निघाले. पण निघण्यापूर्वीं त्यांनीं मुद्दाम शिंवला येऊन भाईंची भेट घेतली व मग त्यांचा निरोप घेऊन गेले. मुंबईहून मद्रासजवळील आर्कोणम येथें पोंचल्याबरोबर त्यांनीं भाईंना एक पत्र लिहिलें. त्यांत असा मजकूर होता:—

'संधि मिळाल्याबरोबर मी तिचा फायदा घेऊन आपल्यास पत्र लिहीत आहें. गेल्या दहा वर्षांत आपल्या मैत्रीपासून मला जो फायदा झाला त्याचें वर्णन करणें माझ्या अल्पबुद्धीच्या आटोक्याबाहेरचें काम आहे. ईश्वरकृपेनें आपला व माझा समागम घडला त्याच्या योगानें माझ्या शीलाला नवीन वळण लागलें. आपल्या अंगीं जे अनेक अत्युत्तम गुण आहेत त्यांचा माझ्या मनावर कायमचा परिणाम झाला आहे व ते माझें शील बनविण्यास कारणीभूत झाले आहेत हें मी प्रांजलपणें कबूल करतों. पूर्वपुण्याईमुळें ज्यांना आपल्या संगतीचा योग घडेल, त्यांनाहि असाच लाभ मिळो एवढीच माझी इच्छा आहे. आपली तोंडपूजा करावी म्हणून मी हें लिहीत आहें असें नव्हे. तर बरींच वर्षें अंतःकरणांत सांचून राहिलेले विचार आज बाहेर पडत आहेत इतकेंच.'

दुसरें उदाहरण मि. मादन ह्यांच्या जागीं गुजराथी शाळांचे डेप्युटी इन्स्पेक्टरच्या जागीं आलेले रा. ब्रजराय देसाई यांचें. त्यांनीं भाईंना सुटींत गुजराथेंत आपल्या घरीं येण्याविषयीं अनेक वेळां आग्रह केला. पण भाईंनीं तिकडे कांहीं दिवस लक्ष दिलें नाहीं. पण मग देसाई यांनीं एके दिवशीं फारच आग्रह केला, तेव्हां भाई आपल्या वडिलांची आज्ञा घेऊन त्यांचे

बरोबर गेले. ही गोष्ट सन १८९९ मध्यें घडली. भाईसारखे ईश्वरभक्त आपल्या घरीं आलेले पाहतांच सदरील देसाई, त्यांचे वडील, मातोश्री वगैरे सर्व मंडळीस फार आनंद झाला. भाई तेथें चार दिवस राहून मग मुंबईस परत येतांना त्यांनीं डाकोर क्षेत्राला जाऊन श्री डाकोरनाथजींचें दर्शन घेतलें.

तिसरें उदाहरण खुद्द जोगेश्वरीलाच राहणाऱ्या एका मर्चंट नांवाच्या गुजराथी गृहस्थाचें. ते जोगेश्वरीला सद्भक्तिमंदिरांत नेहमीं भाईंच्या प्रवचनांस सहकुटुंब येत असत. त्यांची भाईंच्यावर इतकी भक्ति बसली कीं तीं उभयतां त्यांना गुरु मानूं लागलीं. ते गृहस्थ सन १९३४ मध्यें फार आजारी पडले. औषधोपचार चालू होतेच. पण भाईंचें भजन ऐकण्याची त्यांना इच्छा झाली. त्याबरोबर त्यांच्या कुटुंबानें ( बाईनीं ) भाईंच्या घरीं येऊन त्यांना आपल्या घरीं येण्याची विनंति केली. ती वेळ पहाटेची ४ वाजण्याची होती. भाई कोणी कांहीं विनंति केल्यास सहसा ' नाहीं ' म्हणत नसत. त्याप्रमाणें ते त्या बाईंच्या विनंतीप्रमाणें तेवढ्या रात्रीं त्यांच्या घरीं गेले व त्यांचें तेथें झालेलें भजन कांहीं वेळ ऐकतांच त्या गृहस्थास समाधान वाटलें.

भाईंचीं प्रवचनें चाललीं असतां ते संतवचनें वगैरे घेऊन त्यांच्या आधारेंच बोलत असल्यानें श्रोतृमंडळीस तीं समजणें कठीण जात नसे. पण त्यांचें ग्रंथांतील निरूपण कित्येक ठिकाणीं कांहीं लोकांस दुर्बोध वाटण्याचा संभव आहे. पण एकाद्या मुद्दयाचें निरूपण एकदोन वेळ लक्षपूर्वक वाचल्यास मुद्दा समजण्यास मुळींच कठीण पडत नाहीं. शिवाय, आपल्या विवेचनांत भाईनीं श्रुति, स्मृति, पुराणें आणि इंग्रजी व मराठी ग्रंथ यांतून इतके उतारे व आधार दिले आहेत कीं, ते ग्रंथ लक्षपूर्वक वाचणाऱ्या मनुष्यास पुष्कळ प्रकारची माहिती मिळून त्याचा बहुश्रुतपणा वाढल्याशिवाय राहणार नाहीं.

भाईंच्या जीवनक्रमांतील दुसऱ्या एका गोष्टीबद्दल आक्षेप निघण्याचा संभव आहे. भाई हे वर्तमानपत्रें वाचीत नसत ही गोष्ट पुष्कळांस चमत्कारिक वाटेल. आजकाळ आपल्या देशांत किंवा जगांतील इतर देशांत किती तरी घडामोडी चाललेल्या आहेत व आपण जर त्याच—हिंदुस्थान—देशांत राहात आहोंत तर त्या घडामोडींची कांहीं तरी माहिती करून घेणें हें आपलें कर्तव्य आहे. ही माहिती वर्तमानपत्रांशिवाय दुसऱ्या कुठें मिळूं शकणार ? ही विचारसरणी बरोबर आहे. पण ती ‘ यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ’ या तत्त्वाप्रमाणें वागण्याचा यत्न करणाऱ्या मनुष्यास लागू नाहीं असें आम्हांस वाटतें. सद्भक्तिमंदिराशिवाय इतर ठिकाणीं भाईंच्या वागण्याचें तत्त्व ‘ विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ’ ( शांत ठिकाणीं राहणें व जनसंपर्काची नावड ) हेंच होतें. त्यामुळें त्यांचें वर्तमानपत्रें वाचण्याकडे तेवढें लक्ष नसे, याबद्दल कोणास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

आणखी एका गोष्टीविषयीं येथें खुलासा करणें जरूर वाटतें. हिंदुस्थान देश ही धर्मभूमि आहे. राजा किंवा सरकार कोणी असो, लोकांची सांपत्तिक स्थिति कशीहि असो, देशांत धर्मसंबंधीं चर्चा बहुधा नेहमीं चालू असते. ही स्थिति आज हजारों वर्षें चालत आली आहे. प्राचीन काळच्या धर्मक्रांत्या अगर मध्य युगांतील संतमंडळांचीं अवतारकृत्यें क्षणभर बाजूस ठेविलीं तरी इंग्लिश लोकांशीं व त्यांच्या संस्कृतीशीं आमचा संबंध आल्या दिवसापासून गेल्या शंभर दीडशें वर्षांत देशांत किती तरी धर्मसंबंधीं चळवळी झाल्या आहेत व कांहीं अद्यापि चालू आहेत. त्या सर्वच चळवळी यशस्वी झाल्या आहेत असें आम्ही म्हणत नाहीं. पण लोकांत ह्या योगें धर्मजागृति झाली आहे व होत आहे ही गोष्ट खरी. बंगालच्या बाजूस ब्राह्मसमाज आहे; पंजाब व उत्तर हिंदुस्थान या बाजूस आर्यसमाज, देव-

समाज हे समाज आहेतच. मुंबईस व महाराष्ट्रांत प्रार्थनासमाज आहे. मद्रासच्या बाजूस थिऑसफीची चळवळ आहे व देशभर किंबहुना जगभर रामकृष्ण परमहंस यांचे आश्रम कामें करीत आहेतच. याशिवाय जुन्या मताप्रमाणें वैष्णव–शैव पंथ व त्यासंबंधानें चालू असणारीं पुराणें–कीर्तनें, वारकरी पंथ व भजनमंडळ्या वगैरे यांचीं कामें चालू आहेतच. त्याचप्रमाणें गेल्या तीस चाळीस वर्षांत निघालेले व वर्षांतून गणपतीच्या दिवसांत कांहीं दिवसपर्यंत चालू असणारे मेळे ह्यांचीं कामें चालतातच. तात्पर्य, देशभर धर्मसंबंधीं वर्षभर कांहींना कांहीं तरी चळवळ चालू राहून असंख्य लोकांचीं मनें त्यांत गुंतलेलीं असतात यांत शंका नाहीं.

वर सांगितलेल्या हिंदु लोकांच्या धर्मप्रवृत्तीला अनुसरूनच श्री टाकीमहाराज ऊर्फ भाईंनीं सुमारें चवदा पंधरा वर्षांमागें ‘सद्भक्ति प्रसारक मंडळी’ची स्थापना करून प्रवचनांच्या व ग्रंथांच्याद्वारें लोकांत धर्मजागृति उत्पन्न केली. भाईंनीं आपलें कार्य जरी साधुसंतांच्या परंपरेला धरूनच केलें तरी त्यांत त्यांनीं कसें उदार धोरण ठेवलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. पण त्यांच्या कार्यपद्धतींत व वर सांगितलेल्या ब्राह्म, प्रार्थना, आर्य, देव इत्यादि समाजांत आणि थिऑसफी व रामकृष्ण मिशन वगैरे कित्येक आधुनिक धर्मसंस्थांत चालू असलेल्या कार्यपद्धतींत एक महत्त्वाचा भेद दृष्टीस पडतो. त्या संस्थांच्या प्रवर्तकांनीं आपल्या कार्यपद्धतींत सामाजिक प्रश्नांना महत्त्व दिलेलें आढळतें व भाईंच्या कार्यपद्धतींत या प्रश्नांना स्थान दिलें नव्हतें. याचें कारणहि उघडच आहे. सर्व परिस्थितीचा विचार करून व पूर्वीं होऊन गेलेल्या संतांचा अनुभव लक्षांत घेऊन भाईंची अशी खात्री झाली होती कीं मनुष्याला आत्मानुभव झाल्यावांचून खरी समाजसेवा, देशसेवा करितां येणारच नाहीं. याकरितां तो लाभ कसा प्राप्त होईल हें शिकविण्याकडेच त्यांनीं आपलें तन, मन, धन वेंचलें. या सेवेपुढें बाकी सर्व खटपटी व्यर्थ आहेत. धर्माची

आवश्यकताच हल्लींच्या काळीं आहे असें विद्वन्मान्य लोकांच्या विधानांच्या खालीं दिलेल्या उताऱ्यांवरून कोणाच्याहि लक्षांत येईल. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें भाईंनीं केलेली कामगिरीच सध्याच्या काळांतसुद्धां श्रेष्ठ ठरते.

( १ ) वैभवाच्या उच्च शिखरावर पोंचलेल्या इंग्लंड देशाचे माजी मुख्य प्रधान मि. लॉईड जार्ज यांनीं १९२० सालीं काढलेले उद्गार:—

'सध्यां आपल्या देशबांधवांना पारमार्थिक उन्नतीची जितकी जरूरी आहे तितकी ऐहिक उन्नतीची नाहीं. आधीं पारमार्थिक उन्नति करून घ्या, मग तिच्या मागोमाग ऐहिक उन्नति आपोआप होईल. ह्या महायुद्धांत जगांतील सर्व भागांवर जे आघात झाले आहेत, त्यांच्या जखमा अजून भरल्या नाहीत. ऐहिक उन्नतीनें त्या जखमा कधींहि भरावयाच्या नाहींत.'

( २ ) जगन्मान्य स्वामी विवेकानंद म्हणतात:—

'ज्याला आत्मानुभव झाला असेल तो मनुष्य ऐहिक गोष्टींनीं लिप्त होत नाहीं व अशाच प्रकारचा मनुष्य जगाचें कांहीं तरी बरें करूं शकतो. आत्मानुभवाच्या स्थितींतील मनुष्याचें असें द्विधारूप आहे. परक्याचें बरें कां करावें याचें कारण अशाच मनुष्याला पूर्णपणें अवगत असतें. तो कोणाचें बरें करतो यांत त्याच्या ठिकाणीं अहंभाव असतो असें म्हणतां येत नाहीं; कारण, जेथें 'अहं' शिल्लक आहे तेथें भेदबुद्धि आहे. त्याचा अहंकार नष्ट होऊन तो ब्रह्माकार झालेला असतो. तो कोणावर जें प्रेम करतो अथवा कोणाला जी सहानुकंपा दाखवितो तिचें स्वरूप वैय्यक्तिक नसून विश्वव्यापी असतें. 'मी' जाऊन तेथें 'तूं' आलेलें असतें. दुसऱ्याच्या ठिकाणींहि मीच ( आपणच ) असल्यामुळें तो दुसऱ्याला मदत करीत असतो.'

भाईंनीं खरा भक्तिमार्ग ( वेदांताच्या पायावर उभारलेली भक्ति ) लोकांना शिकविला. कोणी आक्षेप घेतील कीं यांत त्यांनीं लोकसंग्रह साधला

नाहीं व वेदान्तानें हिंदुस्थानची जी अधोगति झाली आहे त्यांतच त्यांनीं भर घातली. भाईंनीं एकनाथमहाराजांनीं केलेल्या व्याख्येप्रमाणें लोकसंग्रह केला.

अभेद भक्ति वैराग्यज्ञान। स्वयें आचरोनि आपण।
शेखीं लावावे इतर जन। लोकसंग्रह जाण या नांव॥--ए. भा.

असें करण्याचा हेतु असा कीं मनुष्याचें अंतःकरण शुद्ध झाल्यावांचून मनांतील कुसंस्कार—स्वार्थबुद्धि, मत्सर, द्वेष, धन, मानाची आवड वगैरे प्रकारच्या वृत्ति—जाणार नाहींत. वेदान्त शिकल्यानें राष्ट्र अंधोगतीस जात नाहीं असें स्वामी रामतीर्थांनीं ठासून सांगितलें आहे:—

'हिंदुस्थानच्या राजकीय अधोगतीचें खापर जे लोक वेदान्ताच्या माथ्यावर फोडतात, अशा लोकांनीं हिंदुस्थानच्या प्राचीन कालापासून आजतागायतच्या इतिहासाचें सूक्ष्म आणि विवेचक बुद्धीनें बिलकूल पर्यालोचन केलेलें नसतें व इतिहासाच्या खऱ्या मर्माची त्यांना ओळख पटलेली नसल्यामुळें असले आक्षेप केवळ अज्ञानामुळें उत्पन्न झालेले आहेत. वेदान्तामुळें हिंदुस्थानाची राजकीय अधोगति झाली नाहीं, इतकेंच नव्हे तर वेदान्तकल्पनांचा ऱ्हास हेंच आमच्या अधोगतीचें वास्तविक कारण आहे.'

'मुख्य तें हरिभजन। दुसरें तें राजकारण॥', 'य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति' या संत व भगवद्वचनांनुरूप भाईंनीं आपला मार्ग आंखला व तो निरलसपणें आमरणान्त चालविला ही त्यांची सेवा सर्वांत उच्च कोटीची होती हें आत्मानंद ज्यांनीं चाखला असेल त्यांनाच कळेल. तें ज्ञान राष्ट्राच्या दृष्टीनेंहि फार हितावह आहे हें स्वामी विवेकानंदांच्या पुढील उद्गारांवरून स्पष्ट होतें:—

'जग ही अत्यंत सुंदर वस्तु आहे, असें म्हणण्याचा खरा अधिकार कोणाला असेल तर तो आत्मानुभवी मनुष्यालाच आहे. आत्मप्रतीति सर्वांनाच

झाली तर साऱ्यांची स्थिति अशीच होईल. सर्वांना आत्मानुभवाची प्राप्ति झाली तर जगांतील सध्याची सारी चढाओढ नष्ट होईल. या सत्य वस्तूच्या अल्पांशाची प्रतीति जरी आज साऱ्यांना झाली तरी तितक्याचा सुद्धां परिणाम किती तरी चांगला होईल. साऱ्या जगाचें रूप अशा स्थितींत पालटून जाईल आणि सांप्रतच्या अंतर्बाह्य लढाया आणि अत्याचारहि बंद होऊन शांतीचें साम्राज्य साऱ्या जगभर नांदूं लागेल.'

'सर्वांना सामान्यपणें एकत्र होतां येईल अशी एकच बाब आमच्या देशांत आहे; ती बाब म्हणजे आमचा धर्म. धर्मकल्पनांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींनीं आम्हां हिंदु लोकांच्या मनाला चलन मिळत नाहीं. आम्हां हिंदूंच्या आयुष्यक्रमांतील हीच मोठी गुरुकिल्ली आहे. धर्मजीवनापेक्षां दुसरें कोणतेंहि साध्य अधिक मोठें नाहीं, ही गोष्ट सर्वथैव खरी आहे. आणि आमच्या देशासंबंधानें पाहतां तर आमची भात्री उन्नति घडवून आणण्यासाठीं हा एकच मार्ग आम्हांस मोकळा आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनाचा झरा धर्म हाच होय. जर त्याचा प्रवाह शुद्ध आणि जोराचा असेल, तर बाकीच्या सर्व गोष्टी आपोआप नीट होतील. जर त्याचा प्रवाह पवित्र आणि जीवनदायी असेल, तर राजकीय, सामाजिक आणि इतर प्रकारच्या सांसारिक अडचणी दूर होतील. फार काय सांगावें ? पण हा झरा शुद्ध असेल तर दारिद्र्याची जी मोठी अडजण तीहि दूर होईल. तुम्हांस जें कांहीं कर्तव्य असेल, त्याची उभारणी धर्माच्या पायावर केल्यावांचून गत्यंतर नाहीं. आमच्या राष्ट्राचें हें जीवनतत्त्व आहे. आणि त्यालाच दृढता आणण्याचा यत्न केला पाहिजे. याकरितां आपल्या प्रत्येक चळवळीच्या मुळाशीं धर्म पाहिजे असें मी म्हणतों. आतां दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची चळवळ तुम्ही करूं नका असें माझें म्हणणें नाहीं. राजकीय किंवा सामाजिक चळवळी आवश्यक नाहींत असें माझें मुळींच म्हणणें नाहीं.

माझें म्हणणें इतकेंच कीं, धार्मिक सुधारणा ही पहिल्या पायरीची असून, दुसऱ्या सुधारणा कमी प्रतीच्या आहेत.'

हें प्रकरण संपविण्यापूर्वी येथें एक महत्त्वाची गोष्ट नमूद करणें जरूर आहे. ती ही कीं श्री भाईंची गुरुभक्ति अपूर्व होती. ते पुढील ओव्यांतील शिकवणीप्रमाणें अक्षरशः वागत असत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. श्रीएकनाथमहाराजांनीं गुरुभक्ति करूनच सर्वांत श्रेष्ठ पद वैकुंठवास प्राप्त करून घेतला अशी त्यांची पूर्ण खात्री झाली होती व सर्व संतांनीं सद्गुरुभक्तीचा महिमा मुक्तकंठानें गाइला आहे.

काया–वाचा–मनें–प्राणें । जो गुरुवांचोनि आन नेणे ।
तैसाचि भजे अनन्यपणें । गुरुभक्ति म्हणणें त्या नांव ॥
गुरुभगवंत दोन्ही एक । येणें भावें निजनिष्टंक ।
भजे तोचि गुरुसेवक । येरू तो देख अनुमानी ॥
आम्हां सद्गुरु तोचि परब्रह्म । ऐसा नित्य निजभाव सप्रेम ।
हेचि गुरुसेवा उत्तमोत्तम । शिष्य परब्रह्म स्वयें होय ॥—ए. भा.

आपल्याला न आवडणारी पण यथान्याय म्हणजे चारचौघां सत्त्वशील लोकांना पटण्यासारखी गोष्ट केल्यापासून सद्गुरूचा लौकिक, मान्यता वाढत आहे असें आढळून आल्यास भाई ती गोष्ट करीत असत हें पुढील एकाच उदाहरणावरून सर्वांच्या सहज लक्षांत येईल.

रा. रा. विनायकराव वाघ यांनीं भाईंना बरेच वेळां विनंति केली कीं, मला प्ल्यास्टरची प्रभावळ तयार करावयाची आहे तर आपण मला कांहीं सिटिंग्स द्याव्या, म्हणजे दोनतीनदां आपण एकट्यानेंच माझ्या समोर स्वस्थ बसावें, असें केल्यानें आपली प्रतिमा प्रभावळींत बसविण्यास बरें होईल. भाईंना फोटो काढणें वगैरे आवडत नसल्यामुळें पुढें बघूं म्हणून भाई म्हणत असत. परंतु जेव्हां एकदां रा. रा. विनायकरावांनीं सांगितलें कीं आपल्या गुरुपरंपरेंतील चौघांच्या प्रतिमा तयार होऊन वर्ष होत आलें आहे, पण

त्यांत आपली प्रतिमा बसविल्याशिवाय पंचायतन पुरें होणार नाहीं म्हणून ज्यांत नुसत्या चौघांच्या प्रतिमा आहेत अशी ती प्रभावळ मी बाहेर काढूं इच्छित नाहीं. तेव्हां आपण आपल्या सद्गुरूंची प्रतिमा अंधेरांत पडून राहण्यास कारण होत आहों हें पाहून भाईंना वाईट वाटलें व रा. रा. विनायकरावांना बोलावणें पाठवून सिटिंग्स देण्यास अनुमोदन दिलें व सद्गुरूंची प्रतिमा ज्यांत आहे अशी प्रभावळ लौकर लोकांच्या दर्शनपूजनास ठेवण्याची व्यवस्था करा असें सांगितलें. यावरून सद्गुरूंचा फोटो वगैरे लावला जाण्याविषयीं त्यांची किती उत्सुकता व किती प्रेम होतें हें स्पष्ट होतें.

श्री भाई श्रीमारुतिरायांची भक्ति करीत होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ते पिकेट रोडवरील श्रीमारुतिरायांच्या दर्शनास संधि मिळाली कीं जात असत. त्याच देवालयांत त्यांचें रंगीत छायाचित्र त्यांच्या भक्त मंडळींनीं लावलें आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो.

# प्रकरण बारावें.

## उपसंहार.

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ॥—संतवचन.

होईल प्रारब्धें जें होणार । करील तेंच ईश्वर जें असेल करणार ।
या निश्चयें समाधानाचा प्रकार । तो नसतां भयची अवघें ॥
ऐसें प्रारब्ध भोगणें । तें सुखें आज्ञा ईश्वराची मान्य करणें ।
स्वहित त्याचमध्यें आचरणें । तरीच साधे आत्महित ॥—य. दी.

देह तव आहे प्रारब्धा आधीन । याचा मी कां शीण वाहूं भार ।
सरो सर्वकाळ तुझिया चिंतनें । काया वाचा मनें इच्छितसें ॥
—तुकाराममहाराज.

श्री भाईंना शेवटीं जें दुखणें आलें त्यायोगें ते जे बिछान्यावर पडले ते बहुतेक उठलेच नाहींत. ते ता. १३ सप्टेंबर १९३४ रोजीं आजारी पडले व ता. १४ ऑक्टोबर १९३५ रोजीं इहलोकाची आपली कामगिरी संपवून वैकुंठास गेले. या ३९५ दिवसांत त्यांचें स्वतःचें भजन मनन वगैरे चालूच असे, व लोक भेटण्यास येत त्यांच्याशीं बोलणें किंवा धर्मविषयक कांहीं उपदेशाच्या गोष्टी सांगणें हीं कामें चालू असतच, तरी वायूच्या आजारामुळें त्यांना फार त्रास होत असे. पण भाई हे ईश्वराचे परम भक्त होते, व ईश्वर हा नेहमीं भक्ताचें कल्याणच करीत असतो असा त्यांचा पूर्ण विश्वास होता, त्यामुळें त्यांनीं आपल्या उतार वयांत ईश्वरी सत्तेनेंच आजार आल्याकारणानें अत्यंत शांतपणें व बिन-तक्रार सर्व दुःख सोसलें व मग वेळ येतांच ते निजधामास गेले.

अविचारी लोक त्यांच्या अंतकाळच्या स्थितीसंबंधानें कांहीं आक्षेप घेत असतात. पण ते, आपण सर्व मृत्युलोकीं आहोंत व सर्व कांहीं गोष्टी ईश्वरी सत्तेनें घडत असतात, हें विसरतात. सबब अविचारमूलक

आक्षेपांकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. मुख्य गोष्ट, भाईंनीं ईश्वराची सेवा करून आपल्या जन्माचें कसें सार्थक केलें व त्यांच्या जीवनक्रमापासून आपणांस काय शिकावयाचें आहे एवढ्याचाच फक्त आपण विचार करावा. आम्ही सर्व भाईंचे शिष्य, भक्त व अनुयायी आहोंत. तेव्हां त्यांची ईश्वराचे ठिकाणीं कशी अढळ श्रद्धा होती; ते आपलीं कर्तव्यें कशीं निष्काम बुद्धीनें व ईश्वरार्पण म्हणून करीत असत; सद्गुरूपासून ज्ञान प्राप्त झाल्यावर तें बिंबण्याकरितां त्यांनीं नवविधा भक्ति व गुरुदेवभक्ति ह्यांशिवाय दुसरें कोणतेंहि साधन केलें नाहीं, आणि ज्ञानाचा परिपाक झाल्यावर म्हणजे चित्तचैतन्य होऊन सिद्धपदावर—संत ह्या श्रेष्ठपदावर—आरूढ झाल्यावर देखील त्यांनीं आपला जीवनक्रम भागवतांतील पुढील श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें चालू ठेविला होता:—

> तत्तेऽनुकंपां सुसमीक्ष्यमाणो भुंजान एवात्मकृतं विपाकम् ।
> हृद्वाग्वपुर्भिर्विदधन्नमस्ते जीवेत यो मुक्तिपदे स दायभाक् ॥

भावार्थः—' तो लाभ तुझ्या कृपेनेंच म्हणजे भगवत्कृपेनेंच होतो असें पाहणारा आपण केलेल्या कर्माचें फळ भोगीत असतांच मनानें, वाणीनें व शरीरानें तुला नमस्कार करीत आयुष्यक्रम जो चालवितो तो तुझ्या नित्य मुक्तपदाचा म्हणजे वैकुंठाचा वांटेकरी होतो. '

या श्लोकाचा स्पष्टार्थ वामनपंडितांनीं केला आहे, तो असाः—

> ब्रह्मा म्हणे जो ज्ञानयुक्त । आणि तुझे चरणीं अनुरक्त ।
> ऐसा पूर्वोक्त जो भक्त । तो बरविये तुझे दयेतें पाहतो ॥
> कीं जो लाभ वाटे भजनीं । तो भगवत्कृपेनेंची ऐसें पाहे मनीं ।
> आणि मनें, वाचे, शरीरेंही करूनी । नमस्कार करी कृपा आठवितां ॥
> अनुभव भगवत्स्वरूपाचा सदा । तुझी कीर्ति गोड गाणें हाचि धंदा ।
> जरी वाटे तरी अगा ! गोविंदा । कृपा हे तुझी म्हणोनि करी नमस्कार ॥

आणि भोग वाईट बरा । जो प्राप्त झाला त्या नरा ।
तो प्रारब्ध म्हणोन भोगून दूसरा । भाव न धरी हृदयांत ॥
नव्हे सुखप्रद भोगें तुष्ट । दुःखप्रद भोगें न मानी कष्ट ।
भगवत्कृपालाभेंची ऐसा तुष्ट । कीं व्यापून विश्व उरला आनंद त्याचा ॥
कीं स्वकृतकर्मांचा । पाक भोगावाच साचा ।
लाभ तो भगवद्भक्तीच्याच सुखाचा । त्यास कारण मानी कृपा त्याची ॥
ये रीती स्मरे करुणा । आणि त्या लाभकाळीं लागे श्रीचरणा ।
ब्रह्मा म्हणे जी ! नारायणा । जों शरीर जितां ये रीती ॥
तो देवा तुझ्या नित्यमुक्तपदाचा । वांटेकरी दायाद साचा ।
कीं अमानित्व गुण ऐसा त्याचा । जतन जाला पाहतां तुझ्या कृपेतें ॥

सारांश, ते आपला बहुतेक सर्व काळ ईश्वराच्या चिंतनांत व संत वाङ्मयाच्या मननांत व भजनांत कसा घालवीत असत व ते दयार्द्र बुद्धीनें लोकांवर कसे उपकार करीत असत, आणि ज्यांच्या ज्यांच्याशीं त्यांचा संबंध येई त्यांना त्यांना ते भक्तिमार्गास कसे लावीत व त्यांची चित्तशुद्धि झाली म्हणजे त्यांना ज्ञानाचा बोध करून त्यांचा ते उद्धार कसा करीत ह्या सर्वांचें आम्हीं खरोखर अंतःकरणपूर्वक मनन केलें पाहिजे, व त्याप्रमाणें अंशतः तरी यथामति व यथाशक्ति वागण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. असें वर्तन ठेवण्याची परमेश्वरानें आम्हां सर्वांस बुद्धि द्यावी, व आमच्या प्रयत्नांस यश द्यावें आणि श्रीभाईंना जी उत्तम गति प्राप्त झाली तीच अंतीं आम्हांस द्यावी एवढेंच त्याच्याजवळ मागणें आहे.

## श्री भाईंच्या वियोगदुःखाचा परिहार करण्याचा उपाय.

ता. १३ सप्टेंबर १९३४ भाद्रपद शु. ५ ( ऋषिपंचमी ) रोजीं श्री भाईंची प्रकृति बिघडली आणि १९१६ पासून सतत अठरा वर्षे त्यांच्या मुखांतून जो ज्ञानामृताचा ओघ चालला होता तो बंद पडला. ह्या दुखण्यांत त्यांनीं प्रारब्धभोग शांतपणानें भोगून तेरा महिने काढले आणि शेवटीं

ता. १४ ऑक्टोबर १९३५, आश्विन व. ३ स कुटुंबांतील मंडळीस, इतर आप्त जनांस, व सर्व भक्तसमुदायास शोकसागरांत टाकून वैकुंठास प्रयाण केलें. ह्याची सविस्तर हकिकत वर आली आहेच, तेव्हां तिची येथें पुनरुक्ति करण्याची जरूरी नाहीं.

श्री भाईंनीं जें ग्रंथरूपी व प्रवचनरूपी वाङ्मय ठेविलें आहे, तेंच त्यांचें उत्तम स्मारक होय. ह्या वाङ्मयांत सांठविलेलें अमृत नित्य चाखिलें असतां व त्याचा परिमळ सतत सेवन केला असतां व त्याचें मनन केलें असतां त्यांची स्मृति सदैव जागृत राहील इतकेंच नाहीं, तर ती त्यांची उत्तम सेवाहि होईल. शिवाय श्री भाईंच्या मुखांतून निघणारी अमृततुल्य वाणी श्रवण करितांना श्रोत्यांस जो आनंद होत असे, तो ह्या वाङ्मयाचें वाचन, श्रवण व मनन करितांना होईल ह्यांत संशय नाहीं.

ह्या विषयाला अनुलक्षून एका इंग्लिश कवीनें एका काव्यांत जे उद्गार काढले आहेत ते फार मननीय असल्यामुळें तें काव्य येथें जोडलें आहे, व त्याचें सार मराठींतहि पुढें दिलें आहे.

*An Empty Casket.*

Surely the woman of the sinful street
Who pushed her way past many a spotless guest,
And washed with tears, and kissed the sacred feet,
And wiped them with her hair, and from her breast

Drew out an alabaster box, and poured
The precious ointment forth, making increase
The indignant voices, till she heard her Lord
Saying, "Thy faith hath saved thee, go in peace"—
Surely at times, long after He was dead,
She took the box out from some hidden place,

And wept, recalling in a fragrance shed
About it still, the very voice and face.

So do I cherish up my heart, as it were
An alabaster box in secret shrine,
Retaining still a fragrance faint and rare
Of love long since poured out at feet of thine.

## रिकामा करंडक.

'प्रभु येशू ख्रिस्तांच्या सभोंवतीं जमलेल्या सच्छिष्यांच्या गर्दीतून ती गल्लीकुचींत दिवस काढणारी दुराचारी पापी स्त्री मार्ग खेटीत जातांना पाहून सर्व लोक खरोखरीच आश्चर्यचकित झाले. ती बाई इकडे तिकडे न पाहतां प्रभूंजवळ आली, आणि त्यांच्या परमपूज्य चरणांवर लोळण घेऊन तिनें त्यांना आपल्या नेत्रांतून वाहणाऱ्या अश्रुजलानें स्नान घातलें.

'नंतर तिनें त्या पवित्र चरणांचें प्रेमानें चुंबन घेऊन ते आपल्या मोकळ्या केसांनीं स्वच्छ पुसले आणि आपल्या कंचुकीच्या आंत लपवून ठेविलेला एक स्फटिकाचा करंडक काढून त्यांत असलेलें उंची सुगंधी तेल प्रभूंच्या पवित्र चरणांस चोळून लाविलें.

'हें तिचें धाडसी कृत्य पाहून तेथें जमलेल्या मंडळीचा क्रोधाग्नि भडकला आणि त्यांनीं रागाच्या भरांत तिला शिव्याशाप देण्यास कमी केलें नाहीं. इतक्यांत प्रभूंच्या मुखांतून निघालेले हे कळकळीचे शब्द तिच्या कानीं पडले: 'तुझ्या एकनिष्ठ भावानें तुझा उद्धार झाला आहे. आतां तुला भिण्याचें कारण नाहीं. तूं स्वस्थ चित्तानें घरीं जा आणि शांतिसुखाचा उपभोग घेत रहा.'

'प्रभूंनीं ह्या जगांतून निजधामास प्रयाण केल्यानंतर बरींच वर्षें, अर्थात् देह पडेपर्यंत, ती बाई आपल्या कंचुकीच्या आंत गुप्त जागीं लपवून ठेविलेला

तो करंडक मधून मधून बाहेर काढून अश्रु ढाळीत प्रभूंच्या स्वरूपाचें ध्यान करी, व तिला उद्देशून त्यांनीं जे उद्गार काढले होते त्यांचें स्मरण करीत आणि त्या रिकाम्या करंडकांत सुगंधि तेलाचा जो परिमळ शेष राहिला होता, त्याचें सेवन करीत ती आपल्या आयुष्याचे दिवस काढीत असे.

‘तद्वत्, हे प्रभुराया! तुझ्या चरणांवर ज्या प्रेमाचा अभिषेक करण्याची अपूर्व संधि मला मिळत असे, त्या प्रेमाचा अंधुक परंतु दुर्मिळ परिमळ जो माझ्या हृदयमंदिराच्या अंतःस्थ भागांत जणूं काय स्फटिकाच्या डबींतच सांठवून ठेविला आहे, त्याचें सेवन करून मी आनंदानें कालक्षेप करितों.’

ह्या कवितेवरून आपणांस हाच बोध घ्यावयाचा आहे कीं जरी आपले परमपूज्य सद्गुरु, श्री भाई, आपणांस सोडून निजधामास गेले आहेत तरी ते आपल्या हृदयमंदिराच्या अंतःस्थ भगांत वास करीत आहेतच. तेव्हां त्यांच्या स्वरूपाचें ध्यान करून, त्यांनीं आपणांस वेळोवेळीं जें उपदेशामृत पाजिलें त्याप्रमाणें आचरण करून, व त्यांनीं जें वाङ्मय ठेविलें आहे त्याचें आपण वारंवार श्रवण मनन केलें, तर आपलें कष्टमय जीवित आनंदमय होईल, आणि त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनानें व त्यांच्या मुखांतून स्रवणाऱ्या वाक्सुधेच्या सेवनानें आपणांस जो आनंद होत असे, तो आनंद आतांहि आपणांस सेवन करितां येईल ह्यांत संशय नाहीं.

# परिशिष्ट पहिलें.

## जीवनक्रमांतील कांहीं संस्मरणीय गोष्टी.

१८५७ जन्म—१ ऑगस्ट.
१८८१ मातोश्रीचें वैकुंठास गमन.
१८८१ कारवार हायस्कुलांत नोकरी पत्करिली.
१८८३ बी. ए. ची डिग्री संपादिली.
१८८९ मुंबईस डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरचे जागीं नेमणूक.
१८९२ सावत्र मातोश्रीचें गमन.
१८९८ शिंवास स्वतःच्या घरीं वास्तव्य.
१८९९ श्री डाकोरनाथजीचे दर्शनास जाणें.
१९०२ श्री बाबांचें वैकुंठास गमन.
१९०६ पत्नीचा वियोग ( प्रयाण ).
१९०८ 'ब्रीफ हिस्टरी ऑफ इंडिया' पुस्तक प्रसिद्ध झालें.
१९०९ फर्लो रजेवर गेले.
१९०९ श्रीक्षेत्र आळंदी येथें श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनास जाणें झालें.
१९१० श्रीकाशीची यात्रा.
१९११ पेन्शन घेतलें.
१९११ श्रीरामेश्वराची यात्रा.
१९१३ दांड्यास घर बांधलें.
१९१६ गीतेवरील इंग्रजी टीका लिहिण्यास सुरवात केली. ( पान २० वर १९१५ सन दिला आहे त्या सालीं स्फूर्ति झाली. )
१९१६ मिरजेस डॉ. वान्लेसचे डोळ्यावर औषधोपचार.
१९१७ श्रीवामनपंडित व श्रीतुकाराममहाराज यांच्या समाधींचें दर्शन.
१९१७ श्रीजगन्नाथपुरीची यात्रा. ( श्रीजनार्दनस्वामी, श्रीएकनाथमहाराज, श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या दर्शनास जाणें झालें. )
१९१७ गीतेवरील इंग्रजी टीका लिहून पुरी झाली.
१९१८ 'पुरुषार्थदीपिका' ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला.
१९१९ श्रीनारायणमहाराजांच्या पादुकांच्या दर्शनार्थ ग्वालेर येथें गमन.
१९२० श्रीसमर्थ व श्रीरंगनाथस्वामी यांच्या समाधींचें दर्शन.
१९२१ 'लघुबोध' ग्रंथ प्रसिद्ध झाला.
१९२१ श्रीवामनपंडितांच्या समाधीचा जीर्णोद्धार व त्यांच्या पुण्यतिथ्युत्सवाचा प्रारंभ.
१९२२ सद्भक्ति मंडळाची स्थापना.

१९२२ 'Amourism (प्रेमामृत)' ग्रंथ प्रसिद्ध झाला.
१९२३ जोगेश्वरीस आगमन.
१९२३ श्रीरामेश्वर देवळाची कोनशिला बसविली.
१९२३ सद्भक्तिमंदिराची स्थापना.
१९२३ सद्भक्तिमंदिरांत श्रीबाबांच्या पादुकांची स्थापना.
१९२३–५ गीतेवरील इंग्रजी टीकाग्रंथ तीन भागांत प्रसिद्ध झाला.
१९२५ 'भगवद्भजन' पुस्तक प्रसिद्ध झालें.
१९२६ श्रीरामेश्वर मंदिरांतील देवतांची स्थापना.
१९२७ श्रीवामनपंडितांचें आगमन अर्थात् सद्भक्तिमंदिरांत त्यांच्या पादुकांची स्थापना.
१९२७ खार येथील श्रीरामकृष्ण मिशन मठांत सार्वजनिक प्रवचन. विषय—श्रीरामकृष्णजयंति.
१९२७ 'श्रीज्ञानेश्वरमहाराज अथवा सद्भक्तिविजय' ग्रंथ प्रसिद्ध झाला.
१९२८ श्रीवामनपंडितांचा पुण्यतिथ्युत्सव दोन ठिकाणीं म्हणजे भोगांवास व सद्भक्तिमंदिरांत होऊं लागला.
१९२८ 'सद्भक्तिप्रकाश' मासिक सुरू केलें.
१९२९ श्रीनारायणमहाराज (रत्नागिरीवासी) यांच्या पादुकांची स्थापना.
१९३० 'सद्भक्तिप्रकाश' छापखाना सुरू केला.
१९३१ बऱ्याच मंडळीसह गोव्यांतील श्रीमंगेशाची यात्रा व सर्वत्र शांतता राहण्याकरितां सामुदायिक प्रार्थना.
१९३२ सद्भक्तिमंदिरांत श्रीराधाकृष्ण तोरणे यांच्या पादुकांची स्थापना.
१९३२ सद्भक्तिमंदिरांत श्रीदत्तात्रेयमूर्तीची स्थापना.
१९३२ सद्भक्तिमंदिरांत श्रीनारायणमहाराज (जालवणकर) यांच्या पादुकांची स्थापना.
१९३२ सारस्वत ब्राह्मण समाजातर्फे सार्वजनिक प्रवचन. विषय—सद्भक्तिपंथ.
१९३३ ब्लॅव्हॅट्स्की हॉलमध्यें सार्वजनिक प्रवचन. विषय—राष्ट्रीय प्रार्थना.
१९३३ ब्लॅव्हॅट्स्की हॉलमध्यें सार्वजनिक प्रवचन. विषय—सद्भक्तिपंथ किंवा जगद्वंद्यपंथप्रदर्शक दोन श्लोक.
१९३३ जगद्वंद्य धर्म (World Religion) पुस्तक प्रसिद्ध झालें.
१९३४ ब्लॅव्हॅट्स्की हॉलमध्यें सार्वजनिक प्रवचन. विषय—सद्भक्तिपंथ आणि सनातनधर्म यांची तुलना.
१९३५ श्रीभाईचें वैकुंठास गमन—१४ ऑक्टोबर.

## परिशिष्ट दुसरें.

# तीर्थयात्रेंत भगवंतांनीं वेळोवेळीं कसें साहाय्य केलें.

ज्ञानी भक्तांपुढें सिद्धि हात जोडून उभ्या असतात तरी त्यांच्या साह्यानें चमत्कार करून आपली प्रसिद्धि करण्याच्या मोहांत ते कधीं पडत नाहींत. तरी त्यांचें भगवंताशीं साधर्म्य झालेलें असल्यामुळें प्रसंगोपात्त त्यांच्या हातून अलौकिक कृत्यें झालेलीं दिसून येतात. ते त्यांच्याबद्दल अभिमान बाळगत तर नाहींतच, पण सिद्धींच्या नादीं कोणीं लागूं नये असाच ते नेहमीं सर्वांना उपदेश करतात.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं सिद्धींचें समर्थन न करितां फोलपणाच पुढील पदांत व श्रीनाथांनीं त्यांचा घातुकपणाच पुढील ओव्यांत दर्शविला आहे:

(१) सोही कच्चाबे कच्चाबे । नहि सद्‌गुरुका बच्चा ॥ धृ० ॥ तीरथ करके उंमर खोई जोग जुगुत मों सारी । धन कामिन कुंजर लागे जोग कमाया भारी ॥ १ ॥ गुप्त होकर परगट होवे गोकुल मथुरा काशी । सिद्धजी हुवे प्राण निकाले सत्यलोकके वासी ॥ २ ॥ कुंडलनीकू खूब चढावे ब्रह्म-रंध्रकू जावे । चलता है पानीके उपर बोलत सोई होये ॥ ३ ॥ हुकुम निवृत्तिका **ज्ञानेश्वरकू** तीन उपर मेना । सद्‌गुरूकी कृपा भई जद आपी-आप पिछाना ॥ ४ ॥

(२) माझे भजनें सावकाशीं । सिद्धी प्रगटती साधकासी । त्या सेव्य नव्हती त्यासी । तेंचि हृषीकेशी सांगतू ॥ १८५ ॥ अहेतुक करितां माझें भजन । तेणें शीघ्र माझी प्राप्ती जाण । तेथें सिद्धीवरी घालितां मन । आली नागवण मत्प्राप्तीसी ॥ १८६ ॥ ज्यासी विषय भोग लागे गोड । तोचि सिद्धींची वाहे चाड । ज्यासी माझे प्राप्तीचें कोड । तो वांछीना बंड ऋद्धिसिद्धींचें

॥ १८७ ॥ पावतां पावतां वाराणसी। जो वस्तीसी गेला वेश्यागृहासी। तेथें भुलोनि तिच्या भोगासी। सर्वस्व तियेसी समर्पी ॥ १८९ ॥ सकळ पापांतें निर्दळणें। सकळ कुळांतें उद्धरणें। तें काशीचें खुंटलें पावणें। वेश्या नागवणें भोगलिप्सा ॥ १९३ ॥ तैसीच सिद्धींचीही कथा। माझे प्राप्तीसी प्रतिबंधभूता। माझें ध्यान ज्ञान वैराग्यावस्था। नागवूनि रिता सांडिती ॥ १९४ ॥—ए. भा. अध्याय १५.

श्रीवामनपंडितांचेंहि मत वरील प्रकारचें आहे असें पुढील 'निगमसारां'तील ओव्यांवरून स्पष्ट दिसतें:—

'अनेक ईश्वरशक्ती। त्या इच्छितां अंतरे मुक्ती। यास्तव सिद्धीची आसक्ती। न धरिती ज्ञानी ॥ ९७ ॥ जो ज्ञानी निष्काम। त्यासि सिद्धीचें काय काम। जो सर्वदा आत्माराम। ब्रह्मानंदीं निमग्न ॥ ९९ ॥ जे परमेश्वराची व्यक्ती। ते पावला विद्याशक्ती। जी करितां कैवल्यमुक्ती। इतर सिद्धि किमर्थ ॥ १०१ ॥ ज्ञानियांसि प्रारब्ध सारणें। किंवा जनासि उद्धरणें। त्यासि सिद्धि अवलंबणें। किमर्थ? ॥ ११९ ॥'

भाई असाच उपदेश करीत कीं कधींहि कोणीं सिद्धींची इच्छा करूं नये व त्यांच्या जोरावर किंवा साहाय्यानें चमत्कार करून दाखवूं नये. त्यायोगें देहाभिमान वाढतो व असत्य किंवा मायिक गोष्टींना सत्यत्व दिल्यासारखें होतें व आपण भगवंतापासून दूर होत जातों. असें जर आहे तर खालीं दिलेल्या गोष्टी अलौकिक म्हणजे मानवशक्तीच्या बाहेरच्या लीला आहेत त्या भाईंनीं कशा केल्या? याचें उत्तर त्या भाईंनीं केल्या नसून त्या भगवंताची त्यांच्यावर कशा तऱ्हेची कृपा होती याच्या दर्शक आहेत. भाईंनीं एका प्रवचनांत या कशा घडतात याचा खुलासा केला आहे, तो देऊन नंतर घडलेले चमत्कार देऊं.

'अवतारिक पुरुषांना सिद्धि या नैसर्गिकच असतात. वास्तविक पाहतां

थोर महात्म्यांच्या या अमानुष सामर्थ्यास ' सिद्धि ' म्हणणेंच अयोग्य आहे. उज्ज्वल उपासनेनें अपेक्षा नसतांहि प्राप्त झालेलें व होणारें हें ' अनंताशीं साधर्म्य ' होय. प्राकृत महत्त्वाकांक्षा अंतरीं धरून केलेल्या योगाभ्यासानें प्राप्त होणाऱ्या योगसिद्धि व निष्काम पण उत्कट प्रेमळ उपासनेनें प्राप्त होणारें ' अनंताशीं साधर्म्य ' अथवा आत्मसिद्धि, अगर ईश्वरप्रसादानें प्राप्त होणाऱ्या ' देवसिद्धि ' यांच्यामध्यें महदंतर आहे. चांगदेवाचे ' चमत्कार ' व तुकारामरामदासादिकांच्या ' लीला ' यांचें स्वरूप बहिर्दृष्टीस एकच दिसतें, पण त्यांच्या योग्यतेंत जमीनअस्मानाचें अंतर आहे. वरील विवेचनावरून असें आढळून येईल कीं, अवतारी पुरुषांचे चमत्कार, चांगदेवासारख्या ज्ञानशून्य हठयोग्याचे चमत्कार, तुकारामादि संतांचे चमत्कार व गारुड्यांचे चमत्कार एकाच रूपाचे किंवा एकाच कारणानें घडत नाहींत. राम, कृष्ण, येशू ख्रिस्त या अवतारी पुरुषांस सिद्धींची अनुकूलता निसर्गतःच होती, व चांगदेवासारख्यांनीं ती योगबलानें प्राप्त करून घेतली होती; ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि ज्ञानी भक्तांस, त्यांच्या उत्कट उपासनेच्या योगानें ती सहज साध्य झाली होती.'

( १ ) एकदां श्री भाई ऑफिसांतून शिंवला परत जात असतां एक बाई बरोबर लहान मूल घेऊन, ते बसले होते त्या डब्यांत शिरली व परळ स्टेशनवर गाडी थांबेल का म्हणून चौकशी करूं लागली. जेव्हां तेथें गाडी थांबणार नाहीं असें तिला समजलें तेव्हां ती गांगरून गेली. तिची ती केविलवाणी स्थिति पाहून श्री भाईंना तिचा कळवळा आला. त्यावेळीं दोन स्नेही जवळ बसलेले होते. त्यांना श्री भाई म्हणाले कीं, जर मला सिद्धि वश असत्या तर मीं ह्या बाईकरितां गाडी थांबविली असती. एवढा विचार प्रकट करतांच ती गाडी त्या स्टेशनवर थांबावयाची नव्हती तरी थांबली, व ती बाई आनंदानें उतरून गेली.

( २ ) एकदां बोटींतून उतरून घरीं जाई तों बरीच रात्र झाली व कोणीहि सोबतीला अथवा वाट दाखविण्याला मिळेना. घरीं जाणें निकडीचें असल्यामुळें श्री भाई एकटेच जावयास निघाले. वाटेंत एक अपरिचित मनुष्य भेटला व घरच्या दरवाजापर्यंत पोंचतांच मागें परतून जो गेला तो कितीहि शोधला तरी सांपडला नाहीं. हा कोण असावा बरें ! सती द्रौपदीला भीष्मांच्या दारापर्यंत पोंचविण्यास गेलेल्या भक्तसख्या भगवंता-शिवाय दुसरा कोण असणार ?

( ३ ) श्री भाई मथुरेस द्वारकाधीशाच्या दर्शनास गेले होते. त्यावेळीं आरती चालली होती व श्री भाईंना यमुनेची आरती साधण्याकरितां तिकडे जावयाचें होतें. दोहींकडील आरत्या साधारण एकाच वेळीं होतात. तिकडे लगेच न जावें तर ती साधण्याकरितां एक दिवस जास्त राहिलें पाहिजे होतें, पण तसें करण्यास सवड नव्हती. प्रसाद घेतल्याशिवाय यमुनेच्या आरतीस जाण्याचा श्री भाईंचा विचार नव्हता. थोडक्याच मिनिटांत श्री भाईंना एका पंड्यानें प्रसाद दिला. तेव्हां बरोबर असलेल्या पंड्यानें म्हटलें, 'आपलें काम झालें. आतां आपण यमुनेच्या आरतीला जाऊं.' श्री भाई तिकडे गेले हें सांगणें नकोच. पंड्याचें सोंग घेऊन भगवानच आले असावेत, कारण प्रत्येक पंड्याला तेथील शिस्तीच्या विरुद्ध म्हणजे आरतीनंतरचा सर्व कार्यक्रम झाल्याशिवाय प्रसाद वाटला तर शिक्षा होईल हें माहीत असल्यामुळें नेहमींच्या पंड्यांपैकीं कोणीं तरी वेळ होण्यापूर्वीं प्रसाद दिला असें संभवत नाहीं.

( ४ ) श्री भाई श्रीसेतुबंधरामेश्वराच्या यात्रेस जातांना श्रीक्षेत्र पंढरपूर येथें रात्रीच्या वेळीं पोंचले. दुसऱ्या दिवशींच निघावयाचें होतें. त्यामुळें आपणांस रात्रीं पोंचल्याबरोबर श्री पंढरीनाथांचें दर्शन व्हावें व आपलें नित्याचें भजन त्यांचेपुढें बसून व्हावें अशी त्यांना इच्छा झाली. देवळांत जाऊन पाहतात तों शेजारती चालली होती. शेजारती झाल्यावर आंत

कोणीं कांहीं म्हणावयाचें नाहीं इतकेंच नव्हे तर दरवाजेहि बंद करावयाचे असा तेथें नियम आहे. शेजारती झाल्याबरोबर भाईंनीं ( त्यांना वरील नियम माहित नसल्यामुळें ) आपलें नित्याचें भजन सुरू केलें. मौज काय झाली कीं, सर्व बडवे लोक भजन ऐकत बसले. सर्व भजन होऊन आरती सुद्धां म्हटली. मग एकजण दुसऱ्याला म्हणतो, 'कायरे, तूं त्यांना ( भाईंना ) शेजारती झाल्यावर नियमाविरुद्ध भजन कसें करूं दिलेंस ?' दुसरा म्हणतो, 'मला भूल पडली खरी, पण आपण काय करीत होतां ?' सर्वजण एकमेकांच्या तोंडाकडे पहात म्हणूं लागले कीं, 'आश्चर्य आहे कीं आपणां सर्वांना एवढी भूल कशी पडली !' तेव्हां भाईंनीं त्यांना सांगितलें कीं, 'भगवंताची इच्छा भजन ऐकण्याची होती, म्हणून असें झालें. तेव्हां कोणीं कोणावर रागावण्यांत अर्थ नाहीं.' सर्वांसच तें म्हणणें पटलें.

**कृष्णरूपी त्वांची हरि बहू लीला केली ।**

असें आरतीच्या वेळीं म्हटल्याबरोबर श्री पंढरीनाथांना मागील म्हणजे द्वापार युगांतील सर्व लीलांचें एकदम स्मरण झालें व त्यांनीं सुप्रसन्न होऊन हास्य केलें, कारण त्या वेळीं श्री पांडुरंगांचें चेहऱ्यावर कांहीं वेळ दिव्य तेज झळकत होतें. तुकाराममहाराजांना सुद्धां श्री पंढरीनाथांचें दर्शन असेंच होत असावें. ते म्हणतात:—

**राजस सकुमार मदनाचा पुतळा । रवि शशिकळा लोपलिया ॥**

( ५ ) भाई नरसोबाच्या वाडीस गेले होते. व तेथें पालखीबरोबर प्रदक्षिणा करून प्रसाद घेऊन घरीं जाण्याचा त्यांचा विचार होता. बडव्याचे घरीं जेवण तयार झाल्याबरोबर तो बोलवावयास आला. त्या वेळीं भाई देवळा-समोरच बाहेरचे बाजूस पालखी होती तेथें उभे होते. भगवंताचे मनांत त्यांनीं सर्व संपेपर्यंत खोळंबून उभें राहावें असें नव्हतें असें वाटतें. कारण प्रसाद घेतल्याशिवाय हे घरीं जाणार नाहींत हें जाणून श्रीदत्तात्रेयांनीं

पालखींतून एक खारीक भाईंच्याकडे टाकिली. ती त्यांच्या पायावर पडली. कांहीं तरी पायावर पडलें आहे असें वाटून श्री भाईंनीं पाहिलें तों एक खारीक मिळाली. तेव्हां भगवंतांनीं आपणाला लवकर घरीं जातां यावें म्हणून ही युक्ति केली असावी असा विचार करून त्यांनीं तो प्रसाद ग्रहण केला व ते बिऱ्हाडीं गेले.

( ६ ) औरंगाबाद स्टेशनहून श्रीक्षेत्र पैठणास जातांना वाटेंत दोन तीन नद्या लागतात. पैकीं एका नदीस पाणी बरेंच आलें होतें. तें किती आहे याचा अजमास नसल्यामुळें दोन्ही कांठावर कित्येक गाड्या थबकून राहिल्या होत्या. अशा वेळीं श्री भाईंची गाडी तेथें येऊन दाखल झाली, तों एक पांढरी शुभ्र, फार तेजःपुंज अशी धेनु व तिचें लहान वत्स नदीकांठावर आलीं आणि तीं दोघेंहि नदीमधून परतीराला जातांना गाडीवानानें पाहिलीं. त्याबरोबर त्यानें आपला टांगा न थांबवितां नदींतून परतीराला जाण्याकरितां चालविला. असें झालें नसतें तर संकल्पाप्रमाणें श्रीनाथांची भेट त्या दिवशीं झाली नसती, व रात्रीं रानांत पडून राहावें लागलें असतें.

( ७ ) श्रीहरिहरेश्वराचें दर्शन घेऊन कलकत्त्यास जाण्याकरितां स्टेशनवर भाई येऊन बसले. ते यात्रेचे दिवस असल्यामुळें गर्दी फार होती, व तिकिटें देण्याचें बंद केलें होतें. गाडींत बसण्यास मिळावें म्हणून बक्षिसी देऊन कांहीं लोक उतारूंच्या जागेंत जाऊन बसले होते. अशा स्थितींत आंत कसें जातां येईल व जागा कशी मिळेल हा विचार पडला. बरोबर असलेला इसम एका डॉक्टरच्या खोलींतून वाट मिळाली तर पाहावी म्हणून गेला. इतक्यांत एकजण भाई एका बाजूस साधारण काळोखांत बसले होते तेथें आला व त्यांना म्हणाला कीं, मी आपणांस एका दूरच्या फाटकांतून आंत घेऊन जाऊन गाडींत बसवून देतों. त्यांनीं उत्तर दिलें कीं, माझ्या बरोबरचा इसम आल्यावर बघूं. बरोबरचा इसम परत आल्यावर त्यानें हें

ऐकिल्यावर तो म्हणाला, ‘ त्याला ठेवून घेतलें असतें तर बरें झालें असतें. कारण आंत शिरकाव होण्याची आशा नाहीं.’ थोड्याच वेळांत तो इसम पुन्हा आला व आम्ही खुशीनें त्याच्या मागून गेलों व सिग्नलपाशीं असलेल्या एका फाटकांतून त्यानें आम्हांस प्लॅटफार्मवर नेऊन बसविलें. याप्रमाणें अकल्पित रीतीनें आमची सर्व सोय झाली. आमची सोय करणाऱ्या इसमानें आमच्याजवळ कोणत्याहि प्रकारचें बक्षिस मागितलें नाहीं, व आम्ही त्याला यथाशक्ति कांहीं बक्षिस देण्याचा विचार करीत होतों, इतक्यांत तो दिसेनासा झाला आणि त्याचा पुष्कळ तपास केला तरी तो पुन्हा भेटला नाहीं.



# परिशिष्ट तिसरें.

## श्री भाईंचीं निवडक कवनें.

श्री भाई कवि म्हणजे छंदोबद्ध कविता करणारे नव्हते. भाईंची वहुतेक नोकरी विद्याखात्यांत डेप्युटी इन्स्पेक्टरच्या हुद्द्यावर झाल्यामुळें शुद्ध मराठी लिहिणें बोलणें हा गुण त्यांच्या अंगीं स्वभावतः आला होता. परीक्षक या नात्यानें त्यांनीं वृत्तदर्पणाचा अभ्यास केला असेल तितकाच. कवि या नात्यानें त्यांनीं वृत्तदर्पणाचा अभ्यास केला नव्हता. तथापि प्रख्यात वर्डस्वर्थ कवीनें जें काव्यलक्षण दिलें आहे तें त्यांच्या काव्यास लागू पडतें:— 'Poetry is the spontaneous overflow of powerful feelings', अर्थात् 'अंतःकरणांतील मनोवृत्ति उचंबळून स्वयंप्रेरणेनें शब्दरूपानें बाहेर प्रकट होतात, त्या शब्दरचनेस काव्य म्हणावें.' भाईंच्या कवनांत त्यांचें ईश्वरावरचें उत्कट प्रेम पूर्णपणें प्रतिबिंबित झालें असल्यामुळें त्याला उत्कृष्ट प्रतीचें वृत्तिप्रधान काव्य म्हणतां येईल. एकनाथी भागवतांत कविपदाची व्याख्या दिली आहे ती भाईंना कशी लागू पडते हें पुढील ओव्यांवरून लक्षांत येईल:—

कविपदाचें व्याख्यान । सावधान अवधारीं ॥
वेदशास्त्रांचा मथितार्थ । जाला करतळामलकवत ।
तैसाच ब्रह्मानंदें डुल्लत । कवि निश्चित या नांव ॥
उपनिषदांचा मथितार्थ । ज्याच्या मुखाची वास पहात ।
परोक्षापरोक्ष ज्याचेनि सत्य । कवि विख्यात त्या नांव ॥

कवनें करून भाईंना कीर्ति, मान वगैरे मिळविण्याची बिलकुल इच्छा नव्हती, कारण त्यांनीं आपलें नांव अगर मुद्रा बहुतेक कवनांत घातली नाहीं, इतकेंच नाहीं तर आपल्या सद्गुरूच्या नांवानें कवनांची प्रसिद्धि व्हावी

म्हणून ते ह्या कवनांस ‘ शंकर सुधा ’ म्हणत असत. हीं कवनें रचण्याचा भाईंचा हेतु ईश्वराचे गुणानुवाद गाऊन स्वतःचें व इतरांचें शाश्वत कल्याण करावें इतकाच होता. ज्या काव्यांत भगवद्गुणवर्णन असतें असें काव्य एका भगवत्प्रेमावांचून इतर बाबतींत कितीहि असंबद्ध असलें तरी त्याचा संतांना फार आदर वाटतो व त्याचेंच ते आनंदानें गायन करितात. याचें कारण भागवतांतील पुढील श्लोकांत आढळतें:—

तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो यस्मिन्प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ।
नामान्यनन्तस्य यशोऽङ्कितानि यच्छृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः ॥

भावार्थ:— ‘ लोकांच्या पातकांचें नाशन करणारें जें भाषण तेंच खरें भाषण होय. त्या भाषणांत जरी प्रत्येक श्लोकामागें चित्रविचित्रपणा नसला तरी सुद्धां जर परमेश्वराचीं सुंदर नांवें व त्याची कीर्ति त्यांत गायली असेल, तर साधु लोक त्याचें श्रवण व गायन करितात. ’

अहंकारत्यागाचा अत्यंत कठीण भाग म्हणजे स्वरचित वाङ्मया-विषयीं तटस्थ भाव धारण करणें हा होय. भाईंचे सर्व लेख प्रासादिक म्हणजे निरहंकाराच्या अत्युच्च भूमिकेवर झालेले आहेत. गद्यलेखनांत त्यांनीं आपल्या विवेकशक्तीचा अवलंब केलेला आढळून येतो. परंतु कवनें करितांना त्यांनीं त्या शक्तीला अजिबात फांटा दिला आहे असें दिसतें.

पुढील कवनें भाईंच्या द्वारें आपण भगवद्वचन श्रवण करीत आहोंत ह्या भावनेनें वाचल्याशिवाय त्यांच्या खऱ्या रसाची गोडी चाखतां येणार नाहीं.

अशा तऱ्हेचीं भाईंचीं २०० वर कवनें आहेत. तीं सर्व विस्तार-भयास्तव येथें देतां येत नाहींत. त्यांपैकीं सुमारें २५ कवनें नमुन्यादाखल येथें दिलीं आहेत, त्यांवरून वाचकांना त्यांच्या काव्याच्या रहस्याची कल्पना करितां येईल.

## ( १ ) पद.

रामा तूं येईं, मम हृदयीं वास करीं ॥ धृ० ॥
चैन नसे मज तुजविण देवा । धांव घेईं झडकरी ॥ १ ॥
दश दिशा मज शून्य भासती । धीर धरूं कुठवरी ॥ २ ॥
शंकरचरणामृत तें पाजुनि । त्वरित तारीं नरहरी ॥ ३ ॥

## ( २ ) पद.

भगवंता तूं निर्गुण असूनी सगुण भाससी भक्तां रे ॥ धृ० ॥
मज दीनातें तुजविण कोणी त्राता नाहीं बापा रे ॥ १ ॥
ऐहिक सुखासी व्यर्थचि भुलुनी घालविलें वय वायां रे ॥ २ ॥
शंकरचरणावांचुनि कांहीं नेणों तरणोपाया रे ॥ ३ ॥

## ( ३ ) पद.

धांव दयाळा सद्गुरुनाथा कां लपसी तूं परम समर्था ॥ धृ० ॥
पातक संचय फार असे परि भस्मचि करिसी तूं बलवंता ॥ १ ॥
बिरुदें ऐकुनि आलों शरण मी नको लावुं तूं उशीर आतां ॥ २ ॥
सम सदय तूं कल्पतरू कीं पूर्ण करिसि मम मनोरथा ॥ ३ ॥

## (४) श्लोक.

बोलिलासि तूं शंकरा मला । ज्ञान हें मिळे भाविका जना ।
यज्ञयाग ते दानधर्मही । वेद शास्त्रांच्या पडुं नको भरी ॥ १ ॥
नाम एकची हृदयमंदिरीं । दृढ धरी तरी सांपडे हरी ।
सुखस्वरूप तो आकळे कसा । दुःखकष्टयुक्त साधना असा ॥ २ ॥
प्रेमभावें तूं मज सदा स्मरीं । मीच तूजला सहज उद्धरीं ।
इतर जीवही करिति हें झणीं । मुक्ति पर्णिती भक्त होऊनी ॥ ३ ॥

## (५) अंजनीगीत.

अबोला कां रे धरिसी ॥ ध्रु० ॥
नाम्यासी तूं भाषण करिसी । त्याच्या संगें जेविसी खेळसी ॥
असें असूनी मज दीनासी । कां उपेक्षिसी ॥ १ ॥
मी तों आहें पामर । परि माझा तुजवरि भार ।
म्हणूनी झालासे धीर । बोलाया तुजशीं ॥ २ ॥
वीट आला संसारीं । शरण गेलों तूंतें हरी ।
देऊनि संगत घडीभरीं । वैकुंठा जासी ॥ ३ ॥
जाते समयीं माझी चिंता । झाली तुज भगवंता ।
बुद्धिस्थानीं राहीं म्हणतां । मान्य करीसी ॥ ४ ॥
आतां मागणें हेंचि आहे । चित्त सदां शांत राहे ।
तूंतें चराचरीं पाहें । आवडीशीं ॥ ५ ॥

## (६) साकी.

बाळक आहें अति दुर्बळ मी शक्ती नाहिं उठाया ।
उंच गिरीच्या शिखरावरतीं करितों यत्न चढाया ॥ १ ॥
काम क्रोध मद मत्सर सहाही पिडिती बसल्या जागीं ।
आळस तो तर हाल्ंू देना काय करूं मी स्वामी ॥ २ ॥
जो मजसी प्रिय मी ज्यासी प्रिय पाठविं ऐशा भक्ता ।
सहाय कराया मज दीनातें वैकुंठींच्या नाथा ॥ ३ ॥
शक्ति देउनी षड्रिपु मारुनि आळस मोडुनि टाकीं ।
शंकरप्रसादें भक्ति पावुनी सफळ होउं ही साकी ॥ ४ ॥

## (७) पद.

करिं रे दया दयाळा प्रसन्न होउनि धरिं हृदया ॥ धृ० ॥
ठेवुनि कर माथां, **समर्था**, वदवी निजगुणगाथा ॥ १ ॥
गातां, गातां, गातां, **भगवंता**, गळुं दे मम क्षेत्रा ॥ २ ॥
दाखविं निजरूपा, **हृदयस्था**, करिं तन्मय मच्चित्ता ॥ ३ ॥
वृत्ती परततां, **अनंता**, दाविं जडीं चित्सत्ता ॥ ४ ॥
अनुभव बाणुनियां, **गुरुवर्या**, दवडीं समूळ माया ॥ ५ ॥
मजसीं या डोळां, **गोपाळा**, भोगविं मुक्तीचा सोहळा ॥ ६ ॥
त्यजितां कलेवरा, **शंकरा**, नेईं मज तव वैकुंठनगरा ॥ ७ ॥

## (८) पद.

माझी लाज तुला रघुराया, यदुराया ॥
छळीतसे बहु तुझी माया ॥ धृ० ॥
शरण मी आलों तुजशीं । आवरूनी धरिं बा तिजशीं ॥ १ ॥
फार मी भ्यालों खिन्नचि झालों । न कळे मज अन्य उपावो ॥ २ ॥
अंत नको बघूं अमुचा आतां । धांव त्वरें तूं सद्गुरुनाथा पंढरीनाथा ॥ ३ ॥

## (९) पद.

तुजहुनि कोणि नसे मज थोर । गुरुजी ॥ धृ० ॥
ब्रह्मादि देव त्यांचा काय पाड । देवाधिदेवही वंदितसे तुज ॥ १ ॥
तूं मायबाप, तूं ज्ञानदीप । तूं सुखरूप राहीं समीप ॥ २ ॥
तूं परब्रह्म, तूं जगदीश । निशिदिनीं दर्शन देईं तूं मज ॥ ३ ॥
मम मरणाची वाहसी चिंता । तव वचनावरी राहूं दे निष्ठा ॥ ४ ॥
प्रपंच आतां वाटतो घोर । यांतुनि सोडविं अति सत्वर ॥ ५ ॥
शंकरच्चरण सेवीं मी सतत । वर असा दे पंढरीनाथा ॥ ६ ॥

## ( १० ) पद.

कृष्ण कृष्ण कृष्ण सदा प्रेमें गाऊं, शंखचक्रपद्मगदाधारियासि ध्याऊं ॥ धृ० ॥
मस्तकीं रत्नमुगुट भाळिं केशरीतिलक,कमलनयन हास्यवदन,बहु मनोहरू ॥१
कंठीं मुक्ताहार, आपाद वैजयंतिमाळ, हृदयीं श्रीवत्सभार, धरी श्रीधरू ॥ २ ॥
कर्णीं दिव्यकुंडलें, करीं वज्रकंकणें, पदीं रम्य नूपुरें, घालि रमावरू ॥ ३ ॥
शालु पीतांबरू, नेसतो दिगंबरू, भक्तरागद्वेषहरू, श्यामसुंदरू ॥ ४ ॥

## ( ११ ) पद.

राजा परिक्षिती एक्या श्रवणें वैकुंठा नेला ।
नारद कीर्तनभक्तीनें तो पूर्णत्वा आला ॥ १ ॥
प्रल्हादाच्या नृहरीस्मरणें मूर्ती गुरगुरली ।
श्रीलक्ष्मी ही पादसेवनें नारायण झाली ॥ २ ॥
अंबरिषें हो केवळ अर्चनें परब्रह्म आकळलें ।
अक्रूरानें वंदनानें मुक्तीसी वरिलें ॥ ३ ॥
दास्यभक्तिनें कपि हनुमान चिरंजीव झाला ।
राजविद्या पार्थ धनुर्धर सख्यें पावला ॥ ४ ॥
आत्मनिवेदनें बळिनें प्रभुसी द्वारपाळ केला ।
नऊ भक्ति ह्या करुनि संत ते अर्पिति देवाला ॥ ५ ॥

## ( १२ ) पद.

त्याचे गुण मी किति तरि वानूं । माझ्या आनंदाचा भानू ॥ धृ० ॥
ज्याचा अंत न कळे वेदां । भक्त कार्य करितो सदा ॥ १ ॥
ज्याचें नांव मनमोहन । योगी त्याचें करिती ध्यान ॥ २ ॥
भोळ्या भाविकांचें तारूं । नेई त्यांसी पैलपारू ॥ ३ ॥
शरणागतांचा जो नाथ । पुरवी त्यांचे मनोरथ ॥ ४ ॥

साधुसंतांची जी माय । राखी त्यांसी ठाय ठाय ॥ ५ ॥
होई दासांचा जो दास । रामकृष्ण म्हणती त्यास ॥ ६ ॥
ऐश्वर्यादिगुणसंपन्न । शंकर तो मज प्रसन्न ॥ ७ ॥

## ( १३ ) पद.

तुम्ही या प्रभुला भजूनि पहा रे । तुम्हीं या हरीला भजूनि पहा रे ॥ धृ० ॥
वेदशास्त्रपुराणावरही ठेवूनियां विश्वास रे ॥ १ ॥
सतत संतपदसमागमीं करूनियां नामपान रे ॥ २ ॥
कर्मफलद सर्वज्ञचरणीं टाकुनियां निजभार रे ॥ ३ ॥
पूर्ण कृपा करील मग तो तोडूनियां भवपाश रे ॥ ४ ॥

## ( १४ ) दिंडी.

करीं ऐसें सद्गुरू देवराया । दोषदृष्टीं पाहीन मी जगा या ॥
चित्त तेणें होईल शुद्ध माझें । त्यागितां तें क्रियमाण पाप ओझें ॥ १ ॥
देई तेव्हां व्यतिरेकबोध मातें । अन्वयाची दावूनि खूणही ते ॥
जगन्मिथ्या मग ब्रह्म एक सत्य । प्रतीती हे वीरक्ति देत नित्य ॥ २ ॥
विना परी सर्वात्मभाव जाण । नव्हे भक्ती–वैराग्य–ज्ञान पूर्ण ॥
जेणें लाभे वैकुंठवास सेवा । हेंचि मागें शंकरा ! वासुदेवा ! ॥ ३ ॥

## ( १५ ) पद.

भवानिशंकर भोळा, निरसी भवकल्लोळा ॥ धृ० ॥
ओलांडितां दारवंटा, दावी चित्तशुद्धी वाटा ॥ १ ॥
दीपस्तंभावरी येतां, गुरू देई ज्ञान हातां ॥ २ ॥
सोहं घंटा वाजवितां, दिसे साक्षीरूप सत्ता ॥ ३ ॥
देहत्रय नंदि टाकितां, भेटे जगद्वंद्य पिता ॥ ४ ॥

## ( १६ ) आर्या.

वायुसुता हनुमंता ! तुजसम सेवक नसेच या जगतीं ।
सेविसि अष्टहि प्रहरा, सच्चिद्धन राम तो बहू प्रीतीं ॥ १ ॥
सेवा वर्म असें कीं, प्रभुसी अर्पिसि सदां तुझें कर्म ।
कर्ता रामचि मानुनि, आचरसी शुद्ध भागवतधर्म ॥ २ ॥
कामादि दशाननासि, ताडुनि शोधूनि बुद्धि जे सीता ।
भेटवितां राघवातें, पावसि तत्काळ तत्त्विंही स्थिरता ॥ ३ ॥
चिरंजीवपद तेणें, संपादिसि, तूंचि मारुतीनाथा ! ।
सद्गुरुकृपेंहि आम्हां, लाभाया चरणिं ठेवितों माथा ॥ ४ ॥

## ( १७ ) श्लोक.

ताराया मनुजां अम्हां प्रगटली गीता सती माउली
हिंदू वा यवनादि तप्त सकळां देई कृपासाउली ।
भक्ती ज्ञान विराग तीन्हि नसतां नव्हे म्हणे मोक्ष हा
श्रद्धा ही श्रवणादि कर्म अवघीं अंगें तयांचीं पहा ॥ १ ॥
या करितांच काम्य त्याग आम्ही पहिला धडा घेउनी
वैराग्यें विहितें समर्पुनि बरीं भावें लिला गाउनी ।
सत्संगें जगतींच कारणद्वयें स्वात्मा असें जाणतां
प्रीती जे उपजे तयेकरुनियां सेवूं सदा अमृता ॥ २ ॥

## ( १८ ) पद.

जिवा कासया कष्टसि त्यजूनि तूं कृष्णचरणा ॥
जाणुनि सुरतरू जाऊनि शरण त्या
त्वरें भक्तिभावें लागी स्मरणा ॥ ध्रृ० ॥

रोमत्वचा नाडि मांस अस्थि यांची काया ॥
मीच म्हणूनि मिरविसी हीच खुळी माया ॥ १ ॥
मळमुत्र आंव यांनीं भरियेला कोठा ॥
कोटीतीर्थस्नानें कसा होसी शुद्ध मोठा ॥ २ ॥
क्षुधा-तृषा-मैथुनादि आकळति प्राणा ॥
नेणुनि कां विसरसि गोकुळीचा राणा ॥ ३ ॥
आकुंचन संप्रसारण करिती वायुचेष्टा ॥
मनेंद्रियां तया धरि क्रिया भोगापेष्टा ॥ ४ ॥
काम क्रोध लोभ रिपू व्यापि देह घट नभा ॥
टाकूनि स्थुलभाव हा ओळखी चित्प्रभा ॥ ५ ॥
सत्त्वीं मन बुद्धि अहं रज तम उठवी लाटा ॥
सूक्ष्म साक्षी होऊनियां धरी मोक्ष वाटा ॥ ६ ॥
श्रीकृष्ण कारणीं ध्यात पाहीं स्वस्वरूपा ॥
सर्व ब्रह्म अन्वयेंहि होई सुखी बापा ॥ ७ ॥
सर्वात्मक ध्यान भक्ति जोडी मग संपदा ॥
गुरुकृपें ही कृष्णरूपीं जाई विष्णुपदा ॥ ८ ॥

## ( १९ ) पद.

श्रीरामा ! कृपादृष्टि पाहीं, दयादृष्टि पाहीं ॥ धृ० ॥
दर्शन घ्याया लोलुप हें मन, शक्ति नसे देहीं ॥ १ ॥
पातकराशीमाजि वेष्टिलों, पुण्य गांठिं नाहीं ॥ २ ॥
नाम न ये मुखीं, रूप न चित्तीं विरागही कांहीं ॥ ३ ॥
निराश होउनि निजल्या जागीं दीनवाणि बाहीं ॥ ४ ॥
सद्गुरुसन्निध कींव ऐकण्या, येउनि तूं राहीं ॥ ५ ॥
हांकेसरसें अपूर्व दर्शन, देशी लवलाहीं ॥ ६ ॥

## ( २० ) अभंग.

धन्य धन्य तुका दिसे । मोक्ष घरा आणिलासे ॥ १ ॥
भाव हीन दुराचारी । घेतो सुखें तो पदरीं ॥ २ ॥
म्हणे घ्यारे नाम तुम्ही । चला त्वरें निजधामीं ॥ ३ ॥
योग याग वाराणशी । यात्रा वारी नामापाशीं ॥ ४ ॥

[ ज्या अभंगावरून वरील विचार सुचले तो तुकाराममहाराजांचा अभंगः—
हो कां दुराचारी । वाचे नाम जो उच्चारी ॥ १ ॥
त्याचा दास मी अंकित । काया वाचा मनें सहित ॥ २ ॥
नसो भाव चित्तीं । हरीचे गुण गातां गीतीं ॥ ३ ॥
करी अनाचार । वाचे हरिनाम उच्चार ॥ ४ ॥
हो कां भलतें कुळ । शुचि अथवा चांडाळ ॥ ५ ॥
म्हणवी हरीचा दास । तुका म्हणे धन्य त्यास ॥ ६ ॥ ]

## ( २१ ) पद.

मधुर, मधुर, मधुर बहु, मुरली तूझी रे ! । हरी ! मुरली तूझी रे ! ॥ धृ० ॥
कर्णरंध्रिं नाद रिघुनि, हरत ताप रे ! । हरी ! हरत ताप रे ! ॥ १ ॥
चित्त शांत करुनि त्वरें स्वसुख देत रे ! । हरी ! स्वसुख देत रे ! ॥ २ ॥
शंकरसुत ताल धरुनि, प्रेमें ध्यात रे ! । हरी ! प्रेमें ध्यात रे ! ॥ ३ ॥

## ( २२ ) पद.

विठोबा मज तारिं तारिं । दीनावरी कृपा करीं ॥ धृ० ॥
वारी व्रत एकादशी । घरींच तूं घडविशी ॥ १ ॥
दत्त तूंचि, राम तूंचि । देव देवता सर्वही तूंचि ॥ २ ॥
भावें गातां सद्गुरू आई । भेट देसी बसल्या ठायीं ॥ ३ ॥
विप्र, राजे, वाणि, माळी । साक्ष देती कसाई कोळी ॥ ४ ॥

## ( २३ ) पद.

रामस्रूपीं मन लावा । रामाचि होऊनि राम हा भजावा ॥ धृ० ॥
रामनाम घेतां, रामगूण गातां । 'अहं' तोहि त्यजावा ॥ १ ॥
राम परब्रह्म, राम सर्वसाक्षी । शुद्धें मनेंचि पहावा ॥ २ ॥
राम गुरू भिन्न भासती डोळां । एक परी उमजावा ॥ ३ ॥
रामकृपें तरी शंकरचरणीं । राघवभाव धरावा ॥ ४ ॥

## ( २४ ) पद ( राष्ट्रीय प्रार्थना ).

तयांवरि करीं तूं दया । गिरिजापतिराया ! ॥ धृ० ॥
साधु संत जे शूर महात्मे । झटती सुख द्याया ।
दे यश त्यांतें प्रभो शंकरा ! । जगता सुख व्हाया ॥ १ ॥
ऋषिमुनि जेथें जन्मा आले । रामकृष्णहि जिथ अवतरले ।
रामराज्य तिथ संस्थापाया । आलों येथें तव गुण गाया ॥ २ ॥
कलह सकलही निरसूनि जावो । सत्य अहिंसा उदया येवो ।
उत्कर्षाचा अंकुर उगवो । प्रार्थना अशी तव पदीं राया ॥ ३ ॥
पुत्रवत् प्रजा-पालन व्हावें । मतभेदाचें मूळ न रहावें ।
हिंदभूमिच्या सात्विक सेवें । अर्पावी जनिं धनमन काया ॥ ४ ॥

## ( २५ ) पद ( उद्धव-गोपी-संवाद ).

उद्धवजी ! तुम्हि सत्वरि सांगा कैसा आहे हरी ? ।
संहारुनि जो निजतापातें रक्षण अमुचें करी ॥ धृ० ॥
खातांपीतां उठतबैसतां नाहीं देहाभान ।
श्रीरंगाकडे वेधुनि गेलें सर्वहि अमुचें ध्यान ॥
कर्ण न ऐके त्वचा न स्पर्शे दृष्टि न देखे कांहीं ।
जिव्हा न चाखे घ्राण न हुंगे वाणी न बोले पाहीं ॥

सदय प्रभू हा निर्दय झाला जातो अमुचा प्राण ।
विरहदु:ख हें साहुं शकेना घेतों तुमची आण ॥
म्हणुनि विनवितों सलगी करुनी बाया आम्ही जरी ।
वदा वदा हो कैसा आहे अमुचा कैवारी ॥ १ ॥
भिऊं नका तुम्हि सुखरुप आहे अपुला श्रीभगवान् ।
तुम्हां अम्हांसी सांभाळी जो देउनि तें निजज्ञान ॥
अवला जरि तुम्हि प्रबला केल्या असतां गुरुबोधें ! ।
समाधान तें पावाना कां चित्ताच्या रोधें ? ॥
वैराग्याभ्यास हीं मुख्य साधनें ज्ञानयोगाचीं ।
यमनियमही साधुनि सोडा इच्छा भोगाची ॥
युक्ताहारविहारहि करुनी निद्रेसी आंवरा ।
विक्षेपाचा नाश कराया प्रत्याहार करा ॥
प्रिय भगिनींनो ! मग तुम्हि होउनि स्वरुपाची खाण ।
समाधियोगें जाळुनि टाका संचितक्रियमाण ॥ २ ॥
पुरे पुरे हो ! पुरे बंधुराज ! जोग्यांचा एकांत ।
भोळ्याभाळ्या वनितांना तो गोड रमाकांत ॥
हरीनामगुणनृत्य जाळी पुण्य आमुचें साफ ।
विरहरसें तुम्हि पहा कसें हो भस्मचि झालें पाप ॥
यत्नाविण हें सर्वचि झालें कां अष्टांग खटपट ।
शास्त्रज्ञांसी सुखें बसों द्या घेउनि तो घटपट ॥
मुक्तीदाता सगुणब्रह्म जो स्वामी जगताचा ।
शिरीं असतां मुकुंद अमुच्या धाक कोणाचा ? ॥
ज्ञानाचा जो अंत तयासी म्हणतां तुम्हि वेदांत ।
नलगे आम्हां स्पष्ट सांगतों भक्तिसुखें आम्हि शांत ॥ ३ ॥

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५४३४

धन्य धन्य हो ! धन्य अती तुम्हि गोकुलवासि स्त्रिया ।
अवतरलासे पूर्णब्रह्म हा तुम्हां सुख द्याया ॥
अभ्यासापरि भक्तियोग हा आहे कैसा थोर ।
शिकविला तुम्हीं म्हणवुनि स्मरतों भिल्लिणिचें तें बोर ॥
भाग्यशालिनी सती द्रौपदी वाटे ती बहु गोड ।
माधवासि जिनें फाडुनि दिधली त्रैलोक्याची जोड ॥
अशा कितीतरि युवतिसमूहें लाजविलें आम्हां ।
ज्ञानयोगियां, तोषवुनी तुम्हिं पुरुष उत्तमा ॥
श्रीकृष्णें मज धाडियलें येथ मद्गर्व हराया ।
नमन करितों क्षमा करा तुम्हिं प्रभुच्या दासा ह्या ॥ ४



# परिशिष्ट चवथें.

## प्रवचनांचे नमुने.

श्री भाईंचीं प्रवचनें किती प्रेमळ, विचारपरिप्लुत आहेत, व वेदांता-सारखा गहन विषय आबालवृद्धांस सुलभ करून सांगण्याची त्यांची शैली कशी होती ह्याची अटकळ करितां यावी म्हणून नमुन्यादाखल त्यांचीं दोन प्रवचनें पुढें दिलीं आहेत.

### १. ज्ञानदाता सद्गुरु व तत्त्वज्ञानी.

आजपर्यंत ह्या विषयावर अनेक प्रवचनें झालीं आहेत व त्यांत श्रुति, स्मृति, पुराण व संतवचनांचे आधार व तसेच इतर धर्मांचे आधार देऊन असें प्रस्थापित करण्यांत आलें कीं सद्गुरूपासून आत्मस्वरूपाचें ज्ञान होण्यास भाव हें प्रधान साधन आहे. श्रीशंकराचार्यांनीं श्रद्धाभाव ह्याची व्याख्या केली आहे ती अशीः—

**शास्त्रस्य गुरुवाक्यस्य सत्यबुद्ध्यवधारणम् ।**
**सा श्रद्धा कथिता सद्भिर्यया वस्तूपलभ्यते ॥**

सद्गुरूवर व शास्त्रावर पूर्ण विश्वास ठेवून त्याप्रमाणें वर्तन करणें ह्याला भाव किंवा श्रद्धा म्हणतात, आणि ज्याच्या अंगीं अशी श्रद्धा असेल त्यालाच आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचा लाभ होतो.

शास्त्राचा खरा अर्थ समजण्यास व पुढें आत्मज्ञान होऊन तें बाणण्यास सत्संगतींत श्रवण करणें हेंच उत्तम साधन आहे. म्हणून याज्ञवल्क्य आपल्या पत्नीस उपदेश करतात कीं:—

**आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मंतव्यः निदिध्यासितव्यः ।**

सद्गुरु सर्वज्ञ असल्यामुळें ते देश, कालमान वगैरे परिस्थिति लक्षांत घेऊन व शिष्याची योग्यता जाणून त्याला बोध करतात. निरनिराळे आचार्य होऊन गेले, त्यांनीं अद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत असे निरनिराळे सिद्धांत प्रतिपादन केले, तरी त्या सर्वांचा स्वरूपबोध एकच होता. शिष्याचा अधिकार पाहून सद्गुरु त्याला शास्त्राचा अर्थ सांगतात:—

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्र विधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥—भ. गी.**

कार्य कोणतें, अकार्य कोणतें हें शास्त्र सांगतें परंतु शास्त्राचा खरा हेतु काय हें सद्गुरुमुखानेंच समजतें. म्हणून शास्त्राचा खरा अर्थ काय आहे हें सद्गुरूपासून समजून घेऊन त्याप्रमाणें आचरण करावें हा उत्तम मार्ग. यज्ञयाग करावे, तीर्थयात्रा कराव्या, दानधर्म करावा वगैरे शास्त्र सांगतें. परंतु श्रीबाबा सांगतात कीं:—'यज्ञयाग ते दानधर्म ही । वेदशास्त्राच्या पडुं नको भरी ॥' परंतु कोणाला हें सांगतात ? ज्याला ज्ञान पाहिजे त्याला. त्यानें चित्तशुद्धि होण्याकरितां नियत कर्में निष्काम बुद्धीनें करून तीं ईश्वरार्पण करावीत. असें केलें असतां पूर्ण चित्तशुद्धि झाली म्हणजे सद्गुरुकृपेनें त्याला ज्ञानाचा बोध होईल. परंतु ज्याला विषय-सुख पाहिजे, त्यानें यज्ञयाग, तीर्थयात्रा, दानधर्म वगैरे करावे. शास्त्राचा हेतु हाच आहे कीं प्रत्येकानें निष्काम बुद्धीनें कर्में करून तीं ईश्वरार्पण करावींत आणि ज्ञान प्राप्त करून घेऊन मुक्त व्हावें. पण तसें सर्वांना करितां येत नाहीं. म्हणून त्यांच्याकरितां सकाम कर्में सांगितलीं आहेत. तीं कर्में करून विषयसुख भोगून कंटाळा आल्यावर त्यांचें निष्काम कर्मांकडे आपो-आप लक्ष जाईल आणि निष्काम बुद्धीनें कर्में करून तीं ईश्वरार्पण करून त्यांची बुद्धि विशुद्ध झाली म्हणजे योग्य वेळीं त्यांना सद्गुरु आत्मस्वरूपाचा बोध करतील.

आतां सद्गुरूची आवश्यकता कां आहे ह्या प्रश्नाचा आपण विचार करूं. शिष्याची मति प्रगल्भ नसल्यामुळें त्याला सारासारविचार करितां येत नाहीं आणि आपल्याला कोणता उपाय फायदेशीर होईल हें त्याला ठरवितां येत नाहीं. सद्गुरूवांचून दुसऱ्या कोणालाहि हें ठरवितां येणार नाहीं. उदाहरणार्थ, एका सत्पुरुषाच्या घरीं श्रवणास बरीच मंडळी येत असे. एके दिवशीं प्रवचन आटोपल्यावर सर्व मंडळी निघून गेली, पण एक गृहस्थ त्यांच्या-बरोबर बोलत बसले. इतक्यांत श्रोत्यांपैकीं एकजण तेथें आला आणि महाराजांस म्हणाला कीं, 'आपण प्रवचनांत जो उपाय सांगितला तो मला उत्तम वाटतो, आणि त्याप्रमाणें आचरण करण्याचा मीं निश्चय केला आहे.' सद्गुरूनें त्याच्या तोंडाकडे पाहिलें आणि म्हटलें कीं, 'अरे, प्रथम तूं आईबापांची व इष्टमित्रांची संमति घे आणि बुद्धीची पूर्ण खात्री झाल्यावर काय करावयाचें असेल तें कर. घाई करण्याचें प्रयोजन नाहीं.' तो गेल्यावर दुसरा एक श्रोता तेथें आला व गुरूस वंदन करून म्हणाला कीं, 'मीं वर्षप्रतिपदेपासून आपल्या उपदेशाप्रमाणें आचरण कर-ण्याचा निश्चय केला आहे; कारण चांगली गोष्ट सुरू करण्यास शुभ मुहूर्त असला म्हणजे त्यांत सिद्धि येते.' 'त्यावर गुरु म्हणाले कीं, 'चांगली गोष्ट करावयाची असली म्हणजे वेळ फुकट घालवूं नये, कारण 'शुभस्य शीघ्रं' असें शास्त्र म्हणतें.' गुरुजीजवळ बसलेला तो गृहस्थ हें संभाषण ऐकत होता, त्याला त्यांचें म्हणणें जरा विसंगत वाटलें. कारण, जो म्हणाला कीं मीं आजपासून तुम्हीं सांगितल्याप्रमाणें आचरण करण्यास सुरवात करितों, त्याला गुरुजींनीं सांगितलें कीं घाई करण्याचें कारण नाहीं; आणि जो म्हणाला कीं मी वर्षप्रतिपदेपासून सुरवात करणार आहें, त्याला त्यांनीं सांगितलें कीं वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं—'शुभस्य शीघ्रं' हा उत्तम मार्ग. तेव्हां त्यानें गुरुजीसच प्रश्न केला कीं, 'जो तयार होता त्याला

आपण सांगितलें कीं घाई करूं नको, नीट विचार करून काय करावयाचें तें कर; आणि जो तयार नव्हता त्याला आपण सांगितलें कीं तूं ताबडतोब करण्यास सुरवात कर. हें परस्परविरोधी जें आपण सांगितलेंत त्याचें इंगित काय हें मला कृपा करून सांगा.' त्यावर गुरुजींनीं उत्तर दिलें कीं, 'पहिल्यानें जो आला होता तो चंचल बुद्धीचा व अविचारी आहे हें मीं जाणलें. प्रवचनाच्या वेळीं मी जें कांहीं बोललों तें त्यानें अर्धवट कांहीं तरी ऐकिलें असेल, आणि त्याच्या आईबापांनीं किंवा इष्टमित्रांनीं त्याला थोडासा विरोध केला तर तो सुरू केलेला क्रम ताबडतोब सोडून देईल. व्यंकू नांवाचा एक नोकर माझ्या माहितीचा आहे त्याच्यासारखा तो आहे. एकदां असें झालें कीं उद्यां व्यंकूला कांहीं कामाकरितां गांवास पाठवावयाचें आहे असें त्याच्या धन्यानें आपल्या बायकोस सांगितलें, तें त्यानें अर्धवट ऐकिलें. व्यंकू मोठा आज्ञाधारक होता, म्हणून तो दुसऱ्या दिवशीं पहाटेस उठून गांवास जावयास निघाला. सकाळीं धनी उठल्याबरोबर गांवास काय काम आहे तें व्यंकूस सांगावें म्हणून तो त्याला हांका मारूं लागला तों व्यंकूचा पत्ता नाहीं. इकडे दोन प्रहरच्या सुमारास व्यंकू गांवास पोहोंचला तेव्हां त्याच्या लक्षांत आलें कीं मी येथें काय काम करावयाचें आहे तें धन्यास न विचारितां इकडे वेड्यासारखा निघून आलों. अर्थात् त्याला परत घरीं यावें लागलें. संध्याकाळीं घरीं पोहोंचल्यावर धन्यानें त्याला विचारिलें कीं, अरे, तूं कोठें होतास ? आम्ही तुला शोधून दमलों. तेव्हां व्यंकू म्हणाला कीं, काल रात्रीं आपण बाईसाहेबांना काय सांगितलें तें मीं ऐकलें होतें. पण काय काम करावयाचें तें विचारून न घेतां मी पहाटेस उठून तडक गांवाला जाण्यास निघालों आणि तेथें गेल्यावर मीं केवढी घोड्याएवढी चूक केली हें माझ्या लक्षांत आलें, व मी तसाच परत आलों. तो पहिला शिष्य ह्या व्यंकूसारखा आहे. आज अभ्यासाला सुरवात करील व

उद्यां सोडून देईल. परंतु दुसरा शिष्य दीर्घसूत्री आहे. तो म्हणतो कीं मी वर्षप्रतिपदेस अभ्यासास सुरवात करीन; पण कोणती वर्षप्रतिपदा हें मात्र नक्की सांगत नाहीं. अशा कितीतरी वर्षप्रतिपदा येऊन गेल्या तरी त्याची सुरवात होणार नाहीं, म्हणून मी त्याला 'शुभस्य शीघ्रं' ह्या म्हणीप्रमाणें करण्यास सांगितलें.' सारांश, सद्गुरूला ह्या सर्व गोष्टी ठाऊक असतात, म्हणून शिष्यांच्या अधिकाराप्रमाणें त्यांना त्याला योग्य साधन सहज सांगतां येतें. एकाद्या शिष्यामध्यें रजोगुण प्रधान असेल, तर त्याला तीर्थयात्रा अष्टांग योगादि साधनें सांगण्यांत येतात. नामस्मरण हें साधन सुलभ असून उत्तम आहे, तरी तें त्याला सांगत नाहींत, कारण हें साधन करण्यास सत्त्वगुणी बुद्धि पाहिजे. ह्या साधनानें कार्य लौकर होईल, पण तें रजोगुणी मनुष्याला साधणार नाहीं. परंतु तीर्थयात्रादि वर सांगितलेलीं साधनें करून त्याचा रजोगुण गेल्यावर गुरु त्याला नामस्मरण साधन करावयास सांगतात. ह्याकरितां गुरु अवश्य केला पाहिजे असें शास्त्र सांगतें:—

जो माया नियंता ईश्वर। पाळी स्वकृपें जो चराचर।
तो सकळांचा आधार। जन्मोनि त्यातें जाणावें॥

तया जाणावयाचें ज्ञान। तें सद्गुरुमुखें करावें श्रवण।
सत्त्वत्व आपलें पाऊन। सुख संपन्न होईजे॥

सद्गुरुकृपेचें ज्ञान नाहीं। तो जाणावा केवळ पशुदेही।
जन्मोनी वांयां गेला पाहीं। तो न तरी डोहीं भवाच्या॥

गुरुविमुख जो प्राणी। तो खरच केवळ जन्मोनी।
स्नान कीजे त्या दरूपणीं। पापखाणी तो जन्म भोगी॥

अनेक साधनीं तो तपाला। उदंड अभ्यासें ज्ञान पावला।
अत्यंत मान्यतेसी जरी आला। सेखीं वांयां गेला गुरुवीण॥

—दत्त प्रबोध.

सद्गुरूच्या आवश्यकतेसंबंधानें आधुनिक सत्पुरुष होऊन गेले त्यांपैकीं स्वामी विवेकानंद म्हणतात:—"अज्ञाननिद्रेंत घोरत असलेल्या मानवाला जागा करण्यास जो सदैव जागृत असतो अशा महात्म्याकडूनच स्फूर्ति आली पाहिजे. त्या स्फूर्तीचा त्या अज्ञानी मनुष्याच्या बुद्धीवर असा परिणाम होतो कीं त्याच्या आध्यात्मिक उन्नतीस तेव्हांपासून आरंभ होतो. त्याची मति शुद्ध होते, व शेवटीं त्याला ज्ञानाची पूर्ण प्राप्ति होते. ही चलनशक्ति दुसऱ्या आत्म्यापासूनच आली पाहिजे. ती पुस्तकें वाचून किंवा दुसऱ्या कोणत्याहि साधनांनीं कधींच प्राप्त व्हावयाची नाहीं. जन्मभर आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या पुस्तकांचा जारीनें अभ्यास केला तर बुद्धीचा विकास होईल, पण आत्मनिरीक्षण केलें असतां अध्यात्माच्या बाजूनें त्याची मुळींच प्रगति झाली नाहीं असें शेवटीं दिसून येईल. ज्या मानानें बुद्धीचा विकास होतो त्याच मानानें मनुष्याची आत्मदृष्टीनें उन्नति होते असें मानणें चुकीचें आहे."

आतां सद्गुरु कसा असावा व त्याच्या अंगीं कोणते गुण असावेत ह्याचा आपण विचार करूं. मागल्या एका प्रवचनांत सद्गुरूच्या अंगीं दोन मुख्य गुण अवश्य असले पाहिजेत असें सांगण्यांत आलें होतें. ते हे कीं, सद्गुरूला शास्त्राची माहिती पाहिजे व त्याला ब्रह्मविद्येचें पूर्ण अनुभवजन्य ज्ञान अवगत असलें पाहिजे:—'श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्'; 'ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः'; 'शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम्'; 'शब्दज्ञाने पारंगत। ब्रह्मज्ञाने सदा डुल्लत। शिष्य प्रबोधनीं समर्थ। तो मूर्तिमंत स्वरूप माझें॥'. ह्या दोन गुणांखेरीज जगताचा उद्धार करण्यास आणखी कांहीं गुण असावे लागतात. ह्या संबंधानें रामदासस्वामी म्हणतात:—

**मुख्य सद्गुरूचें लक्षण। आधीं पाहिजे विमल ज्ञान।**
**निश्चयाचें समाधान। स्वरूप स्थिति॥**

याहीवरी वैराग्य प्रबळ। वृत्ति उदास केवळ।
विशेष आचारें निर्मळ। स्वधर्म विषईं ॥—दासबोध

सद्गुरूचें वैराग्य इतकें कडकडीत असतें कीं कसाहि प्रसंग आला तरी त्यांत चलबिचल होणें शक्य नाहीं, तरी लोकसंग्रहाकरितां ते वैराग्यानें व स्वधर्माप्रमाणें वागण्यास बिलकूल कसूर करीत नाहींत. त्यांनीं जर तसें केलें नाहीं, तर त्यांच्या संगतींत असणारी मंडळी त्यांचें अनुकरण करण्यास कमी करणार नाहींत. म्हणून जरी सद्गुरु सर्वेश्वराच्या योग्यतेस चढला तरी त्याचें आचरण एकाद्या साधकाप्रमाणें असलें पाहिजे, कारण त्यांचें आचरण असेल त्याप्रमाणें इतर लोक वागतात:—

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरोजनः।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥—भ. गी.

याहिवरी अध्यात्मश्रवण। हरिकथानिरूपण।
जेथें परमार्थविवरण। निरंतर ॥ —दासबोध

शिवाय त्यांच्या मंदिरांत वेदांताच्या घटपटादि शुष्क विषयांवर विवेचन होत नसतें. नामस्मरणाचा महिमा, भगवंताच्या लीला व कथा यांवरच निरूपण होत असतें. त्या श्रवणेंकरून तेथें येणाऱ्या श्रोते मंडळीचें चित्त शुद्ध होतें व त्यांच्या अंगीं ज्ञान प्राप्त करून घेण्याची योग्यता येते:—

जेथें सारासार विचार। तेथें होय जगदोद्धार।
नवविधा भक्तीचा आधार। बहुताजनांसी ॥
म्हणोनि नवविधा भजन। जेथें प्रतिष्ठिलें साधन।
हें सद्गुरूचें लक्षण। श्रोतीं ओळखिजे ॥
अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान। बाह्यनिष्ठेचें भजन।
तेणें बहुत भक्तजन। विश्रांति पावती ॥
नाहीं उपासनेचा आधार। तो परमार्थ निराधार।
कर्मेंविण अनाचार। भ्रष्ट होती ॥—दासबोध

ज्ञान झाल्यावर तें जतन करण्यास साधक जर वर्णाश्रमधर्म पाळून श्रवणकीर्तनादि भक्ति करणार नाहीं तर तो भ्रष्ट होईल आणि ज्ञान संपादन करण्यासाठीं त्यानें केलेले सर्व श्रम फुकट जातील. अशा सद्गुरूच्या संगतीचा ज्याला लाभ होतो, त्याचा उद्धार व्हावा म्हणून ते अहर्निशीं चिंता वाहतात. जीवांचा उद्धार करणाऱ्या सद्गुरूचे आपणावर फार उपकार होतात असें भगवान् स्वतः मानतात आणि 'मी आज्ञावर्ती गुरूचा' असें ते मोठ्या आनंदानें म्हणतात. अशा ज्ञानदात्या सत्पुरुषाचा जर कोणीं छळ केला तर तो भगवंताला बिलकुल सहन होत नाहीं:—

**तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥**—भ. गी.

अशा छळ करणाऱ्याला भगवान् अशी घोर शिक्षा करतात. परंतु त्या छळ करणाऱ्याविषयीं संतांच्या मनांत कसलाहि वाईट विचार येत नाहीं. उदाहरणार्थ, जीभ जर दांताखालीं चावली गेली, तर जसे कोणी दांत पाडीत नाहींत, तसे संत सर्वांना आत्मत्वभावानें पाहतात म्हणून छळ करणाऱ्याला शिक्षा करण्याचा विचार त्यांच्या मनांत कधींच येत नाहीं. संत इतके दयाळू असतात कीं कोणी त्यांना ठार मारण्याच्या हेतूनें त्यांच्या अंगावर धावून आला तरी ते त्याचा प्रतिकार करीत नाहींत.

**नाना सद्विद्येचे गुण । याहिवरी कृपाळुपण ।**
**हें सद्गुरूचें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥**—दासबोध

सद्गुरूच्या अंगीं जर कृपाळुत्व हा गुण नसेल तर त्याच्याकडून बोध करण्याचें कार्यच घडणार नाहीं. मातेचें मुलावर अतोनात प्रेम असतें म्हणून तिच्या हातून त्याचें उत्तम संगोपन होतें. तद्वत् गुरूच्या कृपाळुत्वामुळेंच शिष्याला स्वरूपानंदाचा अनुभव प्राप्त होतो.

सद्गुरूची कृपा होण्यास शिष्याच्या अंगीं मुख्य वैराग्य पाहिजे. वैराग्या-शिवाय कृपा होणें शक्य नाहीं:—

उद्धवा ! जेथ अनुताप नाहीं। तेथ माझी कृपा नव्हे कांहीं।
कृपेचें वर्म हेंचि पाहीं। जैं अनुताप देहीं अनिवार ॥—ए. भा.

त्याचप्रमाणें शिष्याची सद्गुरूच्या ठिकाणीं निश्चल भक्ति व प्रेम असलें पाहिजे. ती भक्ति व प्रेम येण्यास सद्गुरूचीच प्रार्थना करावी. ते कल्पवृक्ष-स्वभावाचे असल्यामुळें शिष्यानें मागावयाची खोटी, त्याची प्रार्थना ताबडतोब सफळ होते.

जाणेल जो कल्पवृक्षपणें। आणि मागेल त्यासी काय उणें।
भक्त श्रेष्ठ या गुणें। कीं जाणोनि त्याचीच भक्ति मागती त्यापाशीं ॥
हरी तुझी प्रीति मला देईं। गुरू तुझी आवडी मला देईं ॥ ध्रु. ॥
कृपाकटाक्षें पाहुनि मजकडे। अहं ममता नेईं नेईं ॥
धांवति वृत्ती चहुंकडे। त्यांसी तुजविणें न दिसो कांहीं कांहीं ॥

नामदेव विठोबापाशीं हेंच मागतात:—

जेथें जेथें मन जाईल हो माझें। तेथें तेथें तुझें रूप असो ॥
ऐसी मज संवई लावि निरंतरीं। जन्मोजन्मांतरीं केशी राजा ॥

दुसऱ्या एका अभंगांत ते म्हणतात:—

नामा म्हणे माझे सांवळे विठाई। संचरोनी राहीं हृदयामाजी ॥

दुसरे एक संत देवाजवळ हेंच मागतात:—

बुद्धिस्थानीं मूर्ति प्रगटूनी। हृदयीं सुस्थिर राहीं राहीं ॥
निज दासाचा हाच मनोरथ। पुरवुनी सेवा घेईं घेईं ॥

सारांश, शिष्याच्या अंगीं वैराग्य व शुद्ध सत्त्वगुण असला कीं त्याला ज्ञान होण्यास वेळ लागत नाहीं:—

विशुद्धसत्त्वस्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः।

ज्ञान झाल्यावर साधकानें श्रवणकीर्तनादि नवविध भक्ति करण्याचा क्रम चालू ठेविला, तर तो योगभ्रष्ट होण्याची भीतीहि राहत नाहीं.

कित्येक सत्पुरुष ज्ञानी असूनहि त्यांना इतरांना बोध करितां येत नाहीं, कारण त्यांची वृत्ति स्वरूपांत इतकी लीन होऊन गेलेली असते कीं ते सदा सर्वकाळ जडमूढ अशा स्थितींत पडलेले असतात. अशा योग्यांचा जगतास कांहींच उपयोग होत नाहीं. नुसता शब्दज्ञानी हा ज्ञानी नव्हेच. तो स्वतःचा किंवा दुसऱ्यांचा उद्धार करूं शकत नाहीं:—

> जेवीं अमृत म्हणतां । चवी न लभे गा सर्वथा ।
> तेवीं शब्दशाब्दिक ज्ञान योग्यास अनुभव वार्ता । स्वयें नुपजे ॥

आत्म्याचे नुसते गुणधर्म जाणणें याला अनुमान म्हणतां येईल. तेणेंकरून आत्मा प्रत्यक्ष ओळखिला जात नाहीं. म्हणून त्याला आत्मसाक्षात्कार म्हणतां येत नाहीं:—

> कीं जड तत्त्वें भेद तिहीं गुणांचे । स्वयें यातें प्रकाश केंचे ।
> ऐसें असोनि प्रकाश यांचे । दिसती जगाकरितां तो आत्मा स्वप्रकाश ।
> ऐसें जड आणि जड प्रकाशक ज्ञान । हें नव्हे अपरोक्ष हा अनुभव ॥

असलें शाब्दिक ज्ञान:—' न सुखं न परां गतिम् '—सुख किंवा उत्कृष्ट गति देऊं शकत नाहीं:—

> जेणें स्वयें चाखिली नाहीं चवी । तो दुजयातें गोडी केंवी लावी ।
> यालागीं जो पूर्णानुभवी । तो तारी सच्छिष्यासी ॥
> एवं गुरुपणाची वंदती । असे बहुपणें नांदती ।
> जो करी अपरोक्षप्राप्ती । त्यातें म्हणती सद्गुरु स्वामी ॥—ए. भा.

मंत्र देणारे, कलाकौशल्यादि शिकविणारे, नाना सिद्धि प्राप्त करून देणारे असे उदंड गुरु आहेत, परंतु अपरोक्षानुभव देणारे व शिष्यांच्या भवबंधनाच्या बेड्या तोडणारे जे तेच मात्र खरे सद्गुरु जाणावे. शिष्य जमा करून आपला चरितार्थ चालविणारे गुरु पुष्कळ आहेत:—

शिष्य बहु गुरू मेळविती परि दुर्लभ जो जगिं शिष्य करी ।
ब्रह्मचि होऊनि शिष्य उरे तरि ते खुण शिष्यपणाचि खरी ॥
मंत्रहि देतिल जे शिकवितील नाटक काव्य कलाकुसरी ।
तेहि गुरु परी सद्गुरुवांचुनि शिष्यपणाचि उरेचि उरी ॥—वा. पं.

ज्याच्या शब्दमात्रेंकरून शिष्याला परब्रह्माचा साक्षात्कार होतो, तो सद्गुरुः—' ज्याचेनि वाक्यें असंतता । निःशेष पावते तत्त्वतां । त्यासीच गा सद्गुरुता । वेदशास्त्रार्थी तत्त्वता प्रतिपाद्य ॥ ' असा सद्गुरु ' दुःख असत्य आहे ', ' प्रपंच मिथ्या आहे इतकेंच शिष्याच्या प्रत्ययास आणून राहत नाहीं, तर हा मिथ्या व मोहकारी प्रपंचच सत्य व सुखपूर्ण म्हणजे ब्रह्म आहे असेंहि त्याच्या अनुभवास आणून देतोः—

दुःख असत्य अनात्म निषेधुनि । सत्य सुखात्मपणें उरवी ॥
दुःख असत्य अनात्म मृगांबुहि तो करि सत्य सुखात्म रवी ॥

बरें, असा अनुभव देऊन आपण एक मोठें कार्य केलें असें तो मानतो काय ? बिलकुल नाहीं. खरा सद्गुरु जो कीं:— ' तो सुखकल्पतरू जो जगिं देह विदेहपणें मिरवी ॥ ' कांहीं लोकांना संपत्तीचा मद चढतो, कांहींना विद्येचा गर्व असतो, व कांहीं लोक सरकाराकडून मिळालेल्या बहुमानाच्या पदव्या व किताब ह्यांचा अभिमान बाळगतात. परंतु सद्गुरु सर्व दृश्य वस्तूंचा, इतकेंच नव्हे तर देहाचाहि अभिमान सोडून जगांत वर्तत असतात. सद्गुरु हा आत्मसुखाचा जणू वृक्षच आहे असें जाणून त्याच्या छायेखालीं संसारतापानें त्रस्त झालेले जिज्ञासु व साधक सुख पावतात. अशा सद्गुरूचे चरण सेवावे असा तुकाराममहाराज कळकळीचा उपदेश करतातः—

सद्गुरुवांचूनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधिं आधीं ॥
आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळ वेळ तयांलागीं ॥

हें कार्य मंत्रतंत्र देणाऱ्या गुरूकडून कधींहि होणार नाहीं. सद्गुरूजवळ उधार खातेंच नाहीं. उलट सद्गुरूच्या कृपेनें पहिल्यानें शिष्याला अनुभव येतो आणि मग त्याच्या कानांत शब्द पडतात:—‘ आगे जात गोली। पिछे होत आवाज ॥ ’

सद्गुरु व इतर अनुभवी ज्ञानी ह्यांच्या देहप्रारब्धाविषयीं थोडी माहिती असणें जरूर आहे, कारण केव्हां केव्हां व्यक्तीसाठीं परमार्थ साफ बुडण्याचा संभव असतो. प्रत्येक सत्पुरुषाचें देहप्रारब्ध भिन्नभिन्न असतें आणि त्यावरून त्याची ब्रह्मविद्येंत किती प्रगति झाली आहे व त्याचा अनुभव कोणत्या दर्जाचा आहे ह्याचें अनुमान करितां येणार नाहीं. एखादा योगी पूर्ण अनुभवी असून त्याचें वर्तन एखाद्या लहान मुलासारखें असूं शकेल:—

एकाचें शुद्ध ब्रह्मज्ञान । वस्तु देखोनि विरालें मन ।
मावळलें द्वैताचें भान । पडिलें मौन चहूं वाचां ॥
इंद्रियें टवकारिलीं समस्त । प्राण पांगुळला जेथींचा तेथ ।
वस्तु देखोनियां परमाद्भुत । पडलें ताटस्थ देहभावा ॥

असा योगी स्वतः मुक्त होईल, पण त्याच्या हातून जगदुद्धाराचें काम होणार नाहीं. तो गुरु होण्यास योग्य नाहीं. जो सद्गुरूला शरण जातो, तो निर्भयच होतो. कारण ‘ अभयं ’ हें दैवी संपत्तीचें पहिलें लक्षण आहे. हें अभय अशा सत्पुरुषाला शरण जाऊन प्राप्त होणें शक्य नाहीं. कोणाचें प्रारब्ध अशा तऱ्हेचें असतें:—

एका अनुभवा आलें ब्रह्म । फिटला बाध्यबाधकतेचा भ्रम ।
मोडलें द्वैतभावाचें कर्म । जगीं विषम असेना ॥
परी अचुंबित वर्तणें । अघटमान कर्म करणें ।
अत्यंत उग्रता मिरविणें । दुर्धरपणें भयानक ॥
ऐसा जो वर्ते ब्रह्मज्ञानी । त्याची ब्रह्मस्थिती न मानें जनीं ।
मा कोण जाईल भाव धरोनी । बोधालागोनी त्यापाशीं ॥

सर्व ज्ञानी जर अशा कोटींतले असते तर जगताचा उद्धार कसा झाला असता ?

नारदानें व्यासाला भक्तिसूत्रें सांगितलीं, व्यासांनीं पुराणें लिहिलीं, शुकाचार्यानें परीक्षितीला भागवत सांगितलें. असे सत्पुरुष जर निरंतर समाधिस्थ किंवा तटस्थ स्थितींत राहिले असते, तर असले अमूल्य ग्रंथ कोठून निर्माण झाले असते ? सारांश, निर्विकल्प समाधींत सतत राहणारा योगी फक्त आपलाच उद्धार करतो. तो दुसऱ्याचा उद्धार करण्याच्या भरीस पडत नाहीं. परंतु जे ज्ञानी सविकल्प समाधीचा उपभोग घेतात, तेच सद्गुरु होण्यास व जगताचा उद्धार करण्यास योग्य असतात.

विचित्र प्रारब्ध असलेल्या योग्यांचें रंगनाथस्वामींनीं वर्णन केलें आहे तें असें:—

**जाणोनि तत्त्व मग जाणिव-भाव नाहीं ।**
**स्वानंदतृप्त सकळाशयमुक्त पाहीं ॥**

त्याच्या सर्व वासना स्वात्मसुख भोगून पूर्ण झालेल्या असतात व त्याची सर्व हळहळ, तळमळ नष्ट झालेली असते. त्याचा आत्मा 'ब्रह्मभूतप्रसन्नात्मा' झाल्यामुळें 'न शोचति न कांक्षति', आणि 'राहोऽथवा तनु पडो समता मनाला', कशीहि स्थिति प्राप्त झाली तरी त्याच्या मनाची समता ढळत नाहीं. तो वैकुंठाला जाण्यासाठीं उत्सुक नसतो व जाण्याची वेळ आली म्हणजे दुःखी होत नाहीं. त्याचें घरच वैकुंठ झालेलें असतें व तो तेथेंच ह्या देहांतच वैकुंठांतले सोहळे भोगतो. म्हणून तो वैकुंठास जाण्याची घाई करीत नाहीं. अशा ज्ञानी योग्याचा 'अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला' असें समजावें. परंतु ज्ञानदात्या गुरूचें लक्षण असें असतें:—

**स्वप्नेंद्रजालवत मायिक सर्व आहे**
**यालागिं निश्चय मनीं भ्रम कोण वाहे ।**

स्वप्रत्ययें विविध भाव अभाव गेला
अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥

अशी ज्याची स्थिति झाली आहे, त्याला आत्मस्वरूपाचें ज्ञान पूर्णपणें बाणलें आहे असें खात्रीनें म्हणतां येईल:—

ज्ञानानळें विविध संचित दग्ध झालें
वंध्याविलासवत तें क्रियमाण गेलें ।
प्रारब्ध शेष उरलें जन निश्चयाला
अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥

ज्ञानाग्नीमध्यें त्यांचें संचित दग्ध होऊन जातें आणि जसें भाजलेलें बीं रुजत नाहीं, तसें तो जीं कर्में करितो त्यांचें क्रियमाण होत नाहीं, अर्थात् त्याचें फळ त्याला पुढें भोगावें लागत नाहीं. त्याला जे प्रारब्धाचे भोग होतात, ते त्याच्या ठिकाणीं असून नसतात. लोकांच्या दृष्टीला ते सुखाचे किंवा दु:खाचे भोग वाटतात, परंतु त्याला त्यांचें कांहींच वाटत नाहीं. ज्याला अशी स्थिति प्राप्त झाली आहे त्यालाच अद्वैतबोध पूर्णपणें बाणला असें समजावें.

कोणी उदास वनवासिच खेळ खेळे
कोणीहि कर्मरत आश्रमधर्म केले ।
स्वच्छंदता रमत एक विकल्प गेला
अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥

एकादा योगी पूर्ण योगी, असतो परंतु तो कधीं कधीं एकाद्या लहान मुला-प्रमाणें खेळ खेळत असतो, किंवा दुसऱ्या एकाद्या वेड्याप्रमाणें वागत असतो.

कांहीं ज्ञानी आश्रमधर्मरत असतात. उदाहरणार्थ श्रीएकनाथमहाराजांनीं आश्रमधर्माचा नमुनेदार कित्ता घालून दिला आहे. कांहीं योगी स्वच्छंद-पणानें वागतात तर कांहीं नुसते प्रवास करीत फिरत असतात, तर कांहीं

पिशाचाप्रमाणें वागतात. कांहीं सत्पुरुष ‘अखंडित राजभद्री’ असतात. उदाहरणार्थ—जनकराजा, अमृतराय, रंगनाथस्वामी वगैरे. राजयोग भोगीत असतां त्यांनीं आपला आत्मस्वरूपाचा बोध जागृत ठेविला होता.

श्री नारायणबुवा रत्नागिरीवासी यांच्यासारखे कांहीं सत्पुरुष भिक्षुकी बाण्यानें राहतात, तर कांहीं ‘अकिंचन’ असतात, म्हणजे जवळ द्रव्य ठेवावयाचें नाहीं असा त्यांचा बाणा असतो. कांहीं योगी अत्यंत दरिद्रावस्थेंत राहतात. ते कोठें तरी उकिरड्यावर पडून असतात आणि कोणी कांहीं खावयास दिलें तर खातात, नाहीं तर उपाशींच पडून राहतात. पण ते कोणत्याहि स्थितींत असले तरी त्यांचें ज्ञान अमृतरायासारख्या राजयोग्यांसारखेंच जागृत असतें. एकदा एक श्रीमंत गृहस्थ गाडींत बसून जात असतां रस्त्याच्या बाजूस एक दरिद्री पडला होता त्याच्याकडे त्याचें लक्ष गेलें. त्याचें तेज पाहून तो कोणीतरी महात्मा असावा असें त्याला वाटलें. म्हणून त्यानें गाडी थांबविली व खालीं उतरून त्याला साष्टांग नमस्कार केला आणि आपल्या घरीं येण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. तेव्हां त्या योग्यानें त्या गृहस्थास सांगितलें कीं, तूं माझ्या वाटेस जाऊं नकोस. माझ्या प्रारब्धांत येथेंच पडून राहावयाचें आहे, तेव्हां तूं आल्या वाटेनें परत जा. जर तूं माझें ऐकणार नाहींस आणि जबरीनें मला आपल्या घरीं घेऊन जाशील तर तूं आपणास विनाकारण संकटांत घालून घेशील. त्या गृहस्थानें त्याचें म्हणणें ऐकलें नाहीं आणि मोठ्या आग्रहानें त्याला गाडींत बसवून आपल्या घरीं नेलें. तेथें त्यानें त्याला चांगलें स्नान घातलें, उंची वस्त्रें नेसावयास दिलीं, सुग्रास भोजन करविलें आणि खास आपल्या खोलींत त्याची निजावयाची सोय करून दिली. कर्मधर्मसंयोगानें त्याच रात्रीं कांहीं चोर घरावर चढून छप्परावरचीं कौलें काढून ज्या खोलींत तो योगी होता त्याच खोलींत शिरले. तो योगी जागाच होता व

नामस्मरण करण्यांत निमग्न होता. तो जागा आहे असें पाहतांच चोरांनीं त्याच्या तोंडांत बोळा घालून त्याच्या मुसक्या बांधल्या आणि त्या खोलींत असलेलीं कपाटें व पेट्या फोडून त्यांत जे दागदागिने, जडजवाहिर व रोकड मिळाली ती गोळा करून व त्या योग्याचें गांठोडें बरोबर घेऊन पळून गेले आणि त्या योग्याला नेमक्या पूर्वींच्या ठिकाणीं टाकून ते निघून गेले. इकडे सकाळीं तो गृहस्थ त्या योग्याच्या दर्शनास त्या खोलींत जाऊन पाहतो तों खोलींतलीं कपाटें व पेट्या फोडलेल्या असून त्यांतलें सामान अस्ताव्यस्त पडलें आहे आणि योग्याचा पत्ता नाहीं असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याला वाटलें कीं ज्याला आपण सत्पुरुष मानून घरांत आणून ठेविलें होतें तो बिलंदर चोर असावा आणि त्यानेंच ही चोरी करून पळ काढला असावा. पुढें तो गृहस्थ पोलिसास वर्दी देण्यास चालला असतां त्या पूर्वींच्या जागीं तोंडांत बोळा घातलेला व मुसक्या बांधून पडलेला तो योगी पाहतांच तो आश्चर्यानें थक्क झाला. त्यानें ताबडतोब त्याच्या तोंडांतला बोळा काढला आणि त्याचे बांधलेले हातपाय सोडून त्याला मोकळें केलें. तेव्हां त्या योग्यानें रात्रीं झालेला सर्व वृत्तांत सांगून म्हटलें कीं, बाबा रे, माझें प्रारब्ध उकिरड्यावर लोळण्याचें आहे, आणि तूं जर त्याच्या आड येशील तर फुकट संकटांत पडशील, असें मीं तुला पूर्वींच सांगितलें होतें. आतां मला स्वस्थ पडूं दे आणि तूं आपल्या कामाला जा. सारांश जरी भिन्न भिन्न योग्यांची बाह्य स्थिति भिन्न असली तरी त्या सर्वांची मनःस्थिति कशी असते ह्याचें पुढील श्लोकांत वर्णन केलें आहेः—

**संकल्प शून्य मग आग्रहिं भाव ठेला**
**अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥**

तो कसलाच आग्रह धरीत नाहीं, मग सत्याग्रह करण्याचें त्याच्या मनांत कसें येईल ?

जीवेश्वराऽणिक जगाप्रति एककाळें
निर्धारिलें घटमिठीं नभ जेविं खेळे।
वेदांतसंतनिजसंमत याचि बोला
अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥

ब्रह्म निर्गुण, ब्रह्म सगुण, ब्रह्म त्रिगुण ( विश्व त्रिगुण ) ह्या तिन्ही ब्रह्मांचा त्याला पूर्ण अनुभव असल्यामुळें त्याला अक्षर पुरुषाची पदवी प्राप्त होते. असा योगी कशाहि स्थितींत असला व त्याचा देह कोठेंहि असला तरी त्या परिस्थितीमुळें त्याच्या ज्ञानाला धक्का लागत नाहीं, कारण तो अधिष्ठानीं सदैव जागृत असतो:—

अधिष्ठान सिद्धासनीं क्षिप्र सिद्धी। जगद्रूप मी ब्रह्म ऐसी प्रसिद्धी।
शरीरें फिरावें उठावें बसावें। परी नित्य योगासनीं त्या असावें ॥

' घटमठीं नभ जेविं खेळे। ' ह्याप्रमाणें तो योगी जगांत वर्ततो. वेदांनीं ज्या अनुभवाचें वर्णन केलें आहे, तसाच त्याचा व सर्व संतांचा अनुभव असतो, आणि रंगनाथस्वामी वर दिलेल्या श्लोकांत म्हणतात कीं माझाहि अनुभव वेदाला व संतवचनांला धरूनच आहे.

अशा त्या दिव्य बोधाचें कोण वर्णन करूं शकेल ? आणि ज्या चैतन्य-स्वरूपाचें ज्ञान त्या बोधानें होतें त्याला जड वस्तूची उपमा तरी कशी शोभणार ?

सिंधूस सिंधुहि भास्कर भास्करातें
याहूनि चोज उपमा न दिसे तयातें।
वर्णील कोण गुणवर्जित निर्गुणाला
अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥

सारांश, अद्वैतबोध अमुक तऱ्हेचा आहे किंवा तमुक तऱ्हेचा आहे हें सांगतांच येत नाहीं.

असा योगिराज जगांत कसा वागतो ह्याचा रंगनाथस्वामींनीं पुढील श्लोकांत खुलासा केला आहे:—

हा चिद्विलास मुनिमानस हंसराणा
विश्वीं वसे परि निरंकुश गम्य जाणा।
रंगोनि भास्कर निजानुभवीं बुडाला
अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥

सामान्य लोकांसारखे सुवर्णाचे अलंकार धारण न करितां व विषयविलास न भोगतां असा योगी चैतन्याचे अलंकार परिधान करितो आणि आपल्या दिव्य बोधानंदांत सदा निमग्न असतो.

ह्या विवेचनावरून इतकेंच सार घ्यावयाचें कीं निरनिराळ्या सत्पुरुषांचें प्रारब्ध भिन्न असलें, तरी त्या सर्वांचा अनुभव एकच असतो. परंतु त्या सर्वांनाच ज्ञानाचा बोध करून शरणागतांचा उद्धार करितां येतो असें मात्र नाहीं. तसा बोध करून जगदुद्धार करणारा सद्गुरु ह्या सत्पुरुषांत श्रेष्ठ असतो हें उघड आहे.

## २. सद्भक्तिपंथ.

आत्मा सर्वजडप्रकाशक असें लोकीं बहू जाणती
जाणोनी श्रुतकीर्तनादि सगुण प्रेमा मनीं नेणती।
कोणी ते सगुणींच निष्ठ परि हा आत्मा प्रिय श्रीहरी
ऐसें भक्तिरहस्य नेणति, न हे सद्भक्ति दोहींपरि ॥—श्री वामन पंडित

आज आपण सारस्वत समाजांत जमलों आहों. ‘सारस्वत’ म्हणजे सरस्वतीची संतति. परंतु माझ्या समोर गणपति, सूर्य आदिकरून अनेक दैवतांची संतति स्त्रीपुरुषरूपानें दिसत आहे. त्यांत एक तर झरथोस्ति (पारशी) गृहस्थ मांडी घालून आदरानें श्रवण करीत आहेत. ही सर्व मंडळी सारस्वत नव्हेत काय? जरूर आहेत. आम्ही सर्वच सरस्वतीची

संतति आहोत. कारण, सरस्वती म्हणजे प्रकृति. तिच्या व पुरुष किंवा चैतन्य यांच्या संयोगांत जग झालें असें श्रुति, स्मृति, पुराण व संत प्रतिपादन करीत आहेत. भगवद्गीतेच्या १४ व्या अध्यायांतील 'मम योनिर्महद्ब्रह्म' व 'सर्वयोनिषु कौंतेय' ह्या दोन श्लोकांत श्रीकृष्णाहि अर्जुनास हेंच सांगत आहेत.

वास्तविक पाहतां पुरुष व प्रकृति हीं देखील भिन्न नाहींत ( वाम सव्य उभय भाग । दों नांवीं एकचि अंग । ते प्रकृतिपुरुषात्मक जग । चिद्रूपें चांग एकत्वें ॥ ) ए. भा. प्रकृति ही पुरुषाची शक्ति व तिच्या भावनेचा समावेश शूराच्या शौर्याप्रमाणें पुरुषांतच होतो, याकरितां ती त्यापासून निराळी कशी होऊं शकेल ? ज्याप्रमाणें सुवर्ण नाना अलंकार होऊनहि सुवर्णपणास मुकत नाहीं, हीच त्याची शक्ति, त्याचप्रमाणें पुरुषहि प्रकृतिरूपानें नटून देखील बहुरूप्यासारखा आपल्या स्वरूपास विसरत नाहीं, हीच त्याची शक्ति. हिलाच योग किंवा चातुर्य असें वेदवेत्ते म्हणतात ( पश्य मे योगमैश्वरम्—भ. गी. ). असें असून पुरुषास गणपति, शिव, विष्णु, राम, कृष्ण वगैरे व तसेंच एकाच प्रकृतीस अनुक्रमें सरस्वती, पार्वती, लक्ष्मी, सीता, रुक्मिणी वगैरे अनेक नांवें दिलीं आहेत असें

(१) एकं संतं बहुधा कल्पयंति ।—ऋग्वेद १०.११४.५

(२) एकं सद्विप्रा बहुधा वदंति ।
यमं अग्निं मातरिश्वानमाहुः ॥—ऋग्वेद १.१६४.४६

ह्या श्रुतीच सांगत आहेत. पुरुष हा निर्गुण असून ह्या शक्तीच्या—मायेच्या—योगानें त्याला षड्गुण ( ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः । ज्ञानवैराग्ययोश्चेति षण्णां भग इति स्मृतिः ॥ ) प्राप्त झाले. त्यांतील 'धर्म' ह्या दुसऱ्या गुणामध्यें समत्व व सदयत्व अर्थात् कल्पवृक्षस्वभाव या गुणाचा ( मुख्य धर्म समता दया । हे दोन्ही तुझे गुण अव्यया । इच्छित

फल दे तुझी व्यक्ति तया । गुण हा कल्पवृक्षाचा ॥ —य. दी. ) समावेश होतो. याकरितां 'जाणेल जो कल्पवृक्षपणें । आणि मागेल त्यासी काय उणें । भक्त श्रेष्ठ या गुणें । कीं जाणोन भक्ति त्याचीच त्यातें मागती ॥' —य. दी.

या आठवड्यांत नवरात्र—उत्सव म्हणजे नवविध भक्तीचे उत्सव (नवविधा भक्ति, नवरात्री व्यक्ति । अवघिया एकचि प्राप्ती ॥ —ए. म.) चालू आहेत या निमित्तानें आपण सगळे मिळून पहिल्यानें त्या आदिशक्ति किंवा मूळमाया सरस्वतीची प्रार्थना करूं:—

'तारिं मला जगदंब । दुर्गे ॥ धृ० ॥
त्वच्चरणांविण देवि ! नसे मज । अन्य जगीं अवलंब ॥ दुर्गे० ॥
तनुमदमहिष मला छळि निशिदिनिं । सोडविं न करिं विलंब ॥दुर्गे०॥
अंब ! तुझ्या चरणांबुजिं रुंजो । वामनमनरोलंब ॥ दुर्गे० ॥'

या प्रार्थनेंत आपली माता जगदंबा जी चिच्छक्ति तिच्याजवळ शुद्ध सत्त्वगुण मागितला आहे. याचें कारण शुद्ध सत्त्वगुणावांचून ज्ञान होणें शक्य नाहीं. [(१) विशुद्धसत्त्वस्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः । —मुंडक ३.१.८. (२) नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥ तैशी चित्तशुद्धि नाहीं । त्यासी बोध करील काई ॥—तु. म.] तसेंच देहाच्या संगतीमुळें सगळीं दुःखें भोगावीं लागतात म्हणून या मातेपाशीं त्याच्या संगतीपासून आम्हांला सोडव अशी विनवणी केली आहे.

स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चार देहांचा ऱ्हास झाल्यावांचून स्वरूपाचा बोध होत नाहीं. हें वर्म ठाऊक नसल्यामुळें अज्ञजन गैर-समजुतीनें 'देहबळी' देण्याचा विपर्यास करून रेडा, बोकड वगैरे बळी देऊं लागले. ह्या अत्यंत तमोगुणी आचरणाच्या योगानें ही परमदयाळू देवी कशी प्रसन्न होईल? कारण तिच्याजवळ जें आम्ही अक्षय्य सुख

मागतों तें अशा हिंसेनें कसें प्राप्त होईल? म्हणून हिच्या कृपेनें शुद्ध सत्त्वगुण संपादन करून सद्गुरुमुखानें जड देहाचा निरास होऊन निज-प्राप्ति करून घेण्याचे संतांनीं सांगितलेले उपाय कोणते याचा आपण विचार करूं.

अशा समयीं संतशिरोमणि श्रीतुकाराममहाराजांवांचून आणखी कोणत्या संताजवळ आपण पदर पसरावे? त्यांच्या प्रेरणेनेंच सर्वांस माहीत आहे असा त्यांचा 'भावें गावें गीत' हा अभंग विवेचनार्थ घेऊं. श्रीतुकाराममहाराज श्रुति, स्मृति, पुराण यांना सोडून कधींहि एक शब्द बोलत नाहींत. परंतु आजचें निरूपण सद्भक्तिपंथ या विषयावर सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांकरितां करावयाचें असल्यामुळें आपण अभंगांतील सर्व मुद्दे मुख्यत्वें-करून श्रीभगवद्गीतेच्याच आधारानें सिद्ध करूं. भगवद्गीतेंतील आधार पसंत करण्याचें कारण ही गीता यथाकाळीं जगताचा धर्मग्रंथ होण्याचा संभव आहे (Bible of the world) अशी पौर्वात्य व पाश्चात्य प्रबुद्ध लोकांची खात्री होत चालली आहे. कां म्हणाल तर तिच्यांत सांगितलेलीं तत्त्वें सर्व धर्मांस अनुसरून आहेत. उदाहरणार्थ, श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत 'मी जो जगताचें अधिष्ठान व निमित्त कारण आहें (अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते । —भ. गी.) असें मानून मला भजा' असें सांगितलें आहे. सर्व गीतेंत 'मी देवकीचा पुत्र श्रीकृष्ण त्या मला भजा' असें कोठेंहि सांगितलें नाहीं.

एक अत्यंत महत्त्वाची लक्षांत घ्यावयाची गोष्ट ही आहे कीं, ज्या मूर्तीच्या मुखांतून भगवद्गीता प्रगट झाली ती खालीं दिलेल्या उताऱ्यांत सांगितल्याप्रमाणें इतर हिंदु, बौद्ध, ख्रिस्ती, पारशी, मुसलमान वगैरे धर्मांतील अवतारांसारखी परमेश्वराची अंशभूत कला नसून ऐश्वर्यादि षड्-गुणसंपन्न साक्षात् परिपूर्ण ब्रह्म होतीः—

( १ ) 'एते चांशकलाः पुंसः कृष्णस्तु भगवान्स्वयम् ।'

—भागवत.

**अर्थ**—'इतका वेळपर्यंत सांगितलेले सर्व अवतार परमेश्वराच्या अंशभूत कला होत. परंतु श्रीकृष्ण परमात्म्याचा अवतार मात्र साक्षात् परब्रह्मस्वरूपच होय.'

( २ ) 'भूतेष्वन्तर्यामी ज्ञानमयः सच्चिदानंदः ।
प्रकृतेः परः परात्मा यदुकुलतिलकः स एवायम् ॥'

—श्रीमच्छंकराचार्य.

**अर्थ**—'ज्ञानमय व सच्चिदानंदस्वरूप असूनहि जो मायातीत परमात्मा सर्वान्तर्यामीं वसत असतो तोच हा यदुकुलभूषण श्रीकृष्ण होय.'

( ३ ) 'कांहीं विशेष प्रकारचा अवतार असें सुचविण्याकरितां श्रीकृष्णाला पूर्णावतार म्हटलें आहे हें आपल्याला माहीत आहेच. 'पूर्ण' म्हणण्याचा भावार्थ असा कीं, साकार मूर्तींत होणें शक्य तितका निराकाराचा आविर्भाव तींत पूर्णपणें झाला, जगत्कारणासाठीं निर्माण झालेल्या त्या थोर विभूतींत पराकाष्ठेनें शक्य तितक्या अंशानें तो भगवान् अवतीर्ण झाला. पूर्णावतार म्हटला म्हणजे असें आणखी खचित समजावयाचें कीं, स्वेच्छेनुरूप कोणत्याहि प्रसंगीं योगबलानें किंवा अन्य तऱ्हेनें त्याला ज्या रूपांत त्याचा अवतार झाला असेल त्याच्या मर्यादांचें उल्लंघन करून, दिव्य अशा विश्वव्यापक विश्वेश्वराच्या अलौकिक स्वरूपानें आविर्भूत होतां येतें.'—डॉ. बेझंट:—अवतार.

आतां आपण पहिल्यानें 'भावें गावें गीत' हा सगळा अभंग म्हणूं व मग त्याचें विवेचन करूं.

**भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ॥ १ ॥**
**जरी व्हावा तुज देव । तरी हा सुलभ उपाव ॥ २ ॥**

करीं मस्तक ठेंगणा । लागें संतांच्या चरणा ॥ ३ ॥
आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥ ४ ॥
वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ॥ ५ ॥
तुका म्हणे फार । थोडा करीं उपकार ॥ ६ ॥

श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगांत बहुतकरून विठोबा, पांडुरंग, गोविंद, नारायण वगैरे हिंदूंना मान्य असलेल्या एकाद्या देवाचें तरी नांव आल्यावांचून राहात नाहीं. परंतु ह्या अभंगांत त्या नांवांच्या ऐवजीं 'देव' शब्द घातला गेला आहे. ही योजना आजच्या सार्वजनिक प्रवचनास किती तरी उपयोगी आहे! तसेंच तुकाराममहाराजांच्या बहुतेक अभंगांत दुसरा चरण ध्रुवपदासारखा असतो. ह्या पद्धतीस अनुसरून या अभंगांत दुसऱ्या चरणाचा ध्रुवपदासारखा उपयोग केला आहे. तो असा:—

'जरी व्हावा तुज देव । तरी हा सुलभ उपाव ॥'

तो कोणता—

(१) भावें गावें गीत । शुद्ध करोनियां चित्त ॥ जरी० ॥
(२) करीं मस्तक ठेंगणा । लागें संतांच्या चरणां ॥ जरी० ॥

वगैरे वगैरे. म्हणून आपण प्रथम अभंगाच्या ध्रुवपदाचा अर्थ सांगून नंतर बाकीचे चरण घेऊं. तो अर्थ असा आहे कीं, 'जर देवाचें दर्शन किंवा भेट व्हावी, अशी तुझी इच्छा असेल तर त्याला सोपा उपाय क्रमाक्रमानें सांगतों.'

देवदर्शनासंबंधानें कोणी म्हणतो मीं गणपति पाहिला, कोणी म्हणतो मला रामाची मूर्ति दिसली, कोणी म्हणतो मला देवीचा साक्षात्कार झाला, तर कोणी येशू ख्रिस्त, पैगंबर वगैरे भेटले असें म्हणतो. पण खरें देवदर्शन या सर्वांहून भिन्न आहे, असें श्रीसोहिरोबांनीं

त्या देवाचें तूं दर्शन घे । संसार-मोहांतुनि त्वरित निघें ॥ ध्रु. ॥
आदि मध्य ना अंत जयाला । 'नेति नेति' म्हणती वेद तयाला ।
ज्यापासुनि ॐकारहि जाहला । ब्रह्मा विष्णु हर हे तिघे ॥ १ ॥
अगम्य अगोचर सत्ता ज्याची । सहज लीला हे त्याची ।
जारज स्वेदज अंडज उद्भिज । ज्यापासुनि हे सहज निघे ॥ २ ॥
दृश्य सकळही टाकुनि जातां । निरालंबिं राहतां ।
प्राणापान ऊर्ध्वहि वाहतां । आनंदभुवनीं मन हें रिघे ॥ ३ ॥
म्हणे सोहिरा शून्याकार । रूप नाहीं आकार ।
परब्रह्माचि निर्विकार । आंत बाहेर अवघें ॥ ४ ॥

या पदांत सांगितलें आहे.

येथें संसार म्हणजे सम्यक् प्रकारचें सार असा हा नरदेह होय. आपण निर्गुण निराकार आत्मा असून 'मी जडदेह आहें' असें मानणें हाच संसारमोह. याहून अतीत झाल्याशिवाय परात्पर जो भगवान् त्याचें दर्शन होणार नाहीं. त्या स्वरूपासंबंधानें श्रीसोहिरोबा म्हणतात, तें साकार नसून निराकार, निर्विकार, सर्वव्यापक असें आहे. दुःखाचा नाश होण्याकरितां जाणावयाचें जें हें स्वरूप त्याचें वर्णन भगवद्गीतेंत दुसऱ्या अध्यायांतील—

अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥

ह्या श्लोकांत दिलें आहे. येथपर्यंत ध्रुवपद झालें.

आतां असें स्वरूप जाणावयाकरितां आपण काय केलें पाहिजे हें पहिल्या व तिसऱ्या चरणांत सांगितलें आहे. पहिल्या चरणांत 'भावें गावें गीत' असा उपदेश केला आहे. याचा अर्थ भाव ठेवून प्रार्थना करावी असा आहे. प्रार्थना करणें हें मनुष्यजातीचें मुख्य कर्तव्यकर्म

सर्व धर्मांत व पंथांत मानलें जातें, असें खालीं दिलेल्या उताऱ्यांवरून कळून येईल:—

( १ ) 'इंद्रियें व मनोवृत्ति परमेश्वराकडे वळवून त्याच्यामध्येंच रममाण होतील व वृत्ति व हृदय ईश्वरमय होईल असें करण्यास सर्वोत्तम साधन प्रार्थना होय. उपासनेंत प्रार्थनेला मुख्य जागा देण्याच्या संबंधानें सर्व धर्मसंस्थापकांची एकवाक्यता आहे. ह्यावरून ईश्वरप्राप्तीच्या व ईश्वर-भजनाच्या सर्व साधनांत प्रार्थना प्रधान आहे असें सिद्ध होतें.'—न्यायमूर्ति रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें.

( २ ) 'प्रार्थना किंवा भजन हें हजरत महंमद पैगंबरानें अवश्य कर्तव्य म्हणून मानिलें आहे. त्याच्या मतें तर प्रार्थना ही धर्माचा स्तंभ व स्वर्गाची किल्ली आहे.'—अल्कुराण.

( ३ ) 'ईश्वराची भेट व्हावी अशी ज्यांची उत्कट इच्छा आहे, त्यांनीं त्याचें प्रेमानंदानें भजन करावें.'—बायबल.

( ४ ) 'प्रार्थना किंवा भजन हें पारशी धर्मगुरूनें अवश्यकर्तव्य म्हणून मानिलें आहे.—आवेस्ता.

आतां कोणाची प्रार्थना करावयाची हें भगवद्गीतेच्या ९ व्या अध्यायांतील

**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥**

या श्लोकार्धांत सांगितलें आहे. येथें 'माम्' हा शब्द वसुदेव—देवकीचा पुत्र जो श्रीकृष्ण त्याला अनुलक्षून नसून वर सांगितल्याप्रमाणें जगाचें अधिष्ठान व निमित्त कारण जो सगुण सर्वेश्वर त्यासच संबोधून आहे. त्याचें सविस्तर वर्णन श्रीसोहिरोबांनीं

वंदियला भगवंत तो म्यां वंदियला भगवंत ॥ ध्रु. ॥
भवसिंधुतारक, निजसुखकारक । सकळां आदी अंत ॥ १ ॥
सज्जनरंजन, अलख निरंजन । भक्तजनां कृपावंत ॥ २ ॥

वेद झाले मुके, शेष न स्तवूं शके । ज्याचें स्वरूप अनंत ॥ ३ ॥
नव्हे नर नारी, गैबी सूत्रधारी । हालवी जो जिवजंत ॥ ४ ॥
सोहिरा म्हणे, अनुभवीं पहाणें । चित्सुख–वन–वसंत ॥ ५ ॥

या पदांत केलें आहे.

या सगुण ईश्वराची प्रार्थना कशी करावी ह्यासंबंधानें श्रीतुकोबाराय म्हणतात कीं, ती भावानें किंवा श्रद्धेनें केली पाहिजे. भाव कसा उत्पन्न होईल? याचें उत्तर ' शुद्ध करोनियां चित्त ' ह्या चरणांत दिलें आहे. याचा भावार्थ ' आपापलीं कर्तव्यकर्मे करून चित्तशुद्धीनें प्राप्त होणाऱ्या सत्संगतीच्या योगानें ' (यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् । स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥––भ. गी.) असा आहे. म्हणून भगवद्गीतेंतील दहाव्या अध्यायाच्या ' मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ' या श्लोकार्धाच्या टीकेंत श्रीवामनपंडित म्हणतात:—

**प्रथमचरणीं ऐसी हरी । बोले त्यांच्या भजनरीतीची वैखरी ।**
**भजन ऐसें वर्णिलें परी । हें सत्संगावांचूनि असाध्य ॥**—य. दी.

याकारितां श्रीतुकाराममहाराज म्हणतात:-—' तुका म्हणे कुळधर्म दावी देव । यथाविध भाव जरी होय ॥'. भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायांतील—

**उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।**
**नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥**

या श्लोकांत तर अर्जुन स्पष्ट म्हणतो कीं, कुलधर्म बंद झाले कीं, मनुष्य नरकास जातो. सारांश, प्रत्येक जीवानें, मग तो ब्राह्मण असो किंवा शूद्र असो, बौद्ध किंवा लिंगाईत असो, शिया किंवा सुनी असो, सेन्शाही किंवा कदमी असो, रोमन कॅथॉलिक किंवा प्रॉटेस्टंट असो, कोणत्याहि धर्माचा किंवा पंथाचा असो, त्याला कुलधर्माचरणानेंच सत्संगति प्राप्त होते. ह्याला श्रीरामदासस्वामींचें ' नामें महादोष जाती । पुढें संतांची

संगती ॥' हें वचन अपवाद आहे. परंतु तेच श्रीरामदासस्वामी 'पळशी तूं तरी नाम कोठें नेशी। आम्ही अहर्निशीं नाम घोकूं ॥' या अभंग-चरणांत त्या मार्गाचें कडक पथ्य 'अहोरात्र नाम घेणें' असें सांगत आहेत. श्रीतुकाराममहाराजहि पुढील अभंगांत नुसत्या नामानेंच सत्संगति प्राप्त होते, असें प्रतिपादन करतात. परंतु तें नाम अखंड—क्षणभरहि न विसंबतां—घेतलें तर मात्र इष्टसिद्धि होईल:—

**हरी तुझें नाम गाईन अखंड। याविण पाखांड नेणें कांहीं ॥**
**अंतरीं विश्वास अखंड नामाचा। काया मनें वाचा देईं हेंचि ॥**
**तुका म्हणे आतां देईं संतसंग। तुझे नामीं रंग भरो मना ॥**

भगवद्गीतेंत देखील अठराव्या अध्यायांत—

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥**

'सर्व धर्म सोडून मला एकट्यालाच शरण ये' असें श्रीकृष्ण सांगतात. परंतु

**एवंच टाकूनि सर्व धर्म। सोडोनि वेदोक्त स्वकर्म।**
**शरण जावें, त्याचें हें वर्म। कीं विषयसुखेच्छा जरी टाकी ॥**—य. दी.

ह्या ओवींत त्या मात्रेचें जें पथ्य सांगितलें आहे, तें पाळणारा जगतांत विरळा. देवाकरितां जीवावर उदार व कसलीच इच्छा नसणाऱ्या श्रीरामदास स्वामी, श्रीतुकाराममहाराजांसारख्या अवतारी पुरुषांवांचून इतर साधकांस हें साधन शक्य नाहीं. म्हणून श्रीतुकाराममहाराजांनीं सांगितलेला कुलधर्माचरणाचा सुलभ उपाय, ज्यांत नामाचा सहज समावेश होतो (यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपःपूजाक्रियादिषु। न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम् ॥ —स्मृति), तोच सर्व धर्मांस मान्य असा धोपट मार्ग होय व तो श्रीवामन-पंडितांनींहि ब्रह्मस्तुतींतील पुढील श्लोकांत प्रतिपादन केला आहे:—

करुनि विहित कर्में साधिली चित्तशुद्धी
श्रवणमननमात्रीं योग्यता हेचि सिद्धी ।
जरि मन विघरेना सेवितां विष्णुलीला
अकळचि महिमा हा निर्गुणाचा तयाला ॥

या श्लोकांत सांगितलेल्या दोन चित्तशुद्धींपैकीं पहिली विहित कर्में करून होते व ती बाह्यशुद्धि (जरी हेम तावोनियां ओप देती । तयांतील त्या मिश्र धातू न जाती ॥—ब्रह्मस्तुति). तेणेंकरून फक्त सत्संगतींत श्रवणाचा अधिकार येतो. नंतर सत्संगतींत शास्त्रश्रवण केल्यानें आपण निष्क्रिय आत्मा आहों हा जो बुद्धीचा निश्चय होतो हेंच भावाचें किंवा श्रद्धेचें स्वरूप होय व यासच ईश्वरार्पण असें म्हणतात.

मी एकू कर्मकर्ता । ऐशी उठों नेदी अहंता ।
तें कर्मचि स्वभावतां । अर्पी श्रीअनंता ईश्वरातें ॥—ए. भा.

ह्याला भगवद्दास्य किंवा प्रथम भागवतधर्म अशींहि नांवें दिलीं आहेत. येणें-करून दुसरी चित्तशुद्धि होते, तिचा उल्लेख ब्रह्मस्तुतींत—

कनक जे रिति घातलिया पुटीं, इतर धातु जळे मग शेवटीं ।
कनक केवळ शुद्ध जसें उरे, अमळ चित्त तसें अगुणीं मुरे ॥

या श्लोकांत केला आहे. या दोन्ही चित्तशुद्धींचीं भिन्न भिन्न कारणें व फळें पंडितांनीं नामसुधेंतील पुढील एकाच श्लोकांत दिलीं आहेत:—

न जाणतहि ये मुखा ‘ हरि ’ तथापि पापें हरी
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींचि नामें जरी ।
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनांचीं मनें
विरक्त करितो हरी स्वगुण नामसंकीर्तनें ॥

मग मुमुक्षूनें ज्या संताकडून श्रवण केलें असेल त्यासच सद्गुरु या भावनेनें ज्ञानप्राप्तीकरितां शरण जावें असें ‘करी मस्तक ठेंगणा । लागें संतांच्या

चरण ॥' या तुकाराममहाराजांच्या अभंगाच्या तिसऱ्या चरणांत स्पष्ट दर्शविलें आहे.

बोधास अवश्य लागणारे अष्टभाव प्राप्त होण्याविषयीं श्रीतुकाराममहाराजांनीं पुढील अभंगांत भगवंताची प्रार्थना केली आहे:—

सद्गदित कंठ दाटो । येणें फुटो हृदय ॥
चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥
नेत्रीं जळ वाहो सदां । आनंदाचे रोमांच ॥
तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥

अर्जुनाच्या अंगीं आलेले हे सर्व भाव भगवद्गीतेंत—

'तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।'
'सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।'
'वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ।'
'गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।'

इत्यादि शब्दांनीं प्रदर्शित केले आहेत. या भावांना कुराणांतहि किती महत्त्व दिलें आहे हें 'महंमद पैगंबर' या पुस्तकांतील पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल:—

"प्रार्थना व भक्ति करितांना पैगंबराच्या नेत्रांतून सतत अश्रूंच्या धारा चालत असत. त्याचा चुलतभाऊ अली याचा देह तर प्रार्थनेच्या समयीं निश्चेष्ट होई. अंतःकरणाच्या शुद्धतेची मातबरी कुराणांत विशेष प्रकारें सांगितली आहे."

बोधकाळीं होणाऱ्या अशा समाधिस्थितिसंबंधानें लोकमान्य टिळकहि असेंच म्हणतात:—

"ध्यानानें व समाधीनें प्राप्त होणारी ही अद्वैताची किंवा अभेदभावाची अवस्था Nitrous Oxide Gas नांवाचा एक प्रकारचा रासायनिक वायु हुंगल्यानेंहि प्राप्त होत असते. या वायूसच 'लाफिंग गॅस' हें नांव आहे.

पण ही अवस्था कृत्रिम असून समाधीनें प्राप्त होणारी अवस्था खरी व स्वाभाविक असते असा या दोहोंत महत्त्वाचा भेद आहे. तथापि या कृत्रिम अवस्थेच्या पुराव्यावरून अभेदावस्थेच्या अस्तित्वाबद्दल कांहींच वाद राहात नाहीं, म्हणून या ठिकाणीं तिचा आम्हीं उल्लेख केला आहे. "—गीतारहस्य.

श्रीकृष्णांनीं अर्जुनास केल्याप्रमाणें सद्गुरूनें सच्छिष्यास करावयाच्या उपदेशाचे दोन प्रकार आहेत:—( १ ) व्यतिरेकान्वयें निर्गुण ज्ञान ( अक्षरं ब्रह्म परमं ।—भ. गी. ) व ( २ ) राजविद्या राजगुह्य नामक सगुण ज्ञान ( पश्य मे योगमैश्वरं ।—भ. गी. ). ह्या पूर्णबोधाचा खुलासा भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायाच्या ' मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ' या पहिल्या श्लोकाच्या टीकेंत अर्जुनाच्या मुखानेंच झाला आहे तो असा:—

प्रथम मी जडदेह । व्यतिरेकें नासला हा मोह ।
तो स्वदेहासहित भूतसमूह । आत्माच जाला अन्वयें ॥
हा बोध जाला अष्टमीं । तो मायाभास प्रपंच ब्रह्मीं ।
देखे तोही जाला नवमीं । भगवद्रूप ॥
' पश्य मे योगमैश्वरं ' म्हणूनी । हीं सर्व भूतें पाहें माझा योग मानूनी ।
योग तो भगवद्रूप यावरूनी । विश्व भगवद्रूप अर्जुन समजला ॥
हें अन्वयज्ञानापरीस । गुह्य सांपडलें अत्यंतसुरस ।
प्रपंच मायाभास मानावा विरस । तो भगवद्रूप गोड वाटों लागला ॥
हें राजविद्या राजगुह्य । कीं जें जाणती इंद्रियें बाह्य ।
तेंहि भगवद्रूप ऐसें गुह्य । हेंही अध्यात्मसंज्ञित समजलों म्हणतसे ॥"—य.दी.

असा दिव्यबोध देणारा गुरु शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ असला पाहिजे असें श्रीकृष्णांनीं ' तद्विद्धि प्रणिपातेन ' या श्लोकांत म्हटलें आहे. याचें कारण असें आहे कीं, ज्याला शास्त्र माहीत नाहीं तो गुरु शिष्याचे संशय परिहार करूं शकणार नाहीं व अनुभव नसलेल्या गुरूच्या नुसत्या शब्दज्ञानानें शिष्यास स्वरूपाचा बोध होणार नाहीं. म्हणून श्री एकनाथमहाराज

(' शब्दज्ञानें पारंगत । जो ब्रह्मानंदें सदा डुल्लत । शिष्यप्रबोधनीं समर्थ । तो मूर्तिमंत स्वरूप माझें ॥ '—भागवत ) असे गुण ज्याच्या अंगीं आहेत तोच सद्गुरु होण्यास योग्य आहे असें म्हणतात.

गुरूची आवश्यकता मोठमोठ्या धर्मांसहि मान्य आहे असें पुढील उताऱ्यांवरून सिद्ध होतें:—

## ( १ ) हिंदु धर्म.

'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् । आचार्यवान्पुरुषो वेदेति ।'—श्रुति.

## ( २ ) बौद्ध धर्म.

' बुद्धानें आपणांस धर्मज्ञानाचा साक्षात्कार झाल्याचें पांच भिक्षूंना सांगितलें, परंतु तें त्यांना खरें वाटेना. शेवटीं, आषाढ पौर्णिमेच्या दिवशीं भगवंतानें त्यांस उपदेश केला.'—प्रो. धर्मानंद कोसंबी.

## ( ३ ) ख्रिस्ती धर्म.

' ईश्वरानें जर संत, साधु प्रेषित म्हणून पाठविले नाहींत, तर ज्यांची ईश्वरावर श्रद्धा नाहीं त्यांना ईश्वराची माहिती कोण करून देणार ? जे शांतीचें माहात्म्य लोकांच्या मनावर बिंबवितात, व ईश्वराची श्रद्धायुक्त भक्ति केल्यानें ऐहिक व पारलौकिक सुखाचा लाभ होतो हें शुभवर्तमान त्यांना सांगतात, त्या संतांच्या चरणांचा महिमा किती अगाध आहे !'—बायबल: रोमन्स.

## ( ४ ) पारशी धर्म.

' हे प्रभो ! आत्मोन्नति करून घेण्याच्या कामीं मला कोण मदत करील ? हे परमपूज्य अहुरमझदा ! जो तूं ह्या क्षुद्र देह धारण करणाऱ्याचा

रक्षण करणारा आणि तारक आहेस, त्या तुझ्याशिवाय मला सन्मार्ग कोण दाखवील आणि माझी चित्तशुद्धि कोण करील ? जो माझा सर्व पत्कर घेऊन माझ्यावर पूर्ण कृपा करील असा कोण आहे ? '—यस्न.

'ह्यावरून झर्थुस्ती धर्मग्रंथांत आत्मोन्नति करण्याकरितां सद्गुरूची आवश्यकता आहे असें प्रतिपादन केलें आहे, हें स्पष्ट दिसतें. '—अवस्थेचा प्रकाश.

## ( ५ ) इस्लामी धर्म.

'आम्हीं तुझें अंतःकरण खुलें करून दाखविलें नाहीं काय ? तुझी प्रार्थना आटोपली म्हणजे आपल्या धर्माचीं उदात्त तत्त्वें लोकांना समजावून सांगण्याचा झटून प्रयत्न करण्यांत व पुन्हां अल्लाची प्रार्थना करण्यांत आपल्या आयुष्याचा व्यय कर. '—अल्कुराण.

## ( ६ ) शीख धर्म.

शीख धर्माचे संस्थापक नानकशहाहि, ज्यांनीं आपला धर्म श्रुतिस्मृतीच्या आधारावर न स्थापितां केवळ मनुष्यांच्या अंतःकरणांत असलेल्या उपजत भावनांवर व वासनांवर स्थापन केला, स्पष्टपणें म्हणतात कीं,

'ईश्वराच्या स्वरूपाचें अनुभवजन्य ज्ञान होण्यास गुरूचें सहाय्य अत्यावश्यक आहे.' त्यांचे ह्यासंबंधाचे सिद्धांत येणेंप्रमाणें आहेतः—

१. जे गुरुसेवा करून त्याची कृपा संपादन करण्यासाठीं सतत झटतात, त्यांनाच ईश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान होतें.

२. गुरूच्या उपदेशाचें सतत श्रवण केल्यानेंच मुमुक्षूंच्या अंतःकरणांत ज्ञानाचा प्रकाश पडतो.

भक्तीचे किंवा ईश्वरावरील प्रेमाचे दोन भेद आहेतः ( १ ) गौणी किंवा ज्ञानहीन भक्ति व ( २ ) परा किंवा ज्ञानयुक्त भक्ति. येथपर्यंत गौणी

भक्तीचें वर्णन झालें, कारण तिची मर्यादा ( गौण्या तु समाधिसिद्धिः ।—शांडिल्यसूत्र ) सद्गुरूपासून स्वरूपाचा बोध होईपर्यंत मात्र असते. येथें 'योऽन्यां देवतामुपास्ते' या श्रुतींत दर्शविलेले दोष गौणी भक्तीस लागत नाहींत असें भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायांतील 'ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये' या श्लोकाच्या 'पृथक्त्वेन' या शब्दावरील यथार्थदीपिकेंतील टीकेवरून सिद्ध होतें. याचें सार पंडितांनीं पुढील श्लोकांत दिलें आहे:—

> **अद्वैत हें निगमसिद्ध खरें तथापि**
> **नाहीं मला अनुभव स्वसुखस्वरूपीं ।**
> **तो ईश्वरा ! मज घडो म्हणऊनि देवा**
> **जिज्ञासु सेविल, तयास फळेल सेवा ॥"**
>
> —ब्रह्मस्तुति

दुसऱ्या परा किंवा ज्ञानयुक्त भक्तीस अनन्यभक्ति, एकांतभक्ति, विमल-भक्ति, अभेदभक्ति, चौथी भक्ति, मुक्तीवरील भक्ति, गुरुभक्ति अशीं अनेक नांवें दिलीं आहेत. ही भक्ति करणारास भागवतांतील—

> **सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ।**
> **भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥**

या श्लोकांत उत्तम भागवत असें म्हटलें आहे. हीच सद्भक्ति किंवा अविनाशी भक्ति, म्हणजे जी कधींच नाहींशी होत नाहीं अशी भक्ति. ह्या खऱ्या भक्तीची व्याख्या ब्रह्मस्तुतींत 'परी प्रीति जें ईश्वरी आत्मभावें । तिये प्रीतिला 'भक्ति' ऐसें म्हणावें ॥" अशी दिली आहे. कारण जगतांतील कोणत्याहि प्रिय वस्तूची कधींना कधीं तरी अप्रीति होण्याचा संभव असतो. परंतु आपली आपणास अप्रीति होणें केव्हांहि शक्य नाहीं. अर्थात् ती निर्विकल्प, निष्कपट (आत्मप्रीती सहज । तोचि आत्मा वाटे अधोक्षज । तरीच भक्ति निर्दोष निर्व्याज । आत्मसाक्षात्कार भजनींही ॥ —य. दी.)

असते. आपण ईश्वर आहों असा बोध असूनहि जर 'श्रवणकीर्तनादि सगुण-प्रेम' नसेल तर निर्गुणोपासनेनें साधकास देहांतीं सायुज्यता मिळूं शकेल, पण शुद्धसत्त्वाच्या अभावामुळें (असेच आतांही निर्गुण। परि ज्ञानियांस असे निर्गुणात्मक खूण। नाहींसा होईल तो सत्त्वगुण। कैवल्यांत ॥ ——य. दी.) त्याला सगुणमुक्ति मिळणें शक्य नसल्यामुळें त्या भक्तीला सद्भक्ति म्हणतां येत नाहीं, असें श्रीवामनपंडित आरंभीं दिलेल्या श्लोकांत म्हणतात.

शांडिल्य-भक्तिसूत्रांत 'भक्ति' शब्दाची व्याख्या 'सा परानुरक्तिरीश्वरे' व यथार्थदीपिकेंत भगवद्गीतेच्या ४ थ्या अध्यायांतील 'योगमातिष्ठोत्तिष्ठ' या वाक्याच्या टीकेंत 'योग' शब्दाचा अर्थ 'ईश्वराराधन' दिल्यामुळें भक्तियोगाचा अर्थ अत्यंत प्रीतियुक्त ईश्वराराधन असा सिद्ध होतो. म्हणून गौणी किंवा ज्ञानहीन भक्तिरूप ईश्वराराधन हा पहिला भक्तियोग (त्या ईश्वरास समसदय समजणें। आणि त्यास कर्में समर्पणें। निर्दोषी आवडी उपजणें। हाचि भक्तियोग ॥——य. दी.) होय. याचें वर्णन भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायांतील 'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र' व सातव्या अध्यायांतील 'येषां त्वंतगतं पापं' व 'जरामरणमोक्षाय' या तीन श्लोकांत केलें आहे. तसेंच भागवताच्या प्रथम स्कंधांतील 'नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं' अकराव्या स्कंधांतील 'कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा' व 'शुद्धिर्नृणां न तु तथेड्य दुराशयानां' आणि सप्तम स्कंधांतील 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं' व 'इति पुंसार्पिता' या श्लोकांचाहि भावार्थ हाच आहे.

त्याप्रमाणेंच परा किंवा ज्ञानयुक्त भक्तिरूप ईश्वराराधन हा दुसरा भक्ति-योग (जें दिव्यत्वें जन्मकर्म। जाणणें आणि विश्वाचि सगुणब्रह्म। ज्ञानतपें हा भक्तियोग उत्तमोत्तम। तो या भक्तियोगें ज्ञान जालिया ॥——य. दी.) असून त्याचें वर्णन भगवद्गीतेच्या आठव्या अध्यायांतील 'अनन्यचेताः

सततं यो मां स्मरति ’ व चवदाव्या अध्यायांतील ‘ मां च योऽव्यभिचारेण ’ या दोन श्लोकांत केलें आहे.

येथें जर कोणी म्हणेल कीं ज्ञान झाल्यानंतर भक्तीची जरूरी काय आहे, तर ज्ञान होण्याकरितां तिची ( भक्तिविण ज्ञान गिवसिती वेडे । मूळ नाहीं तेथें फळ केविं जोडे ॥—ए. म. ) जितकी आवश्यकता आहे, तितकीच ज्ञान झाल्यावरहि तें बाणण्याकरितां आहे असें श्री एकनाथमहाराज पुढील अभंगचरणांत म्हणतात:—

**भक्तियुक्त ज्ञान तेथें नाहीं पतन । भक्ति माता तया करितसे जतन ॥**

म्हणून आत्मा कळल्यावर साधकांनीं ज्ञान बाणून सगुण मुक्ति प्राप्त होण्याकरितां भगवद्गीतेच्या चवथ्या अध्यायांतील ‘ बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ ’ या श्लोकार्धांत सांगितल्याप्रमाणें करावयाच्या तपाचे मानसिक, वाचिक व कायिक असे तीन प्रकार श्रीतुकाराममहाराजांनीं अनुक्रमें चवथ्या, पांचव्या व सहाव्या चरणांत निरूपिले आहेत. ‘ आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥ ’ या चवथ्या चरणाचा भावार्थ जडजग चैतन्यरूप पाहा, पण ‘ चैतन्य कारण, जड कार्य । ऐसें न स्फुरे तरी भगवंताचें ऐश्वर्य । जग हें, स्वयें भगवंतचि माझा गुरुवर्य । या स्मरणेंची अविकंपयोग पावेन मी ॥ ’ ( य. दी. ) हा निदान भाव ( भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ।—भ. गी. ) तरी ठेवावा असा आहे. एकनाथी भागवतांतील ‘ मद्भावें भूतें समस्त । सर्वदा पाहतां सतत । मी तुरीय जो सर्वगत । ते ठायीं चित्त प्रवेशे ॥ ’ ह्या ओवींतहि असेंच सांगितलें आहे. देहांतीं सगुणमुक्ति हें ह्या तपाचें निश्चित फळ आहे, असें भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायांतील ‘ मय्येव मन आधत्स्व मयिबुद्धिं निवेशय । निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ’ या श्लोकांत प्रतिपादन केलें आहे.

'वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ॥' या पांचव्या चरणाचा अर्थ, वाणीचा उपयोग असा करा कीं, तेणेंकरून मन नेहमीं स्वरूपांत स्थिर राहील, हा आहे. ह्या वाचिक किंवा वाङ्मय तपाचा उल्लेख भगवद्गीतेच्या सतराव्या अध्यायांतील:—

'अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाधायाभ्यासनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥'

या श्लोकांत केला आहे. त्या श्लोकाचा अर्थ बरोबर लक्षांत येण्याकरितां यथार्थदीपिकेंतील त्या श्लोकावरील टीका अवश्य वाचावी.

श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायांत—

'सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।
नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥'

या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें नेहमीं ईश्वराचें नाम घेणें हें श्री ज्ञानेश्वर महाराज 'नातरी एकादें नांव । तेंचि शैव कां वैष्णव । वाचे वसे ते वाग्भव । तप जाणावें ॥' (ज्ञानेश्वरी) ह्या ओवींत वाङ्मय तप असें म्हणतात.

श्रीतुकाराममहाराजांनीं 'कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या ॥' व श्रीनामदेवरायांनीं 'अमृताहुनी गोड नाम तुझें देवा । मन माझें केशवा कां बा नेघे ॥' या अभंगांत आपल्या मुखांतून निरंतर नाम यावें म्हणून प्रभूपाशीं केलेल्या प्रार्थनांची देखील गणना वाङ्मय तपांत केली पाहिजे. वागिंद्रिय ताब्यांत ठेवणें हें सर्व धर्मांस मान्य आहे. सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ते आर्चबिशप बटलरसाहेब यांनीं या विषयावर दिलेलें सुंदर व्याख्यान विद्वज्जनांस विदित आहेच.

'बायबलमध्यें (जेम्स १—२६) म्हटलें आहे कीं, जरी तुमच्यापैकीं कोणी धर्मनिष्ठ असला, परंतु त्याला जर आपली जीभ योग्य वेळीं आवरतां

येत नाहीं, तर तो आपली फसवणूक करून घेत आहे आणि त्याचें धर्माचें नुसतें स्तोम आहे, त्यांत कांहीं अर्थ नाहीं.'

शेवटल्या, 'तुका म्हणे फार । थोडा करी उपकार ॥' ह्या चरणांत श्रीतुकाराममहाराज साधकांनीं आपल्याकडून होईल तितकें प्राणिमात्राचें थोडेंबहुत कल्याण करावें असा उपदेश करतात. हें कायिक तप सांगण्याचें, कारण भगवद्गीतेच्या दहाव्या म्हणजे विभूति—अध्यायांत 'अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।'—हींच पहिली विभूति सांगितली आहे. या श्लोकार्धाचा भावार्थ 'ईश्वर हा नित्यतृप्त असल्यामुळें त्याला सुख देऊन त्याची कृपा संपादन करावयाची असेल तर त्याचीं प्रतिबिंबें जे जीव त्यांना सुख देण्याशिवाय अन्य साधन नाहीं' असा आहे, हें पुढील ओव्यांवरून कळून येईल:—

> अखंड सुखाचा अनुभव । हें जयाचें वैभव ॥
> त्या मज कोण मानव । काय सुखी करील ? ॥
> प्रतिबिंबरूपें दुःख । तेथें दुःख हरूनि दे सुख ।
> यावेगळा उपाय आणिक । नसे सुखी करावयाचा ॥
> यालागीं सर्वभूतीं । आशयांत माझी विभूती ॥
> त्या जीवात्मयातें यथामती । सुख देतां मी सुखी होतसें ॥
> सुख द्यावें ईश्वरातें । ऐसें वाटे जयातें ॥
> त्याणें प्रतिशरीरीं जीवात्मयातें । सुख द्यावें ॥
>
> —य. दी.

भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांतील

> आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
> सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥

या श्लोकांत हें तप करणारा योगी आपणास अतिशय प्रिय होतो असें श्रीकृष्ण म्हणतात. या श्लोकाच्या यथार्थदीपिकेंतील टीकेंत कायिक तपाचे

वेगवेगळे प्रकार देऊन ते करणाऱ्या सर्व योग्यांत 'सर्वेषामपि दानानां ब्रह्मदानं विशिष्यते' ह्या श्रुतींत सांगितल्याप्रमाणें जीवास ब्रह्मविद्या देऊन जन्ममरणापासून मुक्त करणारा योगी श्रेष्ठ आहे, असें सिद्ध केलें आहे. जो कोणी भगवद्गीतेचा अर्थ भक्तीच थोर करून भगवद्भक्तांस सांगेल तो इतर कांहीं साधन न करतांहि निःसंशय अनादिवैकुंठास जाईल हा भगवद्गीतेच्या १८ अध्यायांतील 'य इदं परमं गुह्यं' या श्लोकाचा भावार्थ आहे. भागवतांतील 'य एतन्मम भक्तेषु' या श्लोकाचा भावार्थहि हाच आहे. अठरा पुराणांचें काढलेलें सार तरी 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्' हेंच दिलें आहे, व श्रीतुलसीदासहि:—

> **तनकर मनकर बचनकर काहुकु दुखवत नाहीं ।**
> **तुलसी ऐसे संतजन रामरूप जगमांही ॥**

असें स्पष्ट म्हणतात. असो.

ह्या त्रिविध तपाचे योगानें चित्तचैतन्य होऊन साधकाची कामक्रोधबाधा नाहींशी होते व त्याची बुद्धि अतिशुद्ध झाल्यामुळें त्यांत भगवान् येऊन वास करतात अर्थात् ती भगवद्रूप होऊन देहांतीं तो साधक वैकुंठास जातो.

> **इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।**
> **सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥—भ. गी.**
> **प्रस्तुतीं ज्ञानवंत । साधर्म्य पावले म्हणे भगवंत ।**
> **तो वेकुंठलोक अनाद्यनंत । पुनरावृत्ति नसे जेथूनी ॥**
> **—य. दी.**

एवढा लाभ नुसत्या संतांच्या चरणाचा स्पर्श झाल्यानें होतो, असें श्रीतुकाराममहाराज 'कायावाचामनें जाला विष्णुदास' ह्या अभंगांत म्हणतात. श्रीमच्छंकराचार्यांचेंहि

सत्संगत्वे निःसंगत्वं निःसंगत्वे निर्मोहत्वम् ।
निर्मोहत्वे निश्चलत्वं निश्चलत्वे जीवन्मुक्तिः ॥

या श्लोकांत असेंच म्हणणें आहे.

सारांश, भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायांतील

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥

हा श्लोक सद्भक्तिपंथाचें बीज किंवा मूळ होय. कारण, त्यांतील पहिल्या चरणांत सगुणभक्ति किंवा ज्ञानयुक्त भक्तियोग; दुसऱ्यांत, निर्गुणज्ञान किंवा व्यतिरेकान्वयबोध; तिसऱ्यांत, ईश्वराज्ञेनुरूप आपापलीं कर्तव्यकर्मे करून प्राप्त झालेल्या सत्संगतींतील निष्काम ईश्वरार्पण किंवा ज्ञानहीन भक्तियोग व चवथ्यांत, सगुणमुक्ति किंवा वैकुंठवास अशीं चार अंगें बीजांत वृक्षाकाराप्रमाणें गर्भित आहेत. याकरितांच ‘ कल्याण ’ मासिकाच्या गीतांकांत या श्लोकास ‘ गीतेंतील सर्वोत्तम श्लोक ’ असें म्हटलें आहे.

श्लोकांत सांगितलेल्या भक्ति, ज्ञान व वैराग्य ह्या तीन मोक्षसाधनांतच ( श्रवणकीर्तनादि भक्ती । वासुदेव सर्व ऐशा युक्ती । प्रारब्ध भोगितांही विरक्ति । हृदयीं असावी ॥–निगमसार ) ‘ श्रोतव्यं, मंतव्यं, निदिध्यासितव्यं ’ या श्रुतिवचनांतील श्रवण, मनन व निदिध्यास यांचाहि समावेश होतो.

येथें निष्काम ईश्वरार्पण अथवा ज्ञानहीन भक्तियोग हाच कर्मयोग ( कर्मयोगाचें लक्षण । दोन अध्यायीं कमलेक्षण । बोलिला कीं निष्काम ईश्वरार्पण । तोचि कर्मयोग ॥—य. दी. ); व्यतिरेकान्वय बोधाचा अभ्यास हाच ज्ञानयोग ( कीं चित्तशुद्धि ज्यांची झाली । आत्मता बरी कळों आली । त्यांस निष्ठा म्यां बोलिली । ज्ञानयोगें ॥—य. दी. ); व ज्ञानयुक्त भक्तियोग हाच मात्र खरा भक्तियोग ( भक्तियोग जो म्हणावा । तोचि सविशेषयोग जाणावा । विश्वरूपें आत्मा भजावा । तोचि योग ॥

—निगमसार ) समजावा. श्लोकाच्या शेवटल्या चरणांत नमूद केलेल्या सिद्धीस म्हणजे सगुणमुक्तीस किंवा वैकुंठवासास हिंदुधर्मांत 'विष्णोर्यत्परमं पदम्' म्हणजे श्रीविष्णूचें परमधाम, बौद्ध धर्मांत 'निर्वाण' म्हणजे वाण किंवा न्यूनतारहित स्थिति, खिस्ती धर्मांत, 'किंग्डम् ऑफ हेवन' म्हणजे ईश्वराचें राज्य, पारशी धर्मांत 'गॅरोनेमन्' म्हणजे श्रेष्ठ धाम व इस्लामी धर्मांत 'खलास' म्हणजे शेवटचें स्थान वगैरे वेगवेगळ्या धर्मांत वेगवेगळीं नांवें दिलीं आहेत.

ह्या भक्तिमार्गांत कर्मयोगास दास्यभक्ति किंवा दास्यरस, ज्ञानयोगास प्रेमभक्ति किंवा सख्यरस, भक्तियोगास पराभक्ति किंवा वात्सल्यरस व सगुणमुक्तीस गंगा–सागर–संगमभक्ति किंवा माधुर्यरस असें म्हणतात. याचें स्पष्टीकरण श्रीएकनाथमहाराजांनीं उंसाच्या रसाचा दृष्टांत देऊन पुढील दोन ओंव्यांत केलें आहे:—

**उंस गाळितां रस होये । तो ठेविलिया बहुकाळ न राहे ।**
**त्याचा आळूनियां पाहें । गूळ होये सपिंड ॥**
**तोही ठेवितां लिगाड धरी । मग साखर कीजे रायपुरी ॥**
**तेही घोटुनियां चतुरीं । नाबद करिजे कोरडी ॥**—ए. भा.

या धर्माचा नुसता आरंभ झाला असतां, म्हणजे नुसती दास्यभक्ति केली असतां ( एवं सर्व कर्मे मजला । ज्या दिवसापासून अर्पूं लागला । त्याच दिवसापासून संकल्प अमोघ माझा जाला । कीं मोक्ष द्यावाच आतां मी यातें ॥—य. दी. ) साधकास प्रत्यवायादि अपघातांची मुळींच भीति नसून तो बिनधोक जन्ममरणाच्या पाशांतून सुटून जातो, असें भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील 'नेहाभिक्रमनाशोऽस्ति' व भागवताच्या एकादश स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायांतील 'यानास्थाय नरो राजन्' या श्लोकांत सांगितलें आहे.

सद्भक्तिपंथाचें सार गुरुभक्ति असें श्री एकनाथमहाराजांनीं पुढील ओव्यांत प्रतिपादन केलें आहे:—

सांडोनि सकळ साधन । जो करी साधुभजन ।
तेव्हांचि त्याचें शुद्ध मन । सत्य जाण उद्धवा ॥
म्हणसी साधु तो कैसा कोण । मागां सांगितलें लक्षण ।
बहु बोलावया नाहीं कारण । साधु तो जाण सद्गुरू ॥
ज्यासी सद्गुरूची आवडी चित्तीं । ज्याची सद्गुरुभजनीं अतिप्रीती ।
त्यास भाळली माझी सद्भक्ति । पाठीं लागे निश्चिती वरावया ॥
जो गुरुभजनीं भावार्थी । जगामाजीं तोचि स्वार्थी ।
त्यापाशीं माझी सद्भक्ती । असे तिष्ठती आंखिली ॥
सद्भक्ति बापुडी कायसी । अंगें मीही अहर्निशीं ।
तिष्ठतसें स्वानंदेंसी । गुरुप्रेमासी भूललों ॥

—ए. भा.

गुरुभक्तीचें श्रेष्ठत्व तर वेद, शास्त्र, पुराण व संतवचनांत स्थळीं स्थळीं प्रतिपादन केलें आहे. तेव्हां असा गुरु तो कोण हा प्रश्न उद्भवतो. गुरु म्हणून जो साडेतीन हात चर्मदेह दृष्टीस दिसतो तो गुरु कीं काय ? नाहीं. खरा गुरु तो निर्गुण, निराकार, अवर्णनीय (ऐसा भी नही वैसा भी नहीं उनका मैं हैं चेला । ओही गुरु मेरा गुरु मेरा ॥—श्रीनारायण-महाराज) विश्वव्यापक चैतन्य असून त्याचा भासरूप देहहि गंगानदी-प्रमाणें नुसता जीवांच्या पातकांचा नाश करीत नसून त्यांचें संपूर्ण पापपुण्य नाहींसें करतो. अर्थात् त्याच्या दर्शनानें, स्पर्शनानें व सेवेनें जीवांस ज्ञानप्राप्त होऊन त्यांचें संचित जळून ते मुक्त होतात, असें वामनपंडित आपल्या राजयोगांतील 'सार्द्धत्रिहस्त जरि वामन दीसती ते, विष्णु स्वयें तनुहि देवनदीसती ते ॥' या शेवटच्या चरणांत म्हणतात. तसाच अशा सद्गुरूचा अनुभव कीं, आपण जगद्रूपेंकरून षड्गुणसंपन्न

भगवान् आहों, असें यथार्थदीपिकेंतील ‘ आत्मानुभवी नित्यनव। विश्व आपण हा अनुभव। भगवत्पद षड्गुणवैभव। प्राप्त जया ॥ ’ ह्या ओवींत स्पष्ट म्हटलें आहे.

ह्या आपल्या दिव्य अनुभवासच जगद्गुरु श्रीकृष्ण राजविद्या, राजगुह्य असें— ‘ अर्जुना तूं जाण रे ! होशील सुजाण रे ! । विश्व नाहीं मीचि आहें, सखया ! तुझी आण रे ! ॥ ’ ह्या पदांत म्हणतात. आतां जें जग हा गुरूच स्वतः बनला आहे ( जें दृग्गोचर तें नसे, गुरु असा निर्धार सोडूं नको ॥—नारायणमहाराज ) तें त्रिगुणात्मक ( सात्त्विक, राजस व तामस ) असल्यामुळें त्रिमूर्ति ( ट्रिनिटी ) ही सर्व धर्मांत कोणत्या ना कोणत्या रूपानें तरी आराध्यदेवता मानली जाते. उदाहरणार्थ—

( १ ) हिंदु धर्म—ब्रह्मा, विष्णु, महेश.

( २ ) बौद्ध धर्म—बुद्ध, धर्म, संघ.

( ३ ) ख्रिस्ती धर्म—पिता, पुत्र, पवित्र आत्मा ( Father, Son, and Holy Ghost ).

( ४ ) पारशीधर्म—अग्नि, उदक, सूर्य.

( ५ ) इस्लामीधर्म—रह्मान, रहिम, मालिक.

येथें ध्यानांत धरण्यासारखी एक गोष्ट अशी आहे कीं, आपल्या धर्मांत सर्व देवांपैकीं त्रिमूर्तीसच गुरुदेव म्हणतात, व त्याची उपासना शैव-वैष्णवादि सर्व संप्रदायाचे लोक करतात. याचें खरें कारण फणसळकरकृत दत्तचरित्रांत दिल्याप्रमाणें ‘ इतर अवतारीं प्रभूस कोणा एकाचा नाश करणें हेंच अगत्याचें कार्य होतें, तसें प्रस्तुतच्या अवतारीं कांहीं एक नव्हतें. हा अवतार केवळ लोकांवर दया करण्यासाठींच होता, ’ हेंच आहे. यावरून त्रिमूर्ति दत्तावतार हा परम दयाळु सद्गुरूचेंच रूपक आहे हें उघड आहे.

श्री एकनाथमहाराजांच्या

सद्गुरूचें निजनाम एक। निवारी बाधा महादोख।
वैराग्य उपजवी अलोलिक। तेणें होय निजसुख साधकां॥--ए. भा.

या उक्तीप्रमाणें त्रिमूर्ति जगद्गुरूच्या—

ब्रह्मा विष्णु महेशा ! तुमचीं आहोंत दत्तजी ! बाळें।
जतन करा सर्वस्वें देउनि सद्भाव, मृत्युसी आळें॥
'यशवंत' नाम तुम्हां 'यश' गुण तुमचाच द्यावया लावी।
यश गातां यश लाभे दासां जें भक्तिपंथही दावी ॥

ह्या दिव्य मंत्राची प्रतीति अनेक धर्मांच्या व पंथांच्या लोकांस आली आहे.

भगवद्गीतेंतील जगद्गुरु त्रिमूर्तींचीं तीन रूपें—(१) ईश्वरसगुण, (२) ब्रह्मनिर्गुण, (३) विश्वत्रिगुण—वर दिलेल्या १८ व्या अध्यायांतील 'यतः प्रवृत्तिर्भूतानां' या श्लोकाच्या अनुक्रमें पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या चरणांत प्रदर्शित केलीं आहेत. पहिल्या व दुसऱ्या चरणांचा अर्थ तर उघड आहेच व तिसऱ्या चरणांतील 'कर्म' या शब्दाची व्याख्या गीतेच्या आठव्या अध्यायांतील तिसऱ्या श्लोकांत—

भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥

अशी दिल्यामुळें पुढील उताऱ्यांवरून येथेंहि संशयास मुळींच जागा राहात नाहीं:—

तरी हें कर्म म्हणिजे स्वभावें। जेणें हा विश्वाकारू संभवे ॥
करीतेनवीण गोचरु। अव्यक्तीं हा आकारु।
निपजे जो व्यापारु। तया नाम कर्म ॥—ज्ञानेश्वरी

'नासदीय सूक्तांत दृश्य जग हें परब्रह्माची विसृष्टि 'विसर्ग' होय असें म्हटलें आहे; व विसर्ग शब्दाचा तोच अर्थ येथें घेतला पाहिजे. विसर्ग म्हणजे हविरुत्सर्ग असा अर्थ करण्याची कांहीं जरूरी नाहीं. या दृश्य

सृष्टीलाच कर्म कां म्हणतात याचें विवेचन गीतारहस्याच्या दहाव्या प्रकरणांत (पृ. २५९) सविस्तर केलें आहे तें पाहावें '——गीतारहस्य.

याच म्हणजे अठराव्या अध्यायांतील——

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्।
भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम्॥

या श्लोकांतही ' ब्रह्म भूतः समः सर्वेषु ' या शब्दांत निर्गुणब्रह्म ' भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ' या शब्दांत विश्वत्रिगुण, ' मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ' यांत सगुण ईश्वर व ' विशते तदनंतरम् ' यांत सगुणमोक्षाचा भाव दर्शविला आहे. तसेंच भगवद्गीतेच्या आठव्या अध्यायांतील ' ओमित्येकाक्षरं ब्रह्म ' या वचनांत तर ' ॐ ' या एकाक्षरानेंच ' अ ' कार म्हणजे निर्गुणब्रह्म, ' उ ' कार म्हणजे सगुण ईश्वर, ' म ' कार म्हणजे विश्वत्रिगुण या त्रिमूर्तींचा उल्लेख केला आहे. याचें स्पष्टीकरण ' शंकर सुधे ' तील ' ॐकारा ' च्या आरतींतील पुढील तीन चरणांत झालें आहे:——

' अ 'कार शून्याकार मस्तक तव ताता।
ऋग्वेदीचें प्रळय–शेष तत्त्वतां॥
' उ 'कार शुंडाकार सगुण रूप तूझें।
यजुर्वेदें भजतां वारिसि भवओझें॥
' म 'कार विश्वाकार धरिसी जो पोटीं।
त्यातें सामवेद गाती जगजेठी !॥

श्रीकृष्णांनीं अर्जुनास येथें सांगितल्याप्रमाणें उद्धवासहि भागवतांत सांगितलेल्या——

मामेकमेव शरणमात्मानं सर्वदेहिनाम् ।
याहि सर्वात्मभावेन मया स्यात् ह्यकुतोभयः ॥

या श्लोकाचा भावार्थ हाच आहे. या श्लोकाच्या महत्त्वाविषयीं श्रीएकनाथ-महाराज म्हणतातः—

'मामेकमेव शरणं' । याची श्लोकाचें करितां पठण ।
मायेचा गळा धरोनि जाण । अपधाकें पूर्ण संसार निमे ॥'—ए. भा.

ह्या प्रवचनांत भगवद्गीता व त्रिमूर्ति यासंबंधानें जें विवेचन झालें आहे त्यावरून असें सिद्ध होतें कीं जरी वर्णाश्रमधर्म अर्थात् आपलें कर्तव्यकर्म हिंदु लोकांस शिकविण्याकरितां वेद, शास्त्र, पुराणें, बौद्धाकरितां त्रिपिटक, ख्रिस्ती लोकांकरितां बायबल, पारशी लोकांकरितां अवेस्ता, मुसलमान लोकांकरितां कुराण वगैरे वगैरे निर्माण झालीं आहेत, तरी सर्व जगतास त्यांचें अंतिम ध्येय त्रिमूर्ति अर्थात् त्रिविध ब्रह्मानुभव

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥—भ. गी.

ब्रह्म निर्गुण । ब्रह्मचि ईश्वर सगुण ।
ब्रह्मचि विश्वत्रिगुण । ऐसें कळेल, तरीच ब्रह्म कळलें ॥
श्रुतीही बोलती निर्गुण ब्रह्म । कीं 'सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म' ॥
आणि 'सर्वं खल्विदं ब्रह्म' । हेंही श्रुति बोलती ॥—य. दी.

व सगुणमुक्ति

मम साधर्म्यमागताः—भ. गी.

सगुणीं ज्ञानिया भक्ती । ते अनन्यभक्ती दे सगुणमुक्ती ॥
त्या सगुणमुक्तीची अभिव्यक्ती । वैकुंठलोकीं मग नित्य ॥
—य. दी.

साध्य करून देण्याकरितां प्रकट झालेली, अत्यंत सुलभ, श्रेयस्कर व अमोलिक देणगी एक भगवद्गीताच होय.

शेवटीं, आपण सगळे मिळून सरस्वतीरूपी भगवद्गीता व सद्गुरुरूपी त्रिमूर्ति यांच्या आरत्या म्हणून आजचा कार्यक्रम पुरा करूं.

ग्रा. क्र. ५४५४

## भगवद्गीतेची आरती

जयदेवी, जयदेवी, श्रुति-गीतामाते ! गायत्रीमाते !
आरति ओवाळूं तुज वाराया दुरितें ॥ ध्रु० ॥

तुजहुनि हितकारी जगिं नाहीं कोणी ।
म्हणुनी नमितों प्रेमें दुर्गे ! तव चरणीं ॥ १ ॥

पतिसम बहुरूपें धरिसी महाशक्ती ।
महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी, सरस्वती ॥ २ ॥

गिरिजा, राधा, तूंचि परा, लक्ष्मी, शारदा अपरा ।
ज्ञानगंगा होउनि तारिसि पामरां ॥ ३ ॥

मग श्रीभागवतीं तूं प्रगटुनि भवानीं ।
अतर्क्य महिमा दाविसि सद्गुरुच्या भजनीं ॥ ४ ॥

यास्तव अनन्यभक्ती वत्सांतें दिधली ।
तेंचि देउनि अंबे ! मज वैकुंठीं घालीं ॥ ५ ॥

## श्री सद्गुरूची आरती

गुरुराया रे ! करिं दया राम ॥ ध्रु० ॥ अनाथ दिनानाथ सद्हृदया विठ्ठला ! ॥ १ ॥ जपतपध्यानधारण साधन, न करीं काय उपाया ॥ २ ॥ कामक्रोध हे मत्सर पीडिती, न चले काय उपाया ॥ ३ ॥ विश्वंभर हे त्रैमूर्त्यात्मक, आदिनारायण राया ! ॥ ४ ॥

॥ श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ॥